रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १७ मार्च २०२४




# भारतीय मुस्लिमांना खतरा नाही!

आधुनिक केसरी

**सुधारित नागरिकतत्व कायद्याची अधिसूचना काढण्यात आली. नवीन कायद्यामुळे शेजारी राष्ट्रातून धार्मिक छळामुळे शरणार्थी म्हणून आलेल्यांना भारतीय नागरिकत्व देण्याचा मार्ग मोकळा झाला.या कायद्याचा भारतीय मुस्लिमांच्या नागरिकत्वाला तीळमात्र धोका बसणार नाही. पण काँग्रेससह इतर विरोधी पक्ष "वोटबँक'साठी धडधडीत खोटा प्रचार करुन मुस्लिमांच्या भावना भडकवित आहेत.या कायद्याचा आधार हिंदु -मुस्लिम भेदभाव केला जात आहे,हे निंदनीय आहे.**



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

काँग्रेसने भारताचे विभाजन धार्मिक आधारावर केले. यास धार्मिक विभाजनला विरोध होता. पूर्वी पाकिस्तान.बांगला व अफगानिस्तान हा भारताचा भाग होता. काँग्रसने विभाजनावेळी या राष्ट्रातील गैरमुस्लिम भारतात कधी येवू शकतात व त्यांना नागरिकतता दिली जाईल, असे आश्वासन दिले होते. तसेच पाकचे राष्ट्रपती लियाकतअली व तत्कालिन पंतप्रधान नेहरू यांचेत ८ एप्रिल १९५० मध्ये करार झाला. यावेळी दोन्ही राष्ट्रांतील अल्पख्यांकांचे हक्क संरक्षणाची हमी दिली गेली होती. पाकने ती पाळलीच नाही.त्यामुळे भारताला शेजारी अल्पसंख्याकांचा सुरक्षतेची निर्णय घ्यावा लागला आहे. आजही पाकिस्तान, बांगला देश आणि अफगानिस्तानात हिंदूसह इतर धर्मियांचा छळ व अत्याचार, सक्तीचे धर्मांतर, धर्मस्थळावर हल्ले तसेच भेदभाव केला जात आहे.या धर्मांच्या मुलींचे व महिलांचे अपहरण करुन सक्तीचा विवाह व धर्मांतर केले जात आहे. त्यामुळे हे पीडीत धर्मीय कुटुंबीय आश्रयासाठी भारतात पळून आले आहेत. पाकमध्ये हिंदु संख्या १४.६ टक्के होती, केवळ १.६ टक्के,बांगला देशात हिंदु १३.५ वरुन ८.५ टक्के, अफगानिस्तानात केवळ १ हजार हिंदू उरले आहेत. या तीन राष्ट्रातील अल्पसंख्यांक भारतात अनेक वर्षापासून शरणार्थी राहत आहेत. या कुटुंबाना भारतीय नागरिकत्व मिळत त्यांना कोणताचा लाभ,सुविधा मिळत नाहीत.ते अत्यंत हालाखीचे जीवन जगत आहेत.यात त्यांचा काय गुन्हा ?

जगात इस्लाम राष्ट्राची संख्या ५६ आहे. या राष्ट्राची संघटना आहे. हिंदु धर्मावर आधारित कोणतेरी राष्ट्र नाही. भारताची घटना हिंदु व इस्लाम धर्मावर आधारित नाही. डॉ. आंबेडकरांनी घटनेत सर्व धर्मियांना स्वातंत्र्य दिले. मुस्लिमांसाठी स्वंतत्र राष्ट्र होवून भारतातील बहुसंख्य मुस्लिम पाकमध्ये गेले नाहीत. भारतात बहुसंख्य हिंदुमुळे आपण सुरक्षित राहु शकतो, असा त्यांना विश्वास आहे,हे सत्य नाकारता येणार नाही. त्यांना भारतीय घटना मान्य आहे.पण कांही कट्टर मुस्लिम संघटना व राजकीय नेते मात्र भारतात शरियावर आधारित कायदे असावेत, यासाठी मनसूबे रचले जात आहेत. त्याला काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, माकप, आम आदमी पक्ष, ए.आय.एम.आय.एम, हे राजकीय नेते स्वार्थासाठी खतपाणी घालत आहेत. याला सर्वच भारतीय मुस्लिम पाठिंबा नाही.जर शेजारी राष्ट्रात इस्लाम हिंदु व इतर धार्मिक अत्याचार होत असतील तर त्यांनी कोठे जावे? भारताने त्यांना वार्‍यावर सोडावयाचे काय? जगात कोणही राष्ट्रात इस्लाम राष्ट्रात हिंदु व इतर धर्मीवर अत्याचार व अन्याय होत तर भारताने त्यांचे बाजूने उभे राहु नये काय? मुस्लिमांच्या संरक्षणासाठी इस्लामिक राष्ट्र धावून येतात! गाजापट्टीत फिलीस्तीनी मुस्लिमांचे जगात नव्हे, भारतातही समर्थक होते! याबाबत भारतातील विरोधी पक्षाची मानसिकता हिंदु व इतर धर्माच्या विरोधात का आहे? भारतात सर्व धर्मियांना समान अधिकार,हक्क,न्याय दिला जातो, भेदभाव केला जात नाही,हे मुस्लिम समाजाला व जगाला माहित आहे. तरी 'इस्लाम खतरे'मे म्हणून बोंब चालूच असते. भारत मानवताधर्माचे पालन करतो. मोदी सरकारने संकट काळात इस्लाम राष्ट्रांना "वसुदैव कुटुंबकम' या भावनाने सर्वांना मदत केली आहे. भाजपाचे सरकार मुस्लिम विरोधी नाही, तो राष्ट्र विरोधी शक्तींच्या विरोधात आहे.भारतात घटनेवर समान नागरी कायदा, लोकसंख्या नियंत्रण कायदा,राष्ट्रीय नागरिकता नोंदणी कायदा राष्ट्रहित लक्षात घेवून होत असतील त्याला विरोध का असावा?

पाकिस्तानी लष्कारांच्या अत्याचारामुळे१९७१ मध्ये बांगला देशी मुस्लिम भारतात आले. तेंव्हा श्रीमती इंदिरा गांधी यांनी मानवतेच्या दृष्टीने त्यांना आश्रय दिला. यामुळे भारताची अर्थ व्यवस्था बिघडली म्हणून श्रीमती इंदिरा गांधी यांनी मदतीसाठी पोस्टाचे तिकीट काढून निधी जमा केला. तेंव्हा भारतीय हिंदुंनी विरोध केला नाही. आज बांगला देशी लोकांनी असाम, पश्चिम बंगाल राज्यात मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत आहे. यात म्यांमारचे रोहिंग्या मुस्लिमही आहेत. काँग्रेस सरकारने बांगला शरणार्थ्यांना मायदेशी परत पाठवायला पाहिजे होते,पण काँग्रेस सरकारने वोटबँके'साठी दया दाखविली.आज डोक्यारुन पाणी वाहत आहे.तेंव्हा काँग्रेस सरकारने तर केवळ बांगला हिंदूंना हाकलण्याचा प्रयत्न केला होता. भारतात शरणार्थ्यांबाबत कोणताही कायदा नाही. तर दुसरीकडे घूसखोर देशाचे बनावट नागरिकता मिळवून सत्तेत भागीदार बनू पहात आहेत. पश्चिम बंगालमध्ये २९ टक्के मुस्लिम मतदार आहेत. या बळावर तृणमूल काँग्रेसच्या ममता एकाधिकारशाही राज्यात चालू आहे. या राज्यात हिंदु व इतर धर्माचे लोक सुरक्षित नाहीये. संदेशखाली'ची घटना याचे जीवंत उदाहरण आहे. ममता तर ना केंद्राचे व न्यायालयाचे आदेश पालन करत नाहीत. त्या देशाच्या घटक राज्याच्या मुख्यमंत्री आहेत,हे विसरत आहेत. त्या राष्ट्राच्या महाराणी नाहीत, याचे भान ठेवावे प. बंगालमध्ये कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही, हिंसाचाराला सरकारच बळ देत आहे. तरीही भाजपा सरकार ममताचे सरकार बरखास्त का करत नाही? ते बघ्याची भूमिका आहे! ममता व काँग्रेस,भाजपाच्या राजकीय खेळात मुस्लिम व हिंदु, मुस्लिम भरडल्या जात आहे.म्हणतात ना! 'मांजराचा खेळ होतो,उंदराचा जीव जातो' बांगलादेश,व म्यांमारचे रोहिंग्या घुसखोर पश्चिम, बंगाल असाम राज्यात नागरीक म्हणून राहत आहेत. घुसखोरांना नागरिकत्व द्यावयाचे आहे काय ? त्यासाठी ममताने या सी.ए.ए.या कायद्याच्या विरोधात थयथयाट करत आहेत. भारताने घुसखोरांना का पोसवे?.भारत ही धर्मशाळा नाही,असे काँग्रेसने म्हंटले होते. काँग्रेसने राजवटीत.१९५१ मध्ये राज्याकरिता राष्ट्रीय नागरिक नोंदणी कायदा( एन आर.सी.) आणला होता.देशात १९५१ मध्ये धुसखोराचे प्रमाण ९.८ टक्के होते,ते आता १४.२३टक्के इतके झाले आहे.देशात घूसखोरांची संख्या वाढत चालली आहे.पाक आणि बांगला देश भारतात मुस्लिमांची घूसखोरी करुन पध्दतशीरपणे विविध राज्यात बसवत आहे. सीमेवर तर सहाशे रुपये द्या,भारतात घुसा"असे चालू आहे.भारतीय सीमालगतची गावे मुस्लिम बहुल झाली आहेत! हे सहज घडते असे नाहीये! देशात




मुस्लिम बहुल मतदारसंघ लोकसभा व विधानसभा, महापालिका,नगरपालिके प्रमाण वाढत चालले आहे.असम राज्यात घुसखोरांचा हस्तक्षेप वाढल्याने असम विद्यार्थी संघटनेने सहा वर्षे आंदोलन झाले व यात हिंसाचार झाला. काँग्रेस सरकारने एन आर सी.चा आधार घेतला. काँग्रेस सरकार घुसखोरांना हाकलून देण्यात अपयशी ठरले.कोणतेही राष्ट्र घुसखोरांना शरण आश्रय देत नाही.याचे उदाहरण पाकिस्तानमध्ये सुमारे २० लाख अफगास्तानी मुस्लिमांना हाकलून दिले जात आहे. गाजापट्टीतील युध्दामुळे शरणार्थी फिलिस्तानी मुस्लिमांना इस्लामिक राष्ट्र शरण देत नाही! मग ते मुस्लिम नाहीत काय? भारतात घुसखोरांचे लाड कशासाठी? एन.आर.सी. व सी.ए.ए. हे दोन्ही कायदे भिन्न आहेत.

भारतीय नागरिकता कायदा १९५५ मध्ये नागरिकता देण्याचे विविध नियम आहेत.त्यानुसार मोदी सरकारने नागरिकत्व संशोधन विधेयक २०१९ कायदा (सी.ए.ए.) आणला. यात पाकिस्तान, अफगानिस्तान, बांगला देश तीन शेजारी राष्ट्रातील हिंदू, शीख ईसाई, जैन, बौध्द व पारसी धार्मिक पिडीतांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद आहे.जे ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आले.त्यांनाच नागरिकत्व दिले जाणार आहे. हा कायदा होवून संमत होवून पाच वर्षे झाली. केंद्राने दि.११ मार्च २०२४ रोजी कायद्याची अधिसूचना काढली. हा कायदा नागरिकत्व देणारा आहे,तो नागरिकत्व काढणारा मुळीच नाही. या कायद्यामुळे जानेवारी २०१९ मध्ये संसदीय समितीचे अध्यक्ष के.राजेंद्र अग्रवाल, आय. बी आणि रॉ.चे अधिकारी होते. समितीच्या अहवालानुसार ३१ हजार ३१३ शरणार्थ्यांना नागरिकता मिळणार आहे. या कायद्यामुळे मेघालय, त्रिपूरा, राज्याचा प्रश्न निकालात निघाला आहे. शेजारी राष्ट्रातील सहा धार्मिक पिडीत शरणार्थ्यांना भारताने नागरिकत्व देण्याचा निर्णय घेतला. त्यावरुन विरोधी पक्ष आकाश -पाताळ केला जात आहे. म्हणजे हिंदू शरणार्थ्यांना विरोध! हाच आहे. या कायद्यात केवळ मुस्लिमांचा समावेश नाही, म्हणून हा कायदाच 'मुस्लिम विरोधी' म्हटले जात आहे. यात भारतीय मुस्लिमांची नागरिकता काढली जाईल, असा गैससमज जाणीवपूर्वक पसविला जात आहे. भारतात नागरिकता कायदा १९५५ नुसार एका वर्षात( २०२० मध्ये ) पाकिस्तान ४५५२, अफगानिस्तान ४११ व बांगला ११६, अमेरिका- ७१, श्रीलंकेच्या- ७० लोकांना भारतीय नागरिकता देण्यात आलेली आहे.

भारतात विदेशी ५६६ मुस्लिमांना नागरिकत्व देण्यात आली. नागरिकता कायद्याच्या तीनच्या सूचीनुसार विदेशी मुस्लिमांना नागरिकत्व देण्याची तरतूद आहे. मग हिंदु -मुस्लिम भेदभाव कसला? सहा धार्मिक पिडीतांना नागरिकत्व देण्यास विरोध का? विरोधी पक्षांचे व मुस्लिम नेत्यांचे पोट का दुखते आहे?केवळ वोटबँके'साठी विरोधी पक्ष हा अफवा व गैरसमज पसवित आहेत. केवळ राजकारणापायी मुस्लिम समाजाच्या भावना भडवित आहे.हे भाजपाविषयी व्देष पसविण्याचे हे षडयंत्र आहे. लोकशाहीत विरोधी पक्षाला सरकारच्या धोरणा विरोधात आक्षेप,टीका,आरोप करण्याचा पूर्ण अधिकार आहे.पण तो नकारात्मक नसू नये, सकारात्मक असला पाहिजे.पण आज विरोधी पक्ष राष्ट्रहित दावणीला बांधत आहेत.हेच लोकशाहीराष्ट्रासाठी घातक आहे. काँग्रेस नेते राहूल गांधी भारत जोडो यात्रेतून प्रेमाचे ऐवजी व्देषाचे बीज पेरत आहेत.भाजपाच्या हिंदुच्या मतात फुट पडावी,केंद्रात भाजपा राजकीय खेळ बिघडावा. यात काँग्रेस जिंकली नाही चालेल. देशात अस्थिर सरकार आणून तो खड्यात जावा, अशी गांधी परिवाराची नीती आहे,काँग्रेस तुष्टीकरणातून या कायद्याचा विरोध करत आहे. श्रीमती सोनिया गांधी ३१ मार्च २०१४ रोजी नवी दिल्लीच्या जामा मस्जिदीचे इमाम सैयद अहमद बुखारींना आपल्या निवासस्थानी भेटल्या.यावेळी त्यांनी मुस्लिमांनी काँग्रेस पक्षाला मते द्यावी,अशी विनवणी केली होती.बुखारींनी मुस्लिमांना काँग्रेसला मत देण्याचे आवाहन केले.नेते राहुल गांधींनी मुस्लिम बहुल लोकसभा मतदारसंघ निवडला.तो राजकीयदृष्ट्या त्यांना सुरक्षित वाटतो! गांधी निवडणूक काळात मंदिरात केवळ देखाव्यासाठी जातात.त्यांची श्रध्दा नाही.एरवी हिंदु देवतांची व धर्माची टिंगल करतात! काँग्रेस पक्ष हिंदु व्देष्टा होत चालला आहे. दिल्लीत शरणार्थ्यांनी काँग्रेस कार्यालयासमोर निदर्शने केली. जगात हिंदु धर्मात जन्म घेणे गुन्हा आहे काय? असा प्रश्न संतप्त शरणार्थ्याने माध्यमासमोर केला.मुस्लिम समाजात अल्लाच नाही म्हणणारा एकही सापडणार नाहीपण देव नाही म्हणणारे हजारो हिंदूत नास्तीक, तथाकथित पुरोगामी समाजवादी आहेत.हेच दुर्देव आहे. त्यात हिंदु धर्म जातीपातीमुळे विभागला गेला आहे.हिंदी वृत्तवाहिन्यावर धर्मावर चर्चा होते. ती संतानी व भाजपाने टाळली पाहिजे. इतर देवताविषयी अशब्द वापरतात,ते आक्रमक असतात. अशा चर्चेतून निष्पन्न काहीच होत नाही.

यातून भाजपा हा मुस्लिम विरोधी आहे, टशी प्रतिमा होत चालली आहे. काँग्रेसला बुखारी चालतात, पण मोहन भागवत चालत नाहीत. मुस्लिम लिग चालतो, पण आर.एस. एस.चालत नाहीत.यावरुन काँग्रेस पक्षाचा तुष्टीकरणाचा चेहरा समोर येतोय.या कायद्याचे विधेयक दि. ९ डिसेंबर लोकसभेत तर दि. ११ डिसेंबरला राज्यसभेत संमत झाले. दि. १२ डिसेंबर२०१९ रोजी राष्ट्रपतींनी या कायद्याला मंजूरी दिली. श्रीमती सोनिया गांधीनी तर कायद्याच्या विरोधात रस्त्यावर उतरा, असे चिथावणीखोर भाषण दिले होते.हा काळादिवस असे म्हणाल्या होत्या. विरोधी पक्षाने रस्त्यावर येवून मुस्लिमांच्या भावना भडकविल्याने त्यामुळे असम, त्रिपूरा दिल्ली, उत्तर प्रदेश,पश्चिम बंगाल, कर्नाटक, दिल्लीत या कायद्याच्या मुस्लिम मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरला,यात हिंचाचार झाला निष्पाप लोकांचा बळी गेला. या कोण जबाबदार? शाहीनबाग महिलांचे धरणे आंदोलन चार महिने चालले. यामागे कांही राष्ट्र विरोधी शक्तींचा हात होता सामान्य माणसांला अफवा पसरविल्याचा आरोपाखाली पोलिस अटक करतात. तर मग या कायद्याबाबत अफवा पसविणाऱ्या राजकीय नेत्यांना अटक केली का जात नाही? सोनिया गांधींचा इटलीतील लुसियाना गावात जन्म झाला. त्यांनी आपले मूळ नाव अनोटिनिया मायनो बदलले व दि. ३० एप्रिल १९८३ रोजी भारतीय नागरिकत्व मिळविले.भारतात नागरिकत्व जन्म, वंश, नोंदणी व नैसर्गिक या चार आधारावर मिळते. सोनियांना इटलीच्या नागरिक असताना भारतीय नागरिकत्व कसे काय मिळविले? त्यांना दुहेरी नागरिकता कशी काय मिळाली? त्या देशाच्या सर्वोच्च लोकसभा सभागृहात पोंहचल्या? त्यांचे देशाचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न होते. पण शरद पवारांच्या बंडामुळे त्यांना पंतप्रधान होता आले नाही. हे मात्र पवारांनी पुण्याचे काम केले. सोनिया व राहूल गांधी यांनी मूळ नाव आडनाव लपवून भारताची नागरिकत्व मिळू शकते. मग इतरांना का नाही. ममता बनर्जी यांनी रमजान महिन्यात सी.ए.ए. लागू केल्याने देशात अशांती पसरेल, त्या म्हणाल्या. केजरीवाल यांनी तर कहर केला, अल्पसंख्याक शरणार्थी भारताचे नागरिक झाले तर, देशात दरोडो, चोरी. खून, बलात्कार करतील ,असे म्हणाले. असे भाष्य इतर धर्माबद्दल बोलण्याचे धाडस करणार नाहीत,घुसखोर व रोहिग्याना ते विरोध करणार नाहीत.आम आदमीच्या या नेत्याने तर खलिस्तान समर्थंकाबरोबर बैठक घेतली होती.हा नेता सत्तेसाठी नीच राजकारण उतरलेला आहे!तो कोणत्याही स्तरापर्यंत जाऊ शकतो! देशात बॅरीस्टर राजकीय नेता कट्टर धार्मिक पाठ देतोय दुसरा उच्च सुशिक्षित नेता भ्रष्टाचाराचे,राजकारणाचे नवीन धडे देतोय! या कायद्यात मुस्लिमांचा सबंध येतोच कोठे? देशात कायदा सुव्यवस्था बिघडावी,असे वातावरण निर्मान केले जात आहे.ए.आय एम. आय. एम.चे नेते ओवेसींनी हा कायदा घटना विरोधी असल्याचे म्हटले. पण त्यांचा पक्ष धोरण इस्लाम धर्माचा पुरस्कर्ता आहे,मग पक्षाची नोंदणी घटनाबाह्य आहे.यात ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारी उध्दव ठाकरे शिवसेनेने सी.ए.ए.चा विरोध केला आहे.ठाकरे यांनी विदेशी हिंदुना भारतीय नागरिकत्व दिली जाऊ नये काय? हे स्पष्टपणे सांगावे.

**बाळासाहेबांचा मतदानाचा हक्क कोणी काढला?** शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरेनी१९८७ च्या निवडणुकीत हिंदु मतदानांचा आवाहन केले म्हणून काँग्रेसने त्यांना न्यायालयात खेचले होते त्यांचा १९९५–२००१ पर्यंत देशाच्या नागरिकाच्या मताचा हक्काचा अधिकार काढून घेतला! त्यांचेपूत्र ठाकरे काँग्रेसशी तळी उचलत आहेत. मोदी सरकारने हिंदुसह सहा धार्मिक पिडीतांना नागरिकत्व देत असेल तर विरोधकांचे पोट सूळ का उठावे?या कायद्यावरुन देशात निवडणुकी– पूर्वी भाजपा विरोधात मुस्लिम मतदारांना भडकावून ती 'वोटबँक' मिळण्याचा डाव आहे.देशात या कायद्यावरुन देशात अराजकता निर्माण करण्याचा षडयंत्र रचले जात आहे तेंव्हा देशातील विवेकी राष्ट्रप्रेमी मुस्लिमांनी विरोधकांच्या अफवेला बळी न पडता परिर्वतनाचे दिशेने पाऊल टाकावे व विकासाची कास धरावी! यात त्यांचे व भारताचे भले आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

कदाचित त्या सगळ्यांसाठी तो आनंदाचा आणि अभिमानाचा प्रसंग असेलही पण मंदिरासमोर असलेल्या छोटया रस्त्यावरून ही मिरवणूक जात असल्याने भाविकांची प्रचंड गैरसोय होत होती. त्याचे कोणालाच सोयरसुतक नव्हते. कोण बोलणार ? देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांबद्दल मला प्रचंड आदर आणि अभिमान आहे. देशात शांतता राहावी म्हणून सीमेवर हे सैनिक जीवाची बाजू लावून लढत असतात. पण हे दृश्य पाहून मला खरोखरच वाईट वाटले. प्रश्न असा पडतो की आपल्याला खरोखरच शांतता नकोशी झालीय का ? आम्ही गोंगाटप्रिय झालो आहोत का ? इंग्रजीत एक सुंदर वाक्य आहे ' SPEECH IS SILVER, SILENCE IS GOLD. ' या वाक्याचा अर्थ असा की व्यर्थ बोलण्यापेक्षा मौन श्रेष्ठ आहे. शांततेचे मोल करता येणार नाही. मानवासहित सर्वच सजीवांच्या निकोप आणि आरोग्यदायी जीवनासाठी शांतता अतिशय महत्वाची आहे. आम्ही आज शाळांमध्ये पर्यावरण हा विषय शिकवतो. त्यामध्ये हवा, ध्वनी, जल इ. प्रकारच्या प्रदूषणांबद्दल शिकतो, बोलतो. पण प्रत्यक्ष आचरणात ते किती आणतो ? ती नुसतीच पोपटपंची राहते. रात्री उशिरापर्यंत डीजे, फटाके वाजवू नयेत असे कायदे आहेत. पण जोपर्यंत त्यांची कडक अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत त्यांचा काही उपयोग नाही. अर्थात नुसते कायदे करूनही उपयोग होत नाही. त्यासाठी समाजजागृती व्हावी लागते. आपल्या अशा वागण्याने इतरांना त्रास होऊ शकतो, ही भावना ज्या दिवशी आमच्या मनात निर्माण होईल, तो सुदीन म्हणायचा. विजय तेंडुलकरांचे ' शांतता कोर्ट चालू आहे ' हे नाटक प्रचंड लोकप्रिय झाले होते. कोर्टात हवी असणारी शांतता आम्हाला प्रत्यक्ष जीवनातही हवी आहे. ती जर मिळणार नसेल तर एक दिवस शांतता सुद्धा रुसून कोर्टात गेल्याशिवाय राहणार नाही.



## आनंदी पहाट

# अर्थव्यवस्थेसाठी आध्यात्मिक मूल्ये, कौशल्ये आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कार्य आणि भौगोलिक स्थान विचारात न घेता अनेक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. मानवी घटक हा शरीर, मन आणि आत्मा यांच्याव्दारे एकाच वेळी बनलेला असतो; म्हणूनच अध्यात्म ही एक भावना आहे, जी विश्वाला त्याच्या संपूर्णतेमध्ये एकत्र करते. ही एक भावना आहे, जी व्यक्तीच्या आतून येते आणि मनाच्या जगण्याच्या प्रवृत्तीच्या पलीकडे जाते. व्यावसायिक जगात, अध्यात्म एकात्मता, प्रेरणा आणि समाधानामध्ये सुधारणांमध्ये समाविष्ट होते. कॉर्पोरेट गव्हर्नन्समध्ये प्रामाणिकपणा, आंतरिकता आणि सर्जनशीलता यासारख्या मूल्यांचा संच स्थिर असणे आवश्यक असते. ही देखील आध्यात्मिकदृष्ट्या मात्वाची बाब असल्याचे स्पष्ट होत असते. अध्यात्म हा अर्थव्यवस्थेच्या मानवीकरणाचा मार्ग आहे आणि समाजातील मानवीकरण मूल्यांच्या प्रसारासाठी एक धोरणात्मक परिवर्तन आहे. येथे, एकता, प्रेम, इतरांबद्दल आदर, आनंद, सौहार्द, मानवता, इतरांबद्दलच्या संवेदना असतात. नवीन अर्थव्यवस्थेसाठी आध्यात्मिक मूल्ये आणि गतिशील कौशल्ये आहेत. अध्यात्म ही स्पर्धात्मक बाजारपेठेतील कामगिरी आणि संघटनांच्या भेदासाठी संधीच आहे. हे संस्थांचे उद्दिष्ट ओळखण्यास अनुमती देते, नागरिक तसेच संस्थांना या वस्तुस्थितीची जाणीव करून देते, की ते एकाकी राहत नाहीत. अध्यात्म हे कल्याण, मानसिक समाधान, यश, शांतता, आत्मिक समाधान यांच्याशी संबंधित असलेल्या क्षमतांचे स्वरूप तसेच मूळ उद्दिष्ट आहे; ज्यामुळे व्यक्तीला सर्वांगीण स्वरूपाची स्थिती प्राप्त करण्यास सक्षम करते. ही आत्मिक कौशल्ये आहेत, जी माणसामध्ये परिवर्तन घडवून आणतात. एकप्रकारे त्यांचे आचरण आणि कार्यप्रदर्शन प्रतिबिंबित करतात. ती अशी क्षमता आहे, जी अनेक भागांना एका संपूर्ण भागामध्ये जोडतात. त्यामुळे आध्यात्मिक भांडवल हे वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी सर्वात उदात्त भांडवल मानले जाते. डोळ्यांशिवाय वास्तविकता पाहण्याची सक्षमता, गुणविशेष ते देते आणि आत्म्याच्या सक्रीय सहभागाने समाज अनुभवू देते.



आधुनिक केसरी

## दिसे पांडुरंग | ठायी ठायी ||


**लोखंडासी गंज | माती संगे येतो ||**
**परिसाने होतो | सुवर्ण हा ||१||**
**मातीचिया संगे | रूजतो अंकुर ||**
**धान्याचे भांडार | देतो आम्हा ||२||**
**गर्भाचे ठायी | फुकाची हमाली ||**
**संगती नडली | दुर्जनांची ||३||**
**जैसा ज्याला लाभे | संग प्रारबधात ||**
**तैसा संसारात | भोग भोगी ||४||**
**पूर्वसंचिताने | लाभे संत संग ||**
**दिसे पांडुरंग | ठायी ठायी ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**


## अपूर्व योग

इ. स. 1290-91 साली श्री संत ज्ञानेश्वरांनी नेवाश्याला मोहिनी राजाच्या मंदिरात पैसाच्या खांबाला टेकून आपले आचार्य-आसन सिद्ध केले आणि भगवद्गीतेच्या भाष्यार्थाला क्रमशः सुरवात केली. हा महाराष्ट्राच्या सारस्वतातील अपूर्व योग होता अवघ्या सोळा वर्षे वयाच्या ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेच्या भाष्यार्थाच्या निमित्ताने काव्यमय रसपूर्ण भाषा शैलीत संपूर्ण वेदांत जनमानसापर्यंत पोहचवला. श्रीगुरू निवृत्तीनाथांच्या समोर त्यांच्या कृपा-आशीर्वादाने हा वाग्यज्ञ संपन्न होत होता. श्रोत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. त्याच प्रमाणात दिवसामानी प्रवचनातील सरसता, संवादमयता ही अधिक रंगू लागली. श्रोत्यांचे मन शब्दार्थांठायी एकाग्र होऊन आध्यात्मिक ज्ञानाची लयलूट करून धन्य होत होते. पैसाचा खांब खरे तर एक प्रतीक आहे. शास्त्रे जेव्हा माणसांच्या संकुचित वृत्तीमुळे कठोर, एकांगी बनतात, माणसापेक्षा जेव्हा शास्त्रे मोठी होतात. ज्ञानवंतांच्या मनावर जेव्हा ज्ञानाच्या अहंकाराचे लेप चढतात, तेव्हा जनसमाजापासून दूर गेलेले ते ज्ञान व ज्ञानाचे तज्ञ समाजासाठी दगडी स्तंभांसारखे निरुपयोगी, शोभेचे ठरतात. जनसमाजाची दुःखे, करुणा त्यांना पाझर फोडत नाही. अशा पैसाच्या खांबांना पाठीशी लावून संतांनी माणुसकीचे खरे अध्यात्म जनसमाजाला सांगून मनोबल व बुद्धी-संतोष दिला. त्यातून जगण्याचे भान, सामाजिक बांधिलकी देऊन मूल्यांचा जागर केला. याच परंपरेत संत ज्ञानेश्वरांनी एका बाजूला जनसामान्यांना अध्यात्म, वेदांताची तृप्ती दिली, त्याचबरोबर वारकरी पंथाला भागवत धर्माची पक्की बैठक दिली. त्यांनी पैसाच्या खांबाना खरा धर्म, खरे अध्यात्म शिकवून बोलते केले. त्यांच्या पाठीशी मोहिनीराज श्री विष्णु व सद्गुरू शिवस्वरूप श्री निवृत्तीनाथांची प्रबळ प्रेरणाशक्ती व आशीर्वाद होते, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. हे पुन्हा आज सांगावेसे वाटले, याचे कारण म्हणजे ज्ञानेश्वरीतील श्रोता-वक्ता संवाद अनुभवतांना मनःचक्षुंसमोर येतात ते नेवाश्याच्या पंचक्रोशीतून अध्यात्माच्या ओढीने तेथे उपस्थित असलेले शेतकरी, बारा बलुतेदार, शेतमजूर असा अवघा अडाणी मानला गेलेला जनसमुदाय श्रोतावर्ग.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ब्रह्मविद्या से मीश्रिता, वाणी परम स्वरुप ।**
**ब्रह्मवेत्ता ओजस्विनी, बोले मधुर अनूप ।।७३ ।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल द्वितीय अध्याय) ०२/०२/७३**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवादः**
**सोमवान् योग्याची वाणी परम पवित्र सोमरसाने म्हणजेच अमृताने ओथंबलेली अमृत मिश्रित असते. ब्रह्मवेत्ता अनुपम, मधूर, ओजस्वी वाणी बोलतात जी श्रवण करून अध्यात्म पिपासू शांती प्राप्त करतात. प्रिय मधूर वाणी तेव्हाच होते, जेव्हा योग्याच्या अंतर-कपाळात ऊर्ध्व चेष्टेच्या प्रभावाने आनंद उतरून आत्म्याला शितल आणि शांत करतो. म्हणून वाणीच्या पूर्ण स्वरूपाला योगीच पूर्णपणे जाणतो.**




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

# गुरु सांगेल तेच साधन

आधुनिक केसरी

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात,



तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा. खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी. १९६. हृदयी ठेवा राम । मुखी सदा त्याचे नाम । हातात असावे प्रपंचाचे काम । हेच खरे परमार्थाचे मर्म ॥



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## अनिर्वाच्यनिरूपण

आधुनिक केसरी

आता हेच पहाना अतिशय विचाराने भरलेले शब्द जरी बोलले तरी ते दिसतात, म्हणून ते मायेच्याच क्षेत्रातील असतात. ते असार नाशवंत असतात. शब्दाच्या माध्यमातून अर्थ कळतो. शब्दाचा अर्थ सत्य व शाश्वत असतो. आपल्याला शब्दामुळेच ज्ञान मिळते. परंतु समर्थ काय सांगतात ते लक्ष देऊन ऐका बरं का! शब्दाचा जो अर्थ असतो तो सत्य शाश्वत असतो. परंतु स्वतः शब्द मात्र असत्य व अशाश्वत असतो. ते कसे? वस्तूंचे दर्शन झाल्यावर शब्द आपोआप नाश पावतो.



# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

राम कुलकर्णी वाढदिवस विशेष

जीवेत शरदः शतम्

रविवार, १७ मार्च २०२४

adhunikkesari.com




# राम कुलकर्णींना शुभेच्छा देण्यासाठी प्रचंड गर्दी

## उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, प्रदेशाध्यक्ष, पंकजाताई, प्रितमताई, नमिताताईकडून दुरध्वनीवर शुभेच्छा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांना वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष शुभेच्छा देण्यासाठी निवासस्थानी वाढलेली प्रचंड गर्दी, हार तुऱ्याचा स्विकार, निमित्ताने स्नेह भोजन नाही म्हटलं तरी हजारो विविध क्षेत्रातील मान्यवरांसह जनसामान्यांची गर्दी दिवसभरात बोलकी होती. कर्माधिष्ठीत व्यक्ती परोपकार पर भावनेने शुद्ध कर्म करीत असेल तर समाजातील लोक जीवाभावाने प्रेम कसं करतात ?हा साक्षात्कार काल वाढदिवसाच्या निमित्ताने पहायला मिळाला. सोशल मिडियावर जणु काही एक दिवस कुलकर्णींचा असं चित्र होतं. त्याचबरोबर राज्याचे उपमुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस, पालकमंत्री धनंजय मुंडे, प्रदेशाध्यक्ष मा.चंद्रशेखर बावनकुळे, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथ मुंडे, जिल्ह्याच्या खा.डॉ.प्रितमताई मुंडे, आ.नमिताताई मुंदडा, आ.रमेश कराड, आ.प्रकाशदादा सोळुंके यांच्यासह अनेकांनी दुरध्वनीवर शुभेच्छा दिल्या.

एका पत्रकाराचा वाढदिवस कशा पद्धतीने साजरा होतो? हे 15 मार्च रोजी राम कुलकर्णी यांच्या निवासस्थानी पहायला मिळाले. राजकारणा पलीकडे जावुन लोक प्रचंड प्रेम करतात. कदाचित व्यक्ती स्वभावाचा सद्‌गुण कारणीभुत ठरू शकतो. तसं पाहता पत्रकार, भाजपा प्रवक्ता आणि शिक्षण संस्था आदी माध्यमांतुन ओळख असली तरी प्रगत शेतकरी हा चेहरा देखील त्यांचा लपुन नाही. वाढदिवसाच्या निमित्ताने दरवर्षी ते शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या हितचिंतकांना स्वादिष्ट स्नेहभोजन आयोजित करतात. काल 15 मार्च रोजी देखील वाढदिवसाचा सोहळा अनोख्या पद्धतीने निवासस्थानी पार पडला. अंबाजोगाई, परळी, केज, लातुर येथुन विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती खुप काही सांगत होती. विशेष म्हणजे केवळ पक्ष नव्हे तर एखाद्या माणसाचे विविधांगी रूप कसे असु शकते? अर्थात अनेक पक्षातील मान्यवर, पदाधिकारी शिवाय व्यापारी, शिक्षण तज्ञ, डॉक्टर, असंघटित कामगार, मित्र परिवार, वारकरी संप्रदाय, शेतकरी, कष्टकरी आदी वर्गातील व्यक्तींनी निवासस्थानी येवुन शुभेच्छा दिल्या.

सकाळी 9 वाजल्यापासुन शुभेच्छा देणाऱ्यांची गर्दी रात्री 11 वाजेपर्यंत सुरू होती. 15 मार्च आणि कुलकर्णी यांचे निवासस्थान हे समीकरण आता शहरात ओळखीचे होवुन बसले. आर.टी.देशमुख, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, रमेश आडसकर, राजकिशोर मोदी, जिल्हा संघ कार्यवाह बिपीन क्षीरसागर, पृथ्वीराज साठे, दत्ता पाटील, राजेश कराड, शेख रहीम भाई, विनोद सामंत, अशोक जैन, ॲड.मकरंद पत्की, सभापती महादेव तोंडे, कमलाकर कोपले, संजय गंभीरे, अनंतदादा लोमटे, बबलु सिद्धीकी, राजेश पांडे, सचिन कागदे, दत्ता गुट्टे, बालासाहेब गित्ते, नारायण केंद्रे, बन्सीआण्णा सिरसाट, बाळासाहेब सोनवणे, गणेश कराड, अच्युतबापु गंगणे, पक्षाचे सर्व पदाधिकारी, डॉ.सुरेश खुरसाले व त्यांचे सहकारी, अधिष्ठाता डॉ.धपाटे व त्यांचे सहकारी, डॉ.सुधीर धर्मपात्रे मित्र परिवार, बबनभैय्या लोमटे, दाजीबा लोमटे, जेष्ठ पत्रकार नानासाहेब गाठाळ, गजानन सेवा मंडळ, प्राचार्य डॉ.मुकूंद देवर्षी व सर्व स्टाफ, मुख्याध्यापक श्री आडे आणि सर्व स्टाफ, प्राचार्य शिंदे मॅडम सर्व स्टाफ, डिवायएसपी श्री चोरमले, जिल्हा पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकुर, गुड मॉर्निंग ग्रुपचे प्रमुख महेश काका लोमटे आणि सहकारी, विजयराव वालवडकर, किरणदादा कोदरकर, आप्पा यादव, अनंत भोसले, यांच्यासह सर्व पत्रकार, मान्यवर प्रमुख, जीवाभावाचे मित्र परिवार आदींनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भेटुन शुभेच्छा दिल्या. खरं तर नंदकिशोर मुंदडा आणि जेष्ठ पत्रकार अ.र.पटेल यांच्या सुचनेवरून सात वर्षापुर्वी अशा प्रकारे वाढदिवस साजरा करण्याची आगळी वेगळी परंपरा सुरू झाली. ती प्रक्रिया अखंडीत ठेवण्याचे काम सुरू ठेवल्यामुळे नंदकिशोर मुंदडा यांनी कौतुक करताना कुलकर्णी कुटुंब परिवार आमच्यापैकीच असुन सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग नेहमीच असतो. तीस वर्षापासून आमचा असलेला स्नेह जीवाभावाचा या शब्दांत मुंदडा यांनी प्रतिक्रिया दिली. बाकी काही असले तरी थाटामाटाने वाढदिवस साजरा झाला हे नक्कीच.















मांडणी व सजावट
अतुल ह. खंडागावकर
7218340512




# जातीय नेतृत्व आणि राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी


**केवळ भारतीय राजकारणातच नव्हे तर जेथे प्रस्थापित आणि उदयोन्मुख अशी रस्सीखेच चालू असते, त्या सर्व ठिकाणी प्रस्थापित झालेली राजकारणी मंडळी या ना त्या कारणाने नवीन येऊ घातलेल्या नेतृत्वास वेगळ्या वाटेने जाण्यास भाग पाडतात. प्रसिध्दी, लोकप्रियता आणि भारावलेपण या आवर्तात एक प्रकारची मोहिनी असते, जी नेहमीच भुरळ घालत असते. भारताच्या बाबतीत ह्या मोहिनीचे प्रभावी अस्त्र म्हणजे जातीय अस्मितेची चेतना. ही जात जाणीव झाल्यानंतर ती मोडून काढली पाहिजे की आणखी घट्ट केली पाहिजे, यातून नेतृत्वाचे दोन मार्ग समाजासमोर येतात.**



## क्षितिजापल्याड

जात जाणिवेतून निघालेला एक मार्ग अत्यंत आकर्षक, तात्काळ फलप्राप्ती मिळवून देणारा, पण इतरांपासून तोडणारा म्हणून नकारात्मक दिशेने मार्गस्थ होणारा तर दुसरा मार्ग तेवढाच कठीण, स्वत्वाची आणि सत्वाची परीक्षा घेणारा आणि सर्वांना सामावून घेत पुढे जाणारा. भारतीय राजकारणात नवीन नेतृत्व येणे थांबले आहे. नेतृत्व निर्माणासाठी चळवळ आवश्यक आहे. चळवळीसाठी समस्येची जाणीव आणि जाणिवेसाठी मनाची व्यापकता आवश्यक. समाजातील चळवळ्या मंडळींनी खऱ्या अर्थाने व्यापक होणे, हे कोणत्याच प्रस्थापितांस आवडणारे नसते. त्याचे कारण असे सर्वसमावेशक, सहिष्णू नेतृत्व पुढे आल्यास आपली किंमत कमी होईल ही यामागची धास्ती. मग कोणाला त्या त्या जातीय सेलचा प्रमुख बनविणे किंवा आपल्या जातीच्या प्रश्नापुरतेच त्यास बंदिस्त करणे हे ओघाने आलेच. कोणतीही एक मागणी घेऊन आम्ही फक्त समाजकारण करत आहोत आणि त्याचा राजकारणाशी दुरान्वयानेही संबंध नाही, असे कोणी म्हणत असेल तर ही शुद्ध थाप असते किंवा ती समाजासोबतच स्वतःची देखील फसवणूक असते. कारण दृश्य स्वरूपात काय करावे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार राजकारणातून मिळत असेल तर समाजकारणाचे सोवळे परिधान करण्यात काय अर्थ आहे. समाजकारणातून फार तर तुम्ही प्रबोधन करू शकता, नियम बनवू शकणार नाहीत. म्हणूनच समाजकारणाला कंटाळलेली मंडळी एक ना एक दिवस ते सोडून हरी हरी म्हणत तर बसतील किंवा राजकारणात तरी येतील ते याच कारणांमुळे. आता हे सर्व प्रस्थापित मंडळींना माहीत असते. त्यामुळेच जे कोणी समाजकारणाशी संबंधित नवीन मंडळी असतात त्यांना जुनी जाणती मंडळी एका विशिष्ट गटापुरतीच ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. भारताची खरी ओळख धार्मिकतेवर नसून ती जातीय अंगाने आहे. त्यामुळे इथली प्रत्येक जात अल्पसंख्य आहे. मग कोणत्याही अल्पसंख्य गटाला कधी चुचकारून तर कधी धाकदपटशा दाखवून आपल्या पद्धतीने वागविता येते, हे प्रस्थापित मंडळींना पक्के माहीत असते. आज भारतात सर्वमान्य होईल असे कोणत्याही पक्षांतील नेतृत्व हे किमान साठीच्या पुढेमागे आहे. त्यांच्यानंतर पुढे काय? हा प्रश्न कोणाला पडत नसेल तर आम्ही मुर्खांच्या नंदनवनात वावरतोय असेच म्हणावे लागेल. विद्यार्थी चळवळी, शेतकऱ्यांच्या चळवळी, कामगारांच्या चळवळी किंवा अन्य सामुदायिक चळवळी संपल्यागत झाल्यामुळे जे एक सर्वमान्य नेतृत्व पुढे यायला पाहिजे ते येत नाही. असे नेतृत्व पुढे येऊ नये असे सर्व राजकीय पक्षांतील प्रस्थापितांना वाटते. या बाबतीत त्यांचे मतैक्य आहे. कारण यातच त्यांचे सौख्य सामावलेले आहे. ह्या सौख्याच्या प्रवाहात मग कोणी दादासाहेब, भैय्यासाहेब, भाऊसाहेब, अण्णासाहेब, धाकटेसाहेब तर कोणी बंटीसाहेब तर कोणी बबलीसाहेब जनतेच्या मानगुटीवर आहेतच. नेत्यांच्या ज्या मुलांकडे पाहून कीव वाटावी अशी

मुले बापाच्या धोतराचा पदर धरून राजकारणात येतात. ह्यांना शंभराचा खुर्दा दिला तर रात्रभर हिशोब जुळणार नाही त्यांनी आमचे नेते म्हणून पुढे यावे, हे म्हणजे फारच झालं. म्हणून बहुजनातील विस्थापितांच्या नादिष्ट मंडळींना राजकारण करायचे असेल तर सर्वसमावेशक करा अन्यथा स्वतःचे आणि समाजाचे वाटोळे करू नका. ते करण्यासाठी वंशपरंपरा आहेच की. हा काळ अत्यंत जिकिरीचा म्हणावा लागेल. कारण राजकारणात कोणताच विधिनिषेध पाळावयाचा नसतो किंवा नैतिकता गुंडाळून ठेवावी लागते असे आपले एक सर्वमान्य मत बनत चालले आहे. यास जबाबदार आपणच आहोत. कारण सत्तेचे आणि संपत्तीचे केंद्रीकरण झाल्यास अगदी समाजवादी लोकसत्तेखाली देखील समाजावर बलात्कार करणे शक्य आहे, असे आचार्य जावडेकर म्हणायचे. ही सत्ता विकेंद्रित होऊन सामान्यांतून नेतृत्व पुढे आले पाहिजे. जातीय मिषाने पछाडलेले, वैयक्तिक स्वार्थापोटी आसुसलेले आणि अल्पसंतुष्टांचे सरदार होऊ



इच्छिणाऱ्यांनी या देशाचा इतिहास आणि भूगोल जरा बारकाव्याने आणि समजून घेण्याच्या उद्दशाने वाचावा. नाहीतर पाकिस्तान आणि भारताच्या मुद्द्यात सियाचीनने नाक कशाला खूपसायचे असे हास्यास्पद वक्तव्य समोर येऊन लोकांचे मनोरंजन होते. या भारतातून जात कधी जाईल तेव्हा जाईल, पण जोपर्यंत ती अस्तित्वात आहे तोपर्यंत मात्र आपण सर्व एक आहोत या भावनेतूनच वागायला हवे. हजारो वर्षांपासून बंधुभावाची निर्माण झालेली घडी - मग

ती भांडत, वाद घालत का असेना - कोणी अत्यंतिक द्वेषाने मोडून काढू पाहत असेल तर ते समाजहिताचे ठरणार नाही. प्रस्थापित राजकारणी तुम्हाला जाणीवपूर्वक जातीच्या चौकटीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न करणार. तो चक्रव्यूह भेदून बाहेर पडण्याचे कसब नवोदितांनी आत्मसात करायलाच हवे. समाजात निर्माण होणाऱ्या नवीन नेतृत्वाने या काही गोष्टी समजून घायला हव्यात. तुम्ही कोणत्याही जातीचे असा, तुमच्या धारणा काहीही असोत, जर तुम्ही एकदा का जातीय प्रतिमेत अडकलात तर तुम्हांस फार तर राज्यसभा, विधान परिषद किंवा एखादे आर्थिक विकास महामंडळ पदरात पडेल; परंतु तुम्ही राजकारणातून हद्दपार झालेले असाल. अशी कितीतरी क्षमता असणारी मंडळी काही चुकांमुळे जातीय प्रतीमेतून बाहेर पडू शकले नाहीत. जेथे सर्वांच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या महामानवांना आम्ही त्यांच्या जातीपुरते बंदिस्त करण्यात मागेपुढे पाहत नाही, तेथे जात्याच जातीयवाद करणाऱ्या मंडळींचे भवितव्य काय असणार आहे? हे न सांगताच कळते. तेव्हा तुम्ही किती त्यागी आहात की कसे आहात यापेक्षा तुमचा त्याग कशासाठी आहे हे वारंवार तपासून घेतलेले कधीही चांगले. त्यागाचा कॉलेस्ट्रॉल वाईट असू नये एवढीच अपेक्षा. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# जिकडं उजवीबाजू तिकडं उठबस करणारी माणसं निष्ठावंत नसतात



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आयुष्यात वेळ कधी बदलेल हे कोणालाही सांगता येत नाही.पण वेळ चांगली असो वा वाईट ज्यांची उठबस बदलतं नाही ते निष्ठावंत आणि जे वेळेनुसार उठ बस बदलतात ते निष्ठावंत नसतात.निषठेच्या बाजारात स्वार्थाचा बोलबाला दिवसेंदिवस आपले पाय मजबूत करत आहे.आपण सगळे मिळून त्याला रोखण्या ऐवजी खतपाणी घालतोय. खतपाणी भरपुर घातल्यावर पिक तर भरोघास येईलच या मध्ये शंका नाही. निष्ठावंत माणसं हि आपल्या माणसांसाठी छातीचा कोट करून उभा रहातात हा ईतिहास आहे. समर्पित भावना असेल तर लाभाचा स्वार्थाचा विचार डोक्यात नसतोच. समर्पण हे कधीच बदलणार नसतं अथवा त्याच स्वरूप बदलतं नाही.**

एकदा समर्पण निर्माण झाल कि हि भावना कोणत्याही कारणाने तहायात बदलतं नाही. आणि जी बदलते ती निष्ठा नसते . स्वार्थाच्या बाजारात निष्ठेचा तुटवडा हा दिवसेंदिवस निर्माण होतं चालला असला तरी देखील माणसं इतक्या प्रचंड वेगाने बदलतील याची कल्पना करणं जरा कठीणच आहे. सामाजिक पातळीवर याचे खुप मोठे घातक परिणाम येणाऱ्या काळात दिसतील या मध्ये शंका नाही.निष्ठा म्हणजे समर्पण स्वार्थ,मोह,लाभा, स्वहित,याचा लवलेश सुद्धा आजुबाजुला फिरकत नाही.म्हणून समर्पण निर्माण होत. जसा जसा काळ बदलतोय तसं माणसं वेगाने बदलतं आहेत.हा बदल नाते संबंध, कौटुंबिक पातळीवर सुद्धा वेगाने आपला प्रभाव निर्माण करतो आहे.जीवनात शब्दाच खुप मोठा वजन महत्व असतं.इतिहासाची पान चाळाली तर शब्दांच महत्व आणि वजन लक्षात येईलच.त्यावेळी शब्दांच वजन पेलण्याची ताकद असणारी माणसं होती.पण आज शब्द पाळणारी माणसं अपवादाने आढळतात हा वेळेचा काळाचा प्रभाव आहे.एक काळ शब्दावर देह त्याग करणारी माणसं होती.आज जरी प्रगती झाली असली आणि भौतिक संसाधन जरी वाढली असली तरी देखील शब्दांच वजन पेलणारी माणसं हि दुर्मिळ झाली आहेत हेही तितकेच खरे आहे. पशु पक्षी यांच्या संदर्भात ठिक आहे.पण माणसाचं असं आचरण माणुसकी संपवणार ठरू शकतं. जिथं साखर तिथं मुंग्या,जिथं गुळाची ढेप तिथं मुंगळे हे समिकरण सृष्टी वरील मुक्या जीवांच्या संदर्भात जरी बोललं जातं असलं तरी देखील खरया अर्थाने हे जीवसृष्टी वरील सगळ्यात हुशार चतुर विवेकशील मनुष्य प्राण्यासाठी तंतोतंत लागू पडत आहे.माणसांची जीवन जगाताना काही तत्त्व आहेत. ज्याला आपण मानवी मुल्य असं संबोधतो.पण मानवी मुल्य आज किती प्रमाणात टिकून आहेत. हा सध्या तरी संशोधनाचा भाग आहे.जीवाला जीव देणारी जीवा भावाची माणसं हि लाभ नफा स्वार्थ मोह या पलिकडे असतात.जिथ फक्त देण्याची भावना असते.पण जसं जसं वेळ बदलतं चालली आहे तसं तसं ही जीवाभावाची माणसं कमी होत चालली आहेत.निस्वार्थ भावनेने सोबत राहणारी माणसं आता दुर्मिळ झाली आहेत.हे जरी विलक्षण सत्य असल तरी क्षणात साथ बदत स्वतःच हित जोपासणारी माणसं सध्या सर्वदूर आहेत. कोणतही क्षेत्र असेल त्या क्षेत्रात अवाजवी स्पर्धा बोकाळली आहे.त्याचा परिणाम म्हणून निष्ठा हा शब्द दुर्मिळ होत चाललं आहे.

त्याच बरोबर निष्ठावंत माणसांची संख्या देखील हाळुहळु कमी होत चालली आहे.जिकड उजवीबाजू सरस बाजु अथवा लाभाची शक्यता तिकडं उठ बस करणारी माणसं वाढत चालली आहेत. पण अशी माणसं हि खरया अर्थाने निष्ठावंत नसतात.काळ युग क्षेत्र कोणतही असु द्या स्वार्थ ,मोह स्वहित साध्य करणारी मंडळी हि ज्या त्या काळात सक्रिय असतेच.फक्त त्या काळात संख्या कमी होती आता प्रचंड वाढली आहे फरक तो इतकाच आहे. फक्त अशी माणसं हि कोणाचीही खरी निष्ठावंत नसतात ते फक्त सरस उजवी लाभाची बाजु पाहुण



आपला वावर तिकडं वाढवतात त्यांचा निष्ठा तत्त्व या बाबाशी काही संबंध नसतो.लाभ संपला संबंध संपला अशीच कहिशी रणनिती आशा माणसांची असते.पण आपली उठ बस हि नेहमी निष्ठापूर्वक असली पाहिजे हेच सार्थक असतं.आपल्या संपर्कातील माणसं कशी आहेत हे आपल्याला स्वतःला समजलं पाहिजे आणि ते समजणं गरजेचं आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

रविवार, १७ मार्च २०२४

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २०४

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 17 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-204 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05


# लोकसभेच्या रणधुमाळीला सुरुवात!

## १९ एप्रिलपासून निवडणूक : ४ जून रोजी मतमोजणी होणार



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशात अखेर लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजला असून 19 एप्रिलपासून लोकसभा निवडणुकीला सुरुवात होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सात टप्प्यातील निवडणूक कार्यक्रम शनिवारी जाहीर केला. महाराष्ट्रातही ५ टप्प्यांत निवडणूक होणार आहे. यंदा १८ व्या लोकसभेसाठी निवडणूक होत आहे. २०१९ साली स्थापन झालेल्या मोदी सरकारचा कार्यकाळ ६ जून रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे देशात लोकसभेच्या निवडणुका घेण्यात येत आहे. त्यानुसार, १९ एप्रिलपासून लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला सुरुवात होणार असून २ जून रोजी सात टप्पे संपणार आहेत.**



**पहिला टप्पा : 19 एप्रिल एप्रिल** : महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातील मतदान 19 एप्रिलला होणार असून यावेळी पाच मतदारसंघात मतदान होणार आहे. 19 एप्रिलला विदर्भातील सहा मतदार संघात मतदान पार पडणार आहे. रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर 19 एप्रिलला. **दुसरा टप्पा : 26 एप्रिल 2024** : राज्यात 26 एप्रिल 8 मतदारसंघात मतदान होणार असून यावेळी वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, बुलढाणा या मतदारसंघात मतदान होईल. **तिसरा टप्पा : 7 मे 2024** : राज्यात 7 मे रोजी 11 मतदारसंघात मतदान होणार आहे. रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले या मतदारसंघात 7 मेला मतदान होईल. **चौथा टप्पा : 13 मे 2024** : राज्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या 11 मतदारसंघात 13 मेला मतदान पार पडेल. **पाचवा टप्पा : 20 मे 2024** : महाराष्ट्रातील पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान 20 मेला होईल. धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई दक्षिण, मुंबई उत्तर-पश्चिम, मुंबई उत्तर-पूर्व, मुंबई उत्तर-मध्य, मुंबई दक्षिण-मध्य मतदारसंघात 20 मे रोजी एकूण 13 मतदारसंघात मतदान पार पडेल.

देशात लोकसभा निवडणुका सात टप्प्यात होणार असून, पहिल्या टप्प्यातील निवडणुका १९ एप्रिलला होणार आहेत. पहिल्या टप्प्यात २१ राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. पहिला टप्पा १९ एप्रिलला, दुसरा टप्पा २६ एप्रिलला, तिसरा टप्पा ७ मे रोजी, चौथा टप्पा १३ मे रोजी, पाचवा टप्पा २० मे रोजी, सहावा टप्पा २५ मे रोजी आणि शेवटचा सातवा टप्पा १ जून रोजी होणार आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातही पाच टप्प्यात निवडणुका होणार आहेत. २०२४ ची महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूक विशेष असणार आहे. दोन गटात विभागलेले राष्ट्रवादी आणि शिवसेना आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे कोणता पक्ष किती जागा जिंकतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. महाराष्ट्रात पाच टप्प्यांत १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे, २० मे रोजी मतदान होणार आहे. महाराष्ट्रात ५ टप्प्यांमध्ये निवडणूक होणार असून, पहिला टप्पा १९ एप्रिल २०२४ रोजी पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात रामटेक, नागपूर, भंडारा गोंदिया, गडचिरोली चिमूर, चंद्रपूर या पाच मतदारसंघांत मतदान होणार आहे. तर २६ एप्रिल २०२४ च्या दुसऱ्या टप्प्यात ८ मतदारसंघांमध्ये निवडणुका होणार असून, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ वाशीम, हिंगोली, नांदेड, परभणी या मतदारसंघांचा समावेश आहे. तसेच तिसरा टप्पा हा ७ मे रोजी होणार असून, यात रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले अशा ११ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. विशेष म्हणजे चौथा टप्पा १३ मे रोजी पार पडणार असून, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी, बीड या मतदारसंघांचा समावेश आहे. तसेच पाचवा टप्पा २० मे २०२४ रोजी पार पडणार असून, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण अशा एकूण १३ मतदारसंघांत मतदान होणार आहे.

महाराष्ट्रात लोकसभेच्या एकूण ४८ जागा आहेत, ८० जागांसह उत्तर प्रदेश नंतर महाराष्ट्र राज्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना एकत्र निवडणूक लढली होती. तेव्हा एनडीएकडे ४१ जागा होत्या. भाजपाने २३ जागांवर विजय मिळवला, तर शिवसेनेला १८ जागांवर विजय मिळाला. याशिवाय शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ४, काँग्रेस एक आणि असदुद्दीन ओवैसी यांच्या पक्षाने एका जागेवर विजय मिळवला होता.



# सिरम कंपनीकडून मोदींना कोट्यवधी रुपयांचा हप्ता : राहुल गांधी

## शिवसेना फोडून मविआ सरकार पाडण्यासाठी भाजपाने वापरला ईलेक्टोरोल बाँडचा पैसा

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** नरेंद्र मोदी भ्रष्टाचार संपवण्याची भाषा करतात आणि तेच मोदी इलोक्टोरल बाँडच्या माध्यामातून जगातील सर्वात मोठे खंडणी वसुली रॅकेट चालवतात. कोविडमध्ये लाखो लोकांचा मृत्यू होत होता, पंतप्रधान नरेंद्र मोदी जनतेला टाळ्या, थाळ्या वाजवण्यास सांगत होते आणि दुसरीकडे कोविडची लस बनवाणारी सिरम कंपनी कोट्यवधी रुपये इलोक्टोरल बाँडमधून मोदींना देत होती असा गंभीर आरोप खासदार राहुल गांधी यांनी केला आहे.

भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान ठाण्यात सभेत बोलताना खासदार राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्ष व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला, ते पुढे म्हणाले की, इलोक्टोरल बाँड हे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे मोठो खंडणी वसुली रॅकेट आहे. या रॅकेटमधून कार्पोरेट कंपन्यांवर दबाव टाकून पैसे उकळले जातात.याविरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केल्यास अमित शाह ईडी, सीबीआय, आयकर विभागाकडून त्यांचा आवाज दडपून टाकतात. शिवसेना पक्ष फोडून जे आमदार बाहेर पडले ते काय असेच मोफत गेले का ? महाराष्ट्र, गोवा राज्यातील सरकार पाडण्यात याच इलोक्टोरल बाँडमधून कमावलेल्या खंडणीच्या पैशाचा वापर केला गेला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन केले पण या सोहळ्याला आदिवासी, दलित, मागास, गरिब समाजातील कोणालाही बोलावले नाही. नरेंद्र मोदी, मोहन भागवत, फिल्मस्टार्स, क्रिकेटपटू, अंबानी, अदानी असे मोजक्या लोकांनाच निमंत्रित केले होते. देशाच्या राष्ट्रपती आदिवासी असल्याने त्यांनाही राम मंदिर उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रण दिले नाही, झारखंडचे मुख्यमंत्री आदिवासी असल्याने त्यांनाही राम मंदिर उग्घाटन सोहळ्याला बोलावले नाही. देशात ओबीसी, दलित, मागास, आदिवासी समाजाची ८८ टक्के लोकसंख्या आहे पण प्रशासनासह महत्वाच्या क्षेत्रात त्यांची भागिदारी अत्यंत कमी आहे असेही राहुल गांधी म्हणाले.

# धुळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ क्लबचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील भीम नगर येथील अंजनाआई उंदा शिरसाठ नगर येथे माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांच्या संकल्पनेतून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेल्थ क्लब चे उद्घाटन धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ, उद्योजक राहुल अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांच्या कारकीर्द मध्ये भीम नगर व परिसरात विविध विकास कामे केली परंतु तरुण मुलांनी व्यसनाधीन नव्हता शरीरसृष्टीकडे लक्ष द्यावे यासाठी सुसज्ज हेल्थ क्लब निर्माण करण्यात आला. यावेळेस धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर पाटील, उपाध्यक्ष अतुल पाटील, सामाजिक कार्यकर्ते अनिल पाटील, अध्यक्ष धनराज शिरसाठ, किरण ढिवरे यांच्या प्रमुख उपस्थित हा कार्यक्रम पार पडला यावेळेस परिसरातील गौतम शिरसाठ, सतीश अहिरे, सुनील मोरे, राज आगळे, मोनू सोनार, गुड्डू मोरे, नीरज चव्हाण, प्रवीण शिरसाठ, सुनील पाटील, सोनू मोरे, सागर शिरसाठ, मनोज देवरे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# मराठ्यांना न्याय दिला नाही तर आयुष्यभर गुलाल लागू देणार नाही : मनोज जरांगे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** निवडणूक आचारसंहितेच्या नावाखाली मराठ्यांना न्याय दिला नाही तर मग यांना आयुष्यभर गुलाल लागू देणार नाही असे मनोज जरांगेंनी म्हटले आहे. आता मराठ्यांना हा निर्णय घ्यावाच लागेल. हजारो पोरांवर गुन्हे दाखल झाले आहेत, माता माऊली रस्त्यावर आहेत. पूर्वीच्या राजाला दया यायची या राजाला दया येत नाही. मी महाराष्ट्राच्या समाजाला हे सांगतो आहे की आचारसंहितेच्या नावाखाली मराठ्यांचे प्रश्न दाबले जात आहेत, असा आरोप मनोज जरांगेंनी केला आहे. मराठा समाजाच्या नाराजीची लाट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना अंगावर घ्यायची नसेल तर त्यांना सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करावीच लागेल. अन्यायकारक निर्णय लादून चालणार नाही. सात महिन्यांपासून मराठे रस्त्यावर आहे. त्यांची चेष्टा करु नका अन्यथा समाजाला नाईलाजाने निर्णय बदलावा लागेल. मराठा आरक्षणाचा प्रश्न ज्वलंत आहे. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी बाकी आहे. निवडणूक पुढे ढकलली जाईल असे वाटते आहे. आमच्या बाजूने निर्णय झाला नाही तर आम्हालाही निर्णय घ्यावा लागेल असा इशाराच मनोज जरांगेंनी दिला आहे. आता सरकार नेमका काय निर्णय घेणार? हे पाहणं आता महत्त्वाचं असणार आहे. आम्ही ज्यांना मोठे केले त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा होत्या असेही जरांगेंनी म्हणाले. आत्ताच्या राजाला स्वार्थ आणि सत्ता दिसते आहे. अन्यायकारक निर्णय झाले तर आम्ही शांत बसणार नाही. राजकारण्याचा सर्वाधिक जीव गुलालात असतो. आता हे असे वागणार असतील तर गुलाल यांना आयुष्यभर लागू द्यायचा की नाही हे मराठा समाजाला ठरवावे लागेल.

# भारत-युरोप : मुक्त व्यापार पर्वाचा अभ्युदय



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**कौटिल्याने अर्थशास्त्रात म्हटल्याप्रमाणे, 'अर्थ मूलौ धन कामः' अर्थ हे सर्व कार्या मूळ आहे. जागतिक व्यापार करारातसुद्धा खुल्या अर्थकारणाला उत्तेजन देण्याचे सामर्थ्य असते. मुक्त व्यापाराला सनातनी अर्थशास्त्रात लेसे - फेअर इकॉनॉमी असे म्हटले जाते. ॲडम स्मिथच्या मते, वस्तू व सेवा निर्मितीचे प्रत्येकाला स्वातंत्र्य देणे हे मुक्त व्यापाराचे अंतिम उद्दिष्ट आहे. कारण त्यामुळे अनेक घटक संतुष्ट होतात आणि देशी तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन मिळते आणि मुक्त व्यापारामुळे बाजारपेठा खुल्या होतात. ॲडम स्मिथने केलेल्या या व्याख्येचे उपयोजन युरोप, अमेरिकेने नव्हे तर भारताने अवलंबिले. ॲडम स्मिथ यांनी 'राष्ट्राच्या संपत्तीची कारणमिमांसा' या ग्रंथात असे म्हटले आहे की, सर्व उत्पादनाचा अंतिम व प्रमुख हेतू हा उपभोग हा असतो आणि उत्पादकाचा हेतू साध्य करणे ही सर्वांची जबाबदारी असते आणि उत्पादकाचा हेतू हा सर्वांनी मिळून साध्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.**

जागतिक व्यापार करारामुळे जगभरातील उपभोक्त्यांना वस्तू व सेवांचा सुयोग्य लाभ घेण्याचे स्वातंत्र्य मिळत असते. युरोप आणि भारतामधील व्यापारी, आर्थिक व औद्योगिक भूगोल या करारामुळे समृद्ध होणार आहे.

१० मार्च हा दिवस भारताच्या आर्थिक इतिहासात एक नवी कलाटणी देणारा ठरला आहे. भारताचे वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी इफ्टा या चार राष्ट्रांच्या समुहाशी मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या. हा समूह युरोपियन युनियनचा भाग नाही. त्याचे एक स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यामुळे या समुहाबरोबरचा करार भारताला खरोखरच फलदायी ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी या कराराचे वर्णन एक नवी कलाटणी देणारा ऐतिहासिक प्रसंग असे केले. हा असा एक पूल आहे की, ज्यावरून वाटचाल केल्यानंतर आर्थिक विकासाच्या अनेक नव्या संधी पुढे उपलब्ध होत आहेत. त्यामुळे या व्यापार कराराचे महत्त्व समजून घेणे आगत्याचे आहे. त्याचे कारण असे की, भारताने आजवरच्या वाटचालीत मिळविलेला हा एक निर्णायक टप्पा आहे. त्यामुळे भारतात औद्योगिक गुंतवणूक वाढणार आहे आणि शिवाय रोजगार निर्मितीलाही मोठी संधी लाभत आहे. भारतीय अर्थव्यवस्था आज कात टाकण्याच्या अवस्थेत आहे. त्यामुळे ३ ट्रिलियन्स डॉलर्सची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन्स डॉलर्स होईल आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ती जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल. भारताने या दिशेने टाकलेले हे एक आणखी महत्त्वाचे पाऊल आहे.प्रमुख उपलब्धी कोणत्या ? इफ्टा समूहाने भारताशी केलेला हा करार एवढा महत्त्वाचा आहे की, त्यामुळे शंभर बिलियन डॉलर्स एवढी मोठी गुंतवणूक होणार आहे. तसेच १५ वर्षांच्या दरम्यान ही गुंतवणूक सतत वाढत जाईल आणि या बदल्यात सहभागी होणाऱ्या चार देशांच्या औद्योगिक उत्पादनावरील आयात शुल्कही हळूहळू उठविण्यात येईल. यामध्ये चार देशांचाही फायदा आहे आणि भारताचाही फायदा आहे. विशेष म्हणजे त्यामुळे भारतात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन म्हणजे इफ्टा या संघटनेचे युरोपाच्या अर्थव्यवस्थेत एक सन्मानीत स्थान आहे. या संघटनेने तयार केलेल्या कराराच्या अभ्यासपूर्ण मसुद्यामुळे अनेक नव्या गोष्टी साध्य होणार आहेत. हा करार सुमारे १५० पानांचा असून त्यामध्ये सुरचित व संलग्न १४ प्रकरणे असून त्यामधील मुख्य भर बाजारपेठेची पोहोच वाढवण्यावर आहे. तसेच अन्य घटकांमध्ये व्यापार सवलती, व्यापार वृद्धीसाठी उपाय, मानवी व वन्यपशूंचे स्वास्थ्य व वानस्पतिक आरोग्य, व्यापारातील तांत्रिक अडचणी, गुंतवणूकीची प्रमाणबद्धता, बाजारपेठेतील सेवा क्षेत्रातील पोहोच, बौद्धिक संपदा अधिकार यांचा समावेश होतो. हा करार अन्य मुक्त व्यापार करारासाठी एक परिपूर्ण दस्तऐवज म्हणून मार्गदर्शक ठरणार आहे. १६ वर्षांच्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर अनेक फेऱ्या झाल्या आणि त्यानंतर हा मसुदा मान्य करण्यात




आला. त्यातील विविध कलमांचा, तरतुदींचा अभ्यास केला असता असे दिसते की, विशेषतः या कराराचा फायदा औषधे व रसायने उद्योग तसेच मशिनरी म्हणजे तंत्र उद्योग, स्वयंचलित वाहन उद्योग आणि विविध प्रकारच्या उत्पादन क्षेत्रातील समुहांना होणार आहे आणि त्यामुळे भारतात विविध प्रकारच्या गुंतवणूक क्षमताही वाढतील आणि रोजगाराच्या नव्या संधीही प्राप्त होतील. इफ्टा या समुहामध्ये स्वित्झर्लंड, नॉर्वे, आइसलँड तसेच लिक्टेनस्टीन या चार देशांचा समावेश आहे. यापैकी कोणीही युरोपियन संघाचे (ई.यू.चे) सदस्य नाहीत. म्हणजे, या करारामुळे या चार देशांना १४२ कोटी लोकसंख्या असलेल्या आणि वर्धिष्णु अशा जगातील मोठ्या मध्यमवर्गीय बाजारपेठेत प्रवेश मिळेल. भारतामध्ये जगातील सर्वात मोठा मध्यम वर्ग आहे आणि भारत देश हा एक मोठी बाजारपेठ म्हणून पुढे आला आहे. पियुष गोयल यांनी म्हटल्याप्रमाणे या चार देशांना मिळणारा जगातील मोठ्या अर्थव्यवस्थेतील प्रवेश हा त्यांच्या राष्ट्रीय जीवनामध्ये नव्या संधी घेऊन येणार आहे. सामाजिक व आर्थिक बदल हे निर्णायक स्वरूपाचे असले की, त्यातून बरेच काही चांगले रचनात्मक व सकारात्मक कार्य घडते. पी.व्ही. नरसिंहराव यांच्या काळापासून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळापर्यंत आर्थिक वाटचालीचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, मुक्त व्यापारामुळे अर्थव्यवस्था गतिमान बनत आहे. गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळत आहे. तसेच परस्पर विकास व समृद्धीचे अनेक दरवाजे खुले होत आहेत. गेल्या दोन वर्षात भारताने ऑस्ट्रेलिया आणि संयुक्त अरब अमीरात या दोन देशासह १३ देशांशी मुक्त व्यापाराचे करार केले आहेत. आता हा आणखी एक नवा यशाचा शिरपेज अर्थव्यवस्थेच्या मुकुटात शोभून दिसत आहे. त्यामुळे भारत एक समर्थ अर्थव्यवस्था असे स्थान युरोपच्या नकाशात निर्माण करत आहे. हा मुक्त व्यापार करार म्हणजे पाच देशातील अर्थकारणाला नवी संजीवनी देणारा आहे. वाढता वाढता वाढे या न्यायाने भारताचा हा रेटा असाच वाढत राहील आणि आता ब्रिटनबरोबर सुद्धा मुक्त व्यापार कराराची बोलणी अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०३० पर्यंत वार्षिक निर्यात गतीने पुढे वाढविण्याचा संकल्प आहे. युरोपातील देशाशी केलेल्या आर्थिक करारामुळे हे स्वप्न साकार हे होण्यासाठी चांगलेच वातावरण तयार झाले आहे. या कराराचा उभयपक्षी मोठा फायदा होणार आहे. विशेषतः स्वित्झर्लंडच्या बाबतीत असे म्हटले जाते की, या देशाबरोबर होणाऱ्या आयातीत वृद्धी होणार आहे. तसेच भारत सुद्धा या चारही देशावर असलेले आयात कराराचे नियम व निर्बंध हळूहळू शिथिल करून ते पूर्णपणे उठवण्याची योजना आखत आहे. त्यामुळे या चारही देशातील महत्त्वाकांक्षी औद्योगिक उत्पादन कंपन्यांना वर्धिष्णु बाजारपेठेत प्रवेश करणे सुसह्य होऊ शकेल. आज अनेक नॉर्वेजियन कंपन्या भारतामध्ये व्यापारासाठी ४० टक्क्यापर्यंत उच्च आयात कर भरतात. अशा प्रकारचा आयात कर असल्यामुळे व्यापारात अनेक अडचणी येतात. हळूहळू टप्प्याटप्प्याने हा आयात कर कमी करण्यात येणार आहे किंवा उठविण्यात येणार आहे. त्याचाही फायदा दोन्ही देशांमध्ये व्यापार संबंधात सुधारणा होण्यासाठी होईल. हा व्यापार करार अत्यंत महत्त्वकांक्षी, धाडसी आणि तेवढाच भविष्यावर आशा केंद्रित करणारा आहे. त्यामुळे भारतामध्ये दरवर्षी १० लाखापर्यंतचे रोजगार वाढणार आहेत. खेळते भांडवल, अनेक नवनवे उद्योग आणि वस्तूंचा व्यापार तसेच उभय समूहातील वस्तू व सेवांच्या आदान-प्रदानामुळे व्यापाऱ्याच्या संधी वाढतील आणि त्यातून रोजगार निर्मिती होईल. शिवाय ज्या प्रमुख उद्योगामध्ये हे सर्व बदल घडणार आहेत ते उद्योग भारतामध्ये याची क्षमता वाढवण्यासाठी उपयोगी पडतील. उदा. औषधे रसायने उद्योगात आज भारत जगामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारताचे स्थान उंचावण्यासाठी हा नवा करार पथ्यावर पडेल. स्वित्झर्लंडबरोबर भारत ७५ वर्ष आपल्या मैत्री व स्नेहाचे वर्ष पूर्ण करत आहे. या निमित्ताने हा करार होत आहे, ही गोष्ट समाधानाची आहे. गेल्या १५ वर्षापासून जे परिश्रम घेण्यात आले, जे कष्ट घेण्यात आले त्याची ही फलश्रुती आहे असे म्हणावे लागेल. भारत नेहमीच आर्थिक व्यापाराच्या बाबतीत सकारात्मक आणि सहानुभूतीचे धोरण घेतो. दोन्ही देशांना व्यापाराचे करार फलदायी ठरावेत, व्यापाराच्या शर्ती समतोल असाव्यात ही भारताची भूमिका असते. याच भूमिकेचे प्रतिबिंब या नव्या करारात उमटले आहे. या कराराचे भारतीय ग्राहकाला काय लाभ होतील, असा प्रश्न विचारला. त्याचे उत्तर असे की, स्वित्झर्लंडमधील घड्याळे, बिस्किटे, चॉकलेट या वस्तू भारतीय ग्राहकांना कमी दरात मिळतील, कारण या वस्तूंवरील आयात कर कमी झालेला असेल. त्यामुळे मध्यमवर्गीय भारतीय ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्याचे सामर्थ्य या करारामध्ये आहे. कॉफी, तेल व सुगंधी द्रव्ये इ. स्वित्झर्लंडमधील वस्तू भारतामध्ये कमी दरात मिळू शकतील. भारत आणि इफ्टा सदस्य राष्ट्रे २००८ पासून आर्थिक भागीदारी व व्यापारी सहकार्यासाठी परिश्रमपूर्वक चर्चा करीत होते. अनेक फेऱ्या झाल्या, अनेकवेळा वाटाघाटी झाल्या आणि त्याचे फलित १० मार्च रोजी निघाले आणि शेवटी या मुक्त व्यापार कराराला अंतिम रूप देण्यात आले. आर्थिक उदारीकरणानंतर भारताने युरोपिय समूहातील चार राष्ट्रांशी केलेला हा पहिला महत्त्वाचा करार आहे. या करारामध्ये वस्तू व सेवांचा वापर, मूळ नियम, बौद्धिक संपदा कायदे व अधिकार तसेच सेवा क्षेत्रामधील व्यापार, गुंतवणूकीस प्रोत्साहन आणि सहकार्याची नवनवीन क्षितिजे यावर भर देण्यात आला आहे. तसेच शाश्वत विकासाचे विविध घटक आणि व्यापार सुलभता अशा अनेक महत्त्वाच्या पैलूंची त्यामध्ये चर्चा करण्यात आली आहे. प्रदीर्घ अभ्यासपूर्ण असा हा अहवाल असून त्यामध्ये दोन्ही समूहातील आदान-प्रदानावर भर दिलेला आहे. कॅनडा, चीन, मेक्सिको आणि कोरियासह ४० भागीदार देश इफ्टाशी मुक्त करार करत आहेत. या सर्व देशांसह आजपर्यंत २९ मुक्त व्यापार करार इफ्टाने केले आहेत. आता हा ३० वा करार असून तो आशा पल्लवित करणारा आहे. आकांक्षा उंचावणारा आहे. मुक्त व्यापार कराराअंतर्गत दोन व्यापारी समूहामधील हे आदान-प्रदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे पूर्व आणि पश्चिम भारत व युरोपमध्ये आर्थिक सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले आहे. भारत व युरोपमधील संबंधाच्या सुवर्णयुगाची ही पहाट होय. युद्ध व तणावात नव्हे तर शांतता व विकासात जगाचे भवितव्य आहे ही भारताची भूमिका असून 'वसुधैव कुटुम्बकम्' या कल्पनेचा भारत परिपोष करीत आहे. एक विश्व, एक परिवार व एक समान भविष्य या दिशेने जी - २० नंतरचे हे दुसरे पाऊल आहे. गुप्त काळ असो, विजयनगरचे हिंदू साम्राज्य असो की, छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी साम्राज्य असो, ज्यावेळी भारतामध्ये मुक्त व निर्भय व्यापार होता, तेव्हा भारतामध्ये सुवर्णयुग येत असे. आता पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे.

# कुठे गेली ती मायाळू माणसं ?



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**बालपणापासून ते तरुण वयापर्यंत आणि तारुण्यापासून ते आजच्या प्रौढ वयापर्यंत मी अनेक व्यक्तींच्या संपर्कात आलो.इतक्या दीर्घ कालावधीत मला अनेक व्यक्तींचा सहवास लाभला. त्यापैकी काहीजण प्रेमळ,मायाळू,मदतगार, दानशूर आणि माणुसकीला जीवापाड जपणारे होते.काहीजण नुसतेच दिसायला देखणे होते. स्वभावाने मात्र तिरसट आणि संकुचित विचारांचे.काही लोक भारी महागडे कपडे घालून मिरवणारे तर काही लोक निव्वळ स्वार्थी,कामचुकार,आळशी आणि नेहमी व्यसनात बुडालेले.काही माणसे हायफाय तर काही मनाला भावनारी साधी सरळ माणसं होती. काही परक्या परंतु सुस्वभावी लोकांची आणि काही रक्ताच्या नात्यातील नातलगांची आठवण नेहमी अस्वस्थ करते. माझी आजी पारुबाई गुळवे निरक्षर होती.**



पण दररोज पहाटे आम्हाला अभ्यासाला उठवायची. रानावनात हिंडून आम्हाला रानमेवा खायला आणायची. तिच्या मैत्रिणी होत्या रुक्मिणीमाय,सारजामाय, आनसामाय, जानकामाय, इंदिरामाय, सटवामाय, भिमामाय, हिरामाय, साखरामाय. त्यांचा ग्रुप अतिशय चांगला व एकमेकींचे सुखदुःख वाटून घेणारा होता. दुपारच्या वेळी सावलीत बोलत बसल्या की सगळ्या गावाची कुंडली निघायची,सगळ्या प्रकरणांचा निपटारा होत असे.आज त्या सगळ्याजणी या जगात नाहीत. पण त्यांचा प्रेमळ स्वभाव,त्यांची ममता व त्यांच्या गोड आठवणी आजही जशाच्या तशा आठवतात.माझे वडील दामोदर गुळवे अतिशय कष्टाळू. आमच्या शिक्षणासाठी त्यांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यांनी आमच्या जीवनाचे सोने केले.परंतु, नियतीने घात केला.ब्रेन अटॅकने त्यांना जीव गमवावा लागला. ऐन सुख समृद्धीच्या काळात ते आमच्या सोबत नाहीत याची खंत आणि हूरहूर मनाला बोचत राहते. माझे थोरले बंधू नवनाथ गुळवे यांचेही आकस्मिक निधन झाले हा ही आमच्या साठी फार मोठा आघात होता.

स्वर्गीय कालिदासराव देशपांडे काका आमच्या उमरगा कोर्ट गावाचे भूमिपुत्र व थोर स्वातंत्र्यसेनानी होते.त्यांनी आमच्या गावातील अस्पृश्यता नष्ट केली. आमच्या वस्तीत येऊन त्यांनी आम्हाला शिक्षणाचे महत्त्व वेळोवेळी सांगितले.आम्हाला महापुरुषांचे जीवनचरित्रे वाचायला दिली.असे हे काका आज आमच्या सोबत नाहीत याचे दुःख वाटत राहते.आमच्या गावचे दुसरे भूमिपुत्र निवृत्तीराव पाटील हे फार मोठ्या मनाचे व दानशूर होते. १९६१ साली त्यांनी शाळेसाठी जमीन दान केली.त्यांच्यामुळे आमच्या उमरगा कोर्ट गावात शिक्षणाची गंगा आली. निवृत्ती पाटील यांच्या दूरदृष्टीला आमचा मानाचा मुजरा.

माझा एक शिक्षक मित्र नवनाथ केरबा दिंडे हा कर्तव्यदक्ष,कष्टाळू व प्रामाणिक होता.अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण पूर्ण केलेला हा गडी शिक्षकाची नोकरी करताना पगाराचा सगळा पैसा भावाबहिणींच्या शिक्षणासाठी खर्च केला. अशा या माणसाला कॅन्सर सारखा खतरनाक रोग झाला. त्यातच त्याचा अंत झाला.केवढा हा मोठा आघात त्याच्या कुटुंबीयांवर कोसळला ? अशा जीवलग माणसांची जे आज हयात नाहीत त्यांची आठवण झाली की जीव कासावीस होतो.कुठे गेली ती प्रेमळ व समजूतदार माणसे ?हा प्रश्न मनाला वेदना देतो. आजकाल अशी ही प्रेमळ व मायाळू माणसे दुर्मिळ झाले आहेत.यापुढे अशी जिव्हाळ्याची माणसे मिळतील की नाही ?याची शाश्वती देता येणार नाही.तुमच्या आसपास व तुमच्या नात्यांमध्ये अशी प्रेमळ,मायाळू व समजूतदार माणसे असतील तर त्यांना जपा,त्यांना जीव लावा.अशी माणसे मानवतेचे वैभव असतात.

बबन दामोदर गुळवे
मो. ९५४५४४२६४८

# संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा जन्म १६०८ साली पुणे जिल्ह्यातील देहू येथे मोरे घराण्यात बोल्होबा व कनकाई माता यांच्या पोटी जन्म झाला. जनतेचे दुःख,दारिद्र्य ,अज्ञान व पाखंडी लोकांकडून होणारी लुबाडणूक पाहून त्यांनी आपल्या कीर्तनातून प्रबोधनाचे कार्य केले. त्यांचे हे कार्य पाखंडी लोकांना रुचले नाही.अभंगाची गाथा इंद्रायणीत बुडवली गेली. परंतु महाराजांचे अभंग लोकांच्या मनामनात तरंगत होते. त्यामुळे गाथेचे अस्तित्व ते मिटवू शकले नाहीत. विठ्ठल भक्तीत लीन झालेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी अनेक क्रांतिकारी , समाजप्रबोधनकारी अभंग लिहिले. स्त्रियांसाठी आई-वडिलांचे घर हेच माहेर असते परंतु संतांना विठ्ठलाचे पंढरपूर म्हणजे माहेर व विठ्ठू रखुमाई हेच आई-बापाच्या ठाई असतात.**

पंढरपूर व त्याच्या भेटीची ओढ तुकोबारायांनी आपल्या काही अभंगातून व्यक्त केली आहे. त्यामुळे विठू- रखुमाई च्या भेटीसाठी माहेरी जाण्यासाठी आतुर झालेले तुकाराम महाराज म्हणतात,

**आता पंथ पाहे माहेराची वाट**
**कामाचा बोभाट पडो सुखे**
**काय करू आता नगमेसे झाले**
**बहुत सोसिले बहुदिस**
**घर लागे पाठी चित्ता उभे वारे**
**आपुले ते झुरे पहावया**
**तुका म्हणे जीव गेला तरी जावो**
**धरिला तो देव भाव शुद्ध**

विठ्ठलाच्या भेटीसाठी आतुर झालेले तुकोबारायांचे मन माहेराची वाट पाहते. त्यांना कुठेही करमेनासे झालेले आहे. सर्व कामाचा विसर पडलेला आहे. ते म्हणतात खूप दिवसांपासून माहेराचा हा विरह मी सोसला आहे. त्यामुळे भेटीसाठीआतूर झालेल्या त्यांच्या जीवाला जणू काही घर पाठीशी लागले आहे व उभे वारे सुटले आहे. त्यामुळे आता जीव गेला तरीही जावो पण माझ्या माहेराची भेट होवो ..

अशा आतूरलेल्या जीवाला जेव्हा माहेराहून भेटीसाठी निरोप येतो तेव्हा ते म्हणतात...

**आपुल्या माहेरा जाईन मी आतां**
**निरोप या संता हाती आला**
**सुखदुःख माझे आइकिलें कानीं**
**कळकळा मनी करूणेचा**
**करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें**
**येती दिसे एके न्यावयासी**
**त्याची पंथी माझे लागलेसे चित्त**
**वाट पाहे नित्य माहेराची**
**तुका म्हणे आता येतील न्यावया**
**अंगे आपुलिया मायबाप**

माहेराच्या भेटीसाठी म्हणजेच विठ्ठलाच्या भेटीसाठी आतुर झालेल्या तुकोबारायांना संतांच्या हाती निरोप आलेला आहे त्यांचे सुखदुःख ऐकून त्यांच्याविषयी बाप विठ्ठलाच्या मनी कळवळा निर्माण झाला आहे. माहेराहून काहीतरी खाऊ घेऊन एक दिवस मायबाप न्यावयाला येतील म्हणून माहेराच्या वाटेकडे त्यांचे चित्त लागले आहे असे वर्णन महाराजांनी केले आहे.

माहेराहून निरोप घेऊन सखे वारकरी तुकोबारायांसाठी काहीतरी खाऊ घेऊन आले आहेत. आधी तो खाऊ खाऊन मग माहेराच्या कौतुकाने ओव्या गाईन असे तुकाराम महाराज पुढील अभंग म्हणतात.



**आले ते आधी खाईन भातुके**
**मग कवतूके गाईन ओव्या**
**सांगितला आधी आईको निरोप**
**होईल माझा बाप पुसे तो ते**
**तुका म्हणे माझे सखे वारकरी**
**आले हे माहेरीहून आजी**

माहेरचा निरोप मिळताच माहेरी विठ्ठलाच्या भेटीसाठी आलेले तुकाराम महाराज पुढील अभंगात म्हणतात,

**आजी बरवे झाले माझे माहेर भेटले**
**डोळा देखिले सज्जन निवारला भाग शीन**
**धन्य झालो आतां क्षेम देऊनिया संता**
**इच्छेचे पावलो तुका म्हणे धन्य झालों**

ज्याप्रमाणे एखाद्या सासुरवाशीणीला माहेरी आल्यानंतर माहेरची माणसे पाहिली की,तिचा शीण हलका होतो. त्याचप्रमाणे तुकोबांना सुद्धा माहेरी आल्यानंतर सारा शीण निवारल्याची अनुभूती येते. संत सज्जनांची भेट झाल्यावर सर्व इच्छापूर्ती झाल्याने ते स्वतःला धन्य झालो असे म्हणतात. जसे सासुरवाशीनीला आपल्या माहेराचे कौतुक वाटते त्याचा मोठेपणा ती सदैव सांगत असते तसेच तुकाराम महाराज सुद्धा आपल्या माहेरा विषयी म्हणतात...

**शीण भाग हरे तेथिया निरोपें**
**देखलिया रुप उरी नुरे**
**इंद्रियांची धाव होईल कुंठीत**
**पावेलं हे चित्त समाधान**
**माहेर आहेसे  लौकिकी कळावे**
**निढळ बरवें शोभा नेदी**
**आसं नाही परि उरी बरी वाटे**
**आपले ते भेटे आपणासी**
**तुका म्हणे माझी अविट आवडी**
**खंडणा तातडी होऊ नेदी**

असं म्हटलं जातं की पूर्वीच्या काळी माहेरचा कुत्रा जरी दिसला तरी त्याची खूप अपुर्वाई वाटायची सांगायचे तात्पर्य तुकोबारायांना सुद्धा त्यांचे माहेर असलेल्या पंढरीरायाचा निरोप आला की त्यांचा सारा शीणभाग हरल्याची अनुभूती मिळत असे. एकदा विठ्ठलाचे रूप डोळ्यांनी पाहताच आनंदाने सर्व इंद्रियांची धाव थांबून जीवाला समाधान लाभे असे अलौकिक माझे माहेर आहे असल्याचे वर्णन ते करतात. अशा माहेराकडून काही मिळावे अशी आस जरी जीवाला नसली तरीही आपल्यां जिवलगांची भेट झाल्यावर जीवाला होणारा आनंद आणि त्याची गोडी ही अवीट असल्याचे ही महाराजांनी सांगितले आहे.

माहेराच्या भेटीची ओढ लागलेल्या तुकोबांच्या मनाला माहेराहून काय निरोप येईल यामुळे झोपही येत नाही. ते म्हणतात...

**माहेरींचा काय येईल निरोप**
**म्हणूऊनि झोप नाही डोळा**
**वाट पाहे आसं धरूनियां जीवीं**
**निढळांहे ठेवीं वरी बाहे**
**बोटावरी माप लेखितों दिवस**
**होतो कासाविस धीर नाही**
**काय नेणो संता पडला विसर**
**की नव्हे सादर मायबाप**
**तुका म्हणे तेथे होईल दाटणी**
**कोण माझे आणी मना तेथें**

माहेरी जाण्यासाठी आतुरलेली एखादी सासुरवाशीण जशी माहेराच्या  निरोपाची वाट पाहते तिला झोप येत नाही. ती बोटावर दिवस मोजू लागते. माहेराच्या आठवणीने तिचा जीव व्याकूळ होतो. तिला थोडाही धीर धरवत नाही तशीच अवस्था विठ्ठलाच्या भेटीसाठी तुकाराम महाराजांची झालेली आहे त्यांना असे वाटते की, संतांना माझा विसर पडलेला आहे म्हणूनच माहेराहून मला निरोप येत नाही.

आतुरलेल्या मनाला एकदा का माहेराची भेट झाली की त्याच्यासाठी काय करीन हे सांगताना महाराज म्हणतात.

**माहेरीचे आले मज ते माहेर**
**सुखाचे उत्तर करीन त्यासी**
**पायावरी माथा आळिंगीन बाहीं**
**घेईन लवलाही पायवणी**
**सुख समाचार पुसेना सकळ**
**कैसा पर्वकाळ आहे त्यास**
**आपुली जीवींचे सुखदुःख भावें**
**सांगेन आवघें आहे तैसें**
**तुका म्हणे वीट न घे आवडीचा**
**बोलिलीच वाचा बोलवीन**

जिवाभावाच्या माहेराची विठुरायाची जेंव्हा भेट होईल तेंव्हा सर्व सुख लाभेल.पायावरी माथा ठेवून विठ्ठलालाअलिंगन  देत त्याची गळाभेट घेईन . त्याचे पायवणी घेऊन त्याच्या सुख- दुःखांची विचारपूस करीन. माझे सुखदुःखही त्याला सांगेन. जसे एक स्त्री माहेरी आल्यानंतर आपली सर्व सुखदुःखे सांगते अगदी त्याप्रमाणे तुकोबांनाही विठ्ठलाची एकरूप होऊन त्याला सर्व सुखदुःखे सांगावीशी वाटतात.

अशाप्रकारे आपल्या अनेक अभंगांमधून जगद्गुरु तुकोबारायांनी विठ्ठल रुपी माहेराच्या भेटीची ओढ व्यक्त केली आहे.
त्यांची ही गाथा कपाळी लावावी व तिचे सदैव पारायण करावे अशीच आहे.युगांनुयुगे तुकोबांचे अभंग समाजाला प्रेरणा देतच राहतील व समाजाचे प्रबोधन करतच राहतील यात तीळ मात्र ही शंका नाही..

# मद्यविक्रीतील स्त्रियांचा सहभाग कितपत योग्य !



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**नुकताच जागतिक महिला दिन पार पडला. आपल्या कर्तृत्वाने उत्तुंग भरारी घेणाऱ्या स्त्रियांचा या दिवशी गौरव करण्यात आला. यानिमित्ताने भरवण्यात आलेल्या कार्यक्रमांतून आजची स्त्री कशी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून यशाची विविध शिखरे पादाक्रांत करत आहे याबाबतचा  उहापोह करण्यात आला. भारतीय संस्कृतीने स्त्रीला सदैव आदराचे स्थान दिले आहे. स्त्रीला शक्तीस्वरूप मानणारा हिंदू धर्म दुर्जनांचा कर्दनकाळ ठरणाऱ्या कालीमातेच्या उपासनेचे महत्वही तितक्याच प्रखरतेने बिंबवतो. स्त्री आणि पुरुष या दोहोंची शारीरिक रचना आणि क्षमता भिन्न असल्याने विधात्याने दोहोंचे कार्य निश्चित केले आहे  त्यामुळे स्त्री आणि पुरुषांमध्ये श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण हा वाद केवळ निरर्थक आहे.**

इतिहासात स्त्री पुरुष समानतेच्या गोष्टीही कधीही केल्या गेल्या नाहीत. पौराणिक ग्रंथांचा अभ्यास केला असता आपल्या लक्षात येईल की काळाची गरज म्हणून पुरुषानेही प्रसंगी स्वयंपाक्याचे काम केले आहे आणि स्त्रीनेही प्रसंगी तलवार हाती घेऊन युद्धात सहभाग घेतला आहे. त्यामुळे प्रकृतीच्या नियमनामध्ये स्त्री आणि पुरुष दोहोंचे महत्व तितकेच अबाधित आहे. दारूच्या व्यसनाने आजतागायत अनेकांचे संसार उध्वस्त केले आहेत, अनेकांना कर्जबाजारी केले आहे, तर अनेकांना रस्त्यावर आणले आहे. व्यसनाच्या अधीन झालेल्यांना पत्नी-लेकरे तुच्छ मानायला लावणारी दारू सुखी संसारात विष पेरण्याचे कार्य करते. दारू केवळ तिचे सेवन करणाऱ्याचाच ऱ्हास करत नाही, तर त्या घरातील कुटुंबियांना त्याचा मानसिक त्रास सहन करावा लागतो, घरातील लहान मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. दारू पिणाऱ्याकडून नशेत अनेकदा धिंगाणा घातला जात असल्याने त्याचा त्रास शेजारपाजाऱ्यांनाही सहन करावा लागतो. मद्यविक्रीतून दरवर्षी राज्यांना मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असल्याने कोणतेही राज्य सरकार आपल्या राज्यात दारूबंदी करण्यास अनुकूल नसते. तरीही दारूमुळे होणारी सामाजिक हानी लक्षात घेऊन बिहार, गुजरात, मिझोराम, नागालँड, मणिपूर आदी  राज्यांत तर काही राज्यांतील गावांत आणि तालुक्यांत संपूर्ण दारूबंदी करण्यात आली आहे. ही दारूबंदी लागू करण्यात स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे. आजही अनेक गावांत दारूबंदी करण्यासाठी स्त्रियांनी मोर्चे काढल्याच्या, आंदोलने केल्याच्या बातम्या वाचनात येतात.



उत्तर प्रदेशातील लखनौ मध्ये मात्र परिस्थिती अगदी उलट आहे. लखनौ शहरात दारूविक्रीचे व्यवसाय चालवण्यात स्त्रिया अग्रेसर आहेत. नवीन आर्थिक वर्षांमध्ये शहरातील १०४६ दारूच्या दुकानांपैकी ३७० दुकाने महिलांना चालवण्यासाठी देण्यात आली आहेत. येत्या १ एप्रिलपासून शहरातील एक तुतीयांश दारूच्या दुकानांवर दारू विकण्यासाठी महिला दिसून येतील. गेल्या वर्षीच्या तुलनेत स्त्रियांनी दारूची दुकाने चालवण्यास घेण्यामध्ये यंदा ७ टाक्यांनी वाढ झाली आहे, पुढील आर्थिक वर्षासाठी सरकारने उपलब्ध केलेल्या मध्यविक्रीच्या एकूण परवान्यांपैकी ३५ टक्के परवाने स्त्रियांनी मिळवले आहेत. कोणतीही विशेष सवलत दिली गेली नसताना गेल्या ५ वर्षांत दारूच्या दुकानांचे परवाने मिळवण्यात स्त्रिया अग्रेसर बनल्या आहेत. सरकारने 'स्टार्ट अप इंडिया'च्या माध्यमातून तरुणांना व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. या संधीचा लाभ घेत अनेकांनी आपल्या गलेलठ्ठ वेतनाच्या नोकऱ्या सोडून नवीनतम व्यवसायात जम बसवला आहे.  असे असताना दारूच्या व्यवसायात स्त्रियांना अधिक रुची का ? दारूचा व्यवसाय हा अल्प श्रमात अधिक उत्पन्न मिळवून देणारा असला, तरी दारूमुळे होणारी अपरिमित हानी लखनौ मधील स्त्रिया केव्हा लक्षात घेणार ? दारूच्या व्यवसायात रुची दाखवण्यामध्ये आज लखनौच्या स्त्रिया आघाडीवर आहेत उद्या हेच लोन राज्यात आणि देशात अन्यत्रही पसरू लागेल. दारूच्या व्यवसायातील स्त्रियांचे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जाणे मनाला न पटणारे आहे. अर्थात महिलांनी दारूविक्रीचे परवाने नाही घेतले तर पुरुष व्यावसायिक ते घेणारच आहेत त्यामुळे दारूविक्रीच्या व्यवसायात वाढ व्हायची ती होणारच आहे हे जरी सत्य असले तरी दारूचे दुष्परिणाम लक्षात घेऊन सरकारला दारूबंदी करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य केवळ महिलांमध्ये आहे हेही महिलांनी लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे स्त्रियांनी केवळ व्यावसायिक लाभासाठी दारूविक्रीच्या व्यवसायात उतरण्याऐवजी अन्य व्यवसायांत कौशल्य सिद्ध करून अनेकांच्या संसाराची राखरांगोळी करणाऱ्या दारूवर राज्यात बंदी घालण्यासाठी सक्रिय प्रयत्न करावेत.

# मोल देऊनिया सांटवावे दोष। नटाचे ते वेष पाहोनिया



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**वाचक माय-बापहो, तुम्हाला साष्टांग नमस्कार! वंदन! क्षमा करा! मी अज्ञानी आहे! मला मार्गदर्शन करा. अशी मी दोन्ही हात जोडून तुम्हाला विनम्र विनंती करतो! सज्जनहो, जो देतो तो देव आणि जो घेतो तो घेव अन त्याचंच जगाला मोठं भेव! भेव म्हणजे भीती. असं असलं तरी घेणाऱ्यांनीच नित्य भिऊन रहावे. होय. घेणाऱ्यांनी देणाऱ्यांप्रती नित्य नित्य कृतज्ञ भाव जागृत ठेवून रहायला, वागायला हवे. त्यामुळेच तर जगामध्ये आत्तापर्यंत केवळ देणाऱ्यांचीच वाहवा होते. त्यांचीच जयंती-पुण्यतिथी आणि वेळोवेळी त्यांचेच स्मरण केले जाते. वारंवार देणाऱ्यांचेच कृतज्ञ भाव, ऋण व्यक्त केले जाते. जन्मापासून ते आत्तापर्यंत जगात केवळ दोनच वर्ग आहेत पहायला मिळतात आणि ते म्हणजे एक देणारे आणि दुसरे घेणारे! त्यापैकी आपण बहुतांश, सगळे घेणारेच!**

परिणामी वेळोवेळी आपण सृष्टीची विनम्र भावाने क्षमा मागून आनंदाने श्वास घेतला पाहिजे! भूतकाळ सोडून द्या, भविष्यकाळ माहित नाही! अनिश्चित! केवळ वर्तमानाचा आनंद घेत सत्कर्मांची पेरणी करत रहा! हे नाही जमले तर शांत रहा, पण दुष्कर्म विचार सुद्धा मनात आणू नका. ते महापाप आहे! त्यासाठी, अजूनही आपण जिवंत आहोत, त्याबद्दल नित्य कृतज्ञ भाव जागृत ठेवा! हे जिवलगांनो! खरंच, आपण किती आणि कुणा कुणाकडून काय काय घेत असतो? अगदी विनामुल्य! काहीही मोबदला नाही. त्यामुळे त्याची किमंतही नाही. जरा खोलवर विचार करा. एवढा अनमोल मानव देह आपल्याला विनामोल लाभला. त्याबद्दल आपण सृष्टी असो की ईश्वर, त्यांचे मनोमन आभार मानले पाहिजेत! दिवसातून एकदा तरी आपण असे करतो का? नाही. म्हणून दिवसातून एकदा तरी संपूर्ण विश्वाचे मनोमन आभार मानले पाहिजेत! अत्यंत ऋण व्यक्त केले पाहिजे! त्यानंतर आई! आई बिचारी, प्रचंड मरणयातना सोसून, आपल्याला नऊ महिने पोटात बाळगून, स्वतःचा जीव, जगणं धोक्यात घालून आपल्याला जन्म देते. त्यानंतर अनेकांचे अनेकानेक उपकार आपल्यावर होतच राहतात. एवढेच काय? अक्षरशः आपल्यावर उपकारांचा सतत पाऊसच पडत असतो. आपले वडील तळहाताचा पाळणा, शरीराची छत्री करून लाडकोड पुरवत आपले संगोपन करतात. आजी, आजोबा, काका, काकू, आत्या, मावशी, मोठे दादा-ताई, शेजारी-पाजारी इत्यादी आपल्याला जीव लावून जोजवतात, खेळवतात! आपले कोड -कौतुक करतात. त्यांना आपण परत काय देतो? याचे उत्तर देणे मोठे कठीण आहे. त्यानंतर जगाच्या उर्जेचा स्त्रोत सूर्य, प्राणवायू, धरती, झाडे, नद्या, डोंगर, पशु, पक्षी, प्राणी असे एक ना अनेक घटक जे आपल्याला कोणतीही परतीची अपेक्षा न ठेवता सकाळपासून ते सायंकाळपर्यंत, अथपासून ते इथपर्यंत केवळ आणि केवळ देतच असतात. त्या बदल्यात आपण त्यांना परत काय देतो? आपल्याला या प्रश्नांची उत्तरे देणे मोठे कठीण आहे. आपलीच आपल्याला लाज वाटायला लागेल! अनंत वैश्विक विचार जागविण्याचे महत्कार्य जगद्गुरू तुकोबाराय नित्य करत असतात. त्याच्या जोडीने अनेक वाचक माय-बाप आपल्या अनमोल प्रतिक्रिया देऊन लिहायला बळ देतात. चिंतन करतांना लोककवी तुकोबांचा




**मोल देऊनिया सांटवावे दोष। नटाचे ते वेष पाहोनिया ॥१॥**
**हरिदासा मुखे हरिकथा कीर्तन। तेथे पुण्यें पुण्य विशेषता ॥धृ॥ हरितील वस्त्रे गोपिकांच्या वेशे। पाप त्या सरिसे मात्रा गमन ॥३॥ तुका म्हणे पहा ऐसे झाले जण। सेवा भक्तिहीन रसी गोडी ॥४॥ (१२६८)**

हा एक अभंग आपल्याला एका वेगळ्या विचार विश्वात घेऊन जातो. तुकोबांचे अभंगच त्यांचे चरित्र आहे. कोणताही लेखक आपल्या निर्मितीत आपले वर्तमान चित्रित करीत असतो. आयुष्यभर तुकोबांनी आपल्या वाणी-लेखणीतून केवळ आणि केवळ तेच केले आहे. तुकोबा कुठेही स्वतःचे किंवा एखाद्या माणसाचे गुणगान आपल्या कवितेत करतांना दिसत नाहीत. तुकोबा एक तर देव किंवा संत यांच्या विषयीच लिहित अथवा बोलत असतात. त्या व्यतिरिक्त तुकोबांनी तिसरे जे आहेत ते म्हणजे खोटारडे साधू-संत, वेषधारी बुवा, भक्तीचा आव आणून लोकांना लुटणारे भोंदू यांचा सडेतोड समाचार घेतला आहे. वेळोवेळी त्यांना उघडे पडले आहे. त्यांच्या अपकीर्तीची लक्तरे अक्षरशः वेशीवर टांगली आहेत. त्यांची कुठलीही भीडभाड ठेवली नाही. अशाच काही समकालीन भोंदुगिरी करणाऱ्या, वेषधारी साधूंना प्रस्तुत अभंगात तुकोबाराय आपटून आपटून धुवून काढतात. खरे तर माणसाने जीवनामध्ये आपले दोष लोकांकडून समजून घेऊन ते आपल्यातून घालवणे अपेक्षित असते. त्यासाठी आपण मुद्दामहून प्रयत्न करत रहावे. याचे कारण म्हणजे आपण विकाराने भरलेले आहोत. मूलतः आपला जन्मच विकारातून झाला आहे. भोवतालही विकारी लोक-विचारांचा विषारी विळखा पडला आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगी आपण नित्य आणि क्षणोक्षणी सावध राहून आपल्यातिल दोषांचे परिमार्जन करणे अत्यंत गरजेचे आहे. असे झाल्यास माणसातील दोष-दुर्गुण रानोमाळ पळून जातील आणि त्याच्या ऐवजी त्याच्या मन-मस्तकात सद्विचार दृढ होतील. माणूस खऱ्या अर्थाने माणूस बनण्याच्या मार्गाने मार्गस्थ होईल! असे असतांना तुकोबाराय म्हणतात, स्वतःला साधू-संत समजणारे लोक नटासारखे केवळ वेश परिधान करून संतपणाचा आव आणत आहेत. हे कधीही संत-साधू होऊच शकत नाहीत. याच्या उलट त्यांच्यामध्ये नखशिखांत विकारच वाहत आहेत. अशा वेशधारी, लुटणाऱ्या, लुबाडणाऱ्या लोकांना संत कसे म्हणायचे? केवळ कपड्याने त्यांच्यात संतत्व अवतरणार आहे काय? त्या ऐवजी जे खरे संत, हरिदास आहेत, त्यांच्याकडून आपण कीर्तन आणि हरिकथा श्रवण केली पाहिजे. तेथेच आपल्याला पुण्य प्राप्ती होऊ शकते. या उलट जे केवळ वेषधारी साधू-संत आहेत, अनुभव शून्य आहेत, कृती शून्य पोपट आहेत अशांच्या कीर्तन श्रवणाने श्रोत्यांच्या पदरी पुण्य तर सोडाच उलट पापाचे भांडवल वाढेल! करायला गेलं एक आणि झालं दुसरंच! त्यासाठी सावध व्हायची वेळ आली आहे. पुढे जाऊन तुकोबाराय या वेषधारी, गोड गायन करणाऱ्या बगळ्यांचे वर्णन करतांना, हे भोंदूच्या वेशातील साधू, लोकांना कृष्ण लीला सांगतील. गोपिकांचा-गवळणींचा वेष धारण करून नाचतील. बिचाऱ्या भोळ्या-भाबड्या स्त्रियांना आपल्याकडे आकर्षित करून पापकृत्य करतील. निषिद्ध कामे करतील. साधूचा वेश धारण करून खऱ्या साधूला बट्टा लावतील. अशा वेषधारी बगळ्यांपेक्षा काव काव करणारे कावळे बरे! असे पापिष्ट लोक जर परमार्थ मार्गाने लोकांचे शोषण करायला लागले तर मग विश्वास तरी कुणावर ठेवायचा? सोन्यालाच जर गंज लागला तर लोखंडाचे काय? ते तर क्षणार्धात नष्ट होऊन जाईल! तेंव्हा जगद्गुरू तुकोबाराय शेवटी लोकांनाही तेवढाच दोष देतात. लोक सुद्धा सैरभैर झाले आहेत. ते ही खोटारड्या, वेषधारी साधू-संताच्या पाठीमागे धावत आहेत. खऱ्या अर्थाने गरजू लोकांची मदत करणे म्हणजे खरी सेवा! तीच खरी भक्ती! लोकांनी आपल्यातील सेवाभाव, सेवावृत्ती बाजूला सारून केवळ अवडंबर करणाऱ्या भोंदू, कथेकरू लोकांच्या मागे लोक पळत आहेत. लोकही खोट्या भक्तीच्या मागे धावताहेत.

असे लिहून तुकोबाराय सामान्य लोकांना सुद्धा सावध करतात. कोणताही लेखक किंवा कवी केवळ आपल्या काळापुरते लिहित नसतात. त्याच न्यायाने तुकोबांचे काव्य हे कालातीत आहे. तुकोबांनी उभ्या आयुष्यात कुणाचीही हांजी हांजी केली नाही. कुठेही भिक मागे पणा केला नाही. "भिक्षा पात्र अवलंबणे। धिक जिने लाजिरवाणे" न्यायाने संसार आणि परमार्थ केला. याचा परिपाक म्हणजे तुकोबा अजरामर झाले. लोकांच्या गळ्यातील ताईत झाले आणि आजही आहेत. तुकारामांनी प्रचंड दुष्काळ अनुभवला. त्यांच्या घरातील कर्ती धर्ती माणसे मेली. गुरे ढोरे मेली. गावच्या पाटलांनी आणि प्रस्थापित धर्म मार्तंडांनी जंग जंग पछाडले. तरीही तुकोबा डगमगले नाहीत. कुणालाही भिक मागितली नाही. असे असतांनाही भजन-कीर्तन-अभंग सेवा अखंड सुरूच होती. परंतु आज परिस्थिती काय आहे? आज कुणावरही तुकोबांएवढी संकटे नाहीत. अन्नावाचून कुणीही मरत नाही. सर्व काही मुबलक असतांना संप्रदायाच्या नावाखाली ही माणसे का भिक मागत आहेत? गावोगाव वेषधारी कथेकरू गाड्या घेऊन फिरतांना प्रचंड संपत्तीची लुट का करत आहेत! नेमके हे कुणाचे वारस आहेत? हे तुकोबांचे वारस आणि वारकरी संप्रदायाचे पाईक कधीच होऊ शकत नाहीत. ही केवळ आणि केवळ लोकांचे रंजन करणारी कलाकार मंडळी आहेत! पैसा फेको तमाशा देखो! हे महाराज नसून केवळ बुवा अथवा कथेकरू आहेत! यांची कीर्तने ही तुकारामांची कीर्तने अजिबात होऊच शकत नाहीत! बस्स!जय तुकोबाराय!

# बाबासाहेब आणि उद्धवराव हृदयंगम संवाद



मिलिंद मानकर,
नागपूर, 8080335096

आधुनिक केसरी


**१९५४ मे महिन्याचा तो काळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे औरंगाबाद येथे एक महिना वास्तव्य होते. मिलिंद महाविद्यालयाच्या आवारात बाबासाहेब सायंकाळी बसायचे. त्यावेळी शहरातील प्रतिष्ठित लोक, वकील, डॉक्टर, पुढारी आणि कार्यकर्ते त्या ज्ञानसत्राचा लाभ घेत. अशाच एका संध्याकाळी शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक उस्मानाबादचे भाई उद्धवराव पाटील यांना बाबासाहेबांशी प्रत्यक्ष जवळून चर्चेचा योग आला. त्या प्रसंगाला यावर्षी ७० वर्षे पूर्ण झाली आहेत...**



श्रद्धेय उद्धवराव एस. पाटील म्हणतात, मी गेल्याबरोबर बाबासाहेबांना नमस्कार केला. त्यांनी मला समोरील खुर्चीवर बसण्याचा इशारा केला. मी बसताच त्यांनी प्रश्न केला. 'काय उद्धवराव कोठे आहेत तुमचे केशवराव व शंकरराव?' त्यांच्या त्या चौकशी सवालात ज्यांनी त्यांच्या बरोबर सहकारी म्हणून काम केले त्या ब्राह्मणेतर चळवळीतील पुढाऱ्यांच्या आपलेपणाच्या चौकशीचा भाग होता. 'केशवराव जेधे काँग्रेसमध्ये जाणार' या बातम्या त्यांच्यापर्यंत पोहोचल्या होत्या. बाबासाहेब पुढे म्हणाले, 'हे आमचे बहुजन समाजाचे पुढारी! ज्यावेळी काँग्रेसला जळते घर समजून इतर लोक आपला जीव वाचविण्यासाठी बाहेर पडतात त्यावेळी आमचे हे बहुजन समाजाचे पुढारी आपल्या अनुयायांना काँग्रेसमध्ये जाण्याचा सल्ला देतात. काय म्हणावे यांच्या शहाणपणाला ? जावू द्या झालं!' त्या वेळच्या त्यांच्या संभाषणातील तो करारीपणा आणि विचारांची धार मला अतिशय आकर्षक वाटली.

बहुजन समाज व बौद्ध समाज आपले विचार स्पष्टपणे कठोर आणि सडेतोड शब्दात खंबीरपणे मांडतांना आपली मते ऐकणाराला आवडतील की नाही. उगीच पोटात एक आणि ओठावर दुसरेच असे बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वात नव्हते. त्यांच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल प्रथमदर्शनी जरी कोणाचा गैरसमज होणे संभवनीय असेल तरी त्यांना विचारपूर्वक समजावून घेतल्यानंतर त्यांची मते इतकी स्पष्ट आणि सडेतोड का बनली याचा उलगडा होतो. ब्राह्मणेतर समाजाच्या खांद्याला खांदा लावून कार्य केले तरी त्या आम समाजाचा आपल्या समाजाकडे बघण्याच्या दृष्टिकोन बदलत नाही याबद्दल त्यांची खात्री झाली. ज्यांना राजकारणात मित्र मानावे तेच शत्रूच्या गोटात सामील. अशा परिस्थितीत त्यांचा ब्राह्मणेतर नेतृत्वावरील विश्वास उडाला असावा. या बाबतचा सर्व दोष ते बहुजन समाजाच्या खऱ्या अर्थाने डोळस, शहाणे करण्याचा आणि त्यांच्यात राजकीय जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न या पुढारीपणाने कधी केलाच नाही असा त्यांचा या पुढारीपणासंबंधीचा समज होता. ब्राह्मणेतर नेतृत्वाबद्दलची त्यांची ही मोजदाद लावल्यानंतर त्यांचा ब्राह्मण नेतृत्वाबद्दल काय दृष्टिकोन आहे हा समजावून घ्यावा. मी म्हटले, 'ब्राह्मण नेतृत्व आज देशात आणि त्यातल्या त्यात महाराष्ट्रात प्रभावी आहे. त्यांचेशी वाटल्यास सहकार्य करायला काय हरकत आहे?' त्यावर ते इतके उफाळून उठले की, त्या त्यांच्या वक्तव्यावरून मला तरी एक गोष्ट स्पष्ट भासली आणि ती ही की कुठल्याही पक्षातील ब्राह्मण नेतृत्वावर बाबासाहेबांचा विश्वास बसणे कठीण होते.

मराठ्यांना महाराचे पुढारीपण कसे मान्य होईल? - 'हो पण मी महार आहे. माझे पुढारीपण मराठ्यांना मानवणार नाही. तुम्ही दगडाला जरी शेंदूर लावला तर मी त्याला मानेल. परंतु जोपर्यंत माझ्या लोकांचे प्रश्न शिल्लक आहेत तोपर्यंत मला माझ्या पक्षाची झोपडी स्वतंत्र ठेवली पाहिजे व ती मला अलग ठेवणे भाग आहे. ती तेवढी तुमच्या वाड्याच्या बाजूला राहू द्या



म्हणजे झाले. '

उद्धवराव पाटील पुढे म्हणतात, बाबासाहेबांच्या या विवेचनावरून मला एक गोष्ट स्पष्ट दिसली की, राजकीय सत्ता अल्पसंख्याकांच्या हातात यावयाची असेल तर त्यांनी आपले राजकीय अस्तित्व न गमावता इतरांशी सहकार्य केले पाहिजे. देशातील प्रचलित सत्ताधारी पक्षाला विरोध करणारा खऱ्या अर्थाने लोकशाही राबवणारा असा प्रभावी विरोधी पक्ष देशात निर्माण झाला. जबाबदार पदाधिकाऱ्यांनी आपली प्रतिक्रिया नमूद केली. कम्युनिस्ट पक्षासारख्या पक्षाने नागपूर ठराव अमलात आणण्यासाठी सहकार्याचा हात पुढे केला. तर शेतकरी कामगार पक्षाने हा फसवा व जनतेची दिशाभूल करणारा ठराव म्हणून त्याचे मूल्यमापन केले. इतर अन्य राजकीय पक्षांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया जाहीर केल्या. आम्ही त्या ठरावासंबंधी काय भूमिका घेतली? दिल्ली येथील तथाकथित प्रोव्हिजिन जनरल कौंसिलच्या बैठकीत काही तरी प्रकाश या ठरावावर पडेल अशी अपेक्षा होती. परंतु त्याचा कोठेही मागमूस लागला नाही. जर देशावर शक्ती खर्च झाली असेल तर ती पक्षात कोणाला ठेवायचे व पक्षाबाहेर कोणाला घालवायचे यावर खर्च झाली. बाबासाहेबांच्या राजकीय मार्गदर्शनापासून जी जमिनी मागण्याची भूमिका आहे तिचा मात्र पुनरुच्चार करणत आला हीच का AGRARIEN POLICY?

बौद्धधर्म आणि सवलती - बौद्धांच्या उद्धाराची धर्मप्रसाराची चळवळ बाबासाहेबांनी ज्या जोमाने सुरू केली तो जोम चळवळीत का दिसत नाही ? खुद्द बाबासाहेबांच्या सहवासात इतकी वर्षे होतो असे सांगून प्रतिष्ठा प्राप्त झालेले आम्ही प्रापंचिक परिस्थिती व नोकरी यांना धक्का न लागता धर्मदीक्षेचा एकही कार्यक्रम सौराष्ट्र व गुजरातमध्ये घेऊ शकत नाही. एवढेच नव्हेतर राजकीय पक्षाच्या अल्पसंख्य जीवनात आमची जेवढी संख्या होती तेवढीच आहे. चार अधिक माणसे आम्ही आमचे मागे आणू शकलो नाही का ? बाबासाहेब आज हयात असले तर ही बाब अशी घडली असती काय ? हेच काय आमचे बाबासाहेबांचे अनुयायी या नात्याने एकनिष्ठ प्रेम ?

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी दीक्षा घेतेवेळी नागपूर येथे जाहीर सभेत सांगितले होते की, 'सवलती माझ्या खिशांत आहेत. ' सवलतींच्या आमिषामुळे बौद्धधर्म प्रसाराच्या कार्यात मुंबई राज्यातील काही भागात व राज्याबाहेर अडचण निर्माण होऊन त्या कार्याची थोडीशी गती बंद होऊ लागली आहे ही गोष्ट नाकबूल करण्याचे काहीही कारण नाही. उलट बाबासाहेबांच्या या सवलतीवरील तोडगा जर कशात असेल तर ते बौद्धांच्या तयार व्हावयाच्या कैफियतीत आहे. परंतु आज तारखेपर्यंत बौद्धांची कैफियत तयार झाली नाही. या प्रश्नाचे उत्तर जनतेने जाणिवेने शोधून काढले पाहिजे.

इतर अनेक प्रश्न - वतनदारी नष्ट करण्याची घोषणा कायद्याने केली असली तरी त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे आम्ही काय वाटचाल केली ? खेड्यापाड्यातील आमच्या बांधवावर प्रत्यही होणारे अन्या;; दूर करण्याचे दृष्टीने आम्ही काय प्रयत्न केले ? ज्या खेड्यातील जनतेच्या दुःखमय संसाराचे चित्र आपल्या डोळ्यासमोर आल्यानंतर बाबासाहेब अक्षरशः गहिवरत असताना 'माझी सर्व शक्ती खेड्यातील जनतेच्या कल्याणासाठी वापरीन' असा दिलासा देणारे बाबासाहेब आज आमच्यात नाहीत. त्या दीनदुबळ्या जनतेचा संसार सुखी करण्याचा आम्ही आराखडा केला? असे एक ना दोन हजार प्रश्न मनात उभे राहतात आणि या प्रश्नांच्यासाठी बाबासाहेब आज हयात असते तर फार चांगले झाले असते असे वाटू लागते. परंतु बाबासाहेब आपल्यामध्ये नाहीत ही जाणीव ठेवून आपल्यावरील जबाबदारी ओळखून त्यांच्या सिद्धांतांना हरताळ न फासता निष्ठेने कामाला लागणे हा एकच मार्ग शिल्लक राहतो.



# उंदराची टोपी

आधुनिक केसरी

एक उंदीर होता. तो एकदा रस्त्यावरून चालत होता. चालता चालता त्याला एक कापडाचा 'तुकडा' सापडला. तर तो तुकडा बघून उंदराला वाटलं अरे व्वा ! आता आपण याची टोपी शिवून घेऊया. मग तो एका शिंप्याकडे गेला. शिंप्याला म्हणाला, ""शिंपीदादा, शिंपीदादा, मला या कापडाच्या तुकडयाची टोपी शिवून द्या"". तर शिंपी म्हणाला, ""चल हट, मी नाही देत जा"". तसा उंदराला आला राग.

तो म्हणाला ""राजाकडे जाईल, चार शिपायांना बोलवेल, ते तुला मारतील व मग मी तुझी मजा बघेल"". शिंपी घाबरला. म्हणाला, ""नको रे बाबा, नको नको नको. आण तो तुकडा, मी टोपी शिवून देतो"". म्हणत शिंप्यानं टोपी शिवून दिली.

तसा तो उंदीर गेला, कुणाकडं? परटाकडं ! परटाला म्हणाला , ""परीटदादा, परीटदादा, माझी एवढी टोपी धुवून द्या"". परीट खूप कामात होता. तो म्हणाला, ""नाही रे उंदरा, मला वेळ नाही आता. जा"". तसा तो उंदीर म्हणाला, ""राजाकडे जाईल, चार शिपायांना बोलवेल, ते तुला मारतील व मग मी तुझी मजा बघेल. परीट घाबरला. म्हणाला, ""नको रे बाबा, नको नको नको. आण मी टोपी धुवून देतो"". म्हणत त्याने टोपी धुवून दिली. तसा उंदीर गेला रंगाऱ्याकडे व म्हणला, ""रंगारीदादा रंगारीदादा, माझी टोपी छान लाल रंगवून द्या"". रंगारी म्हटला, ""जा जा, मी नाही देत जा."" तसा उंदीर काय म्हटला? बरोब्बर! "राजाकडे जाईल, चार शिपायांना बोलवेल, ते तुला मारतील व मग मी तुझी मजा बघेल"". रंगारी घाबरला आणि त्यानं टोपी छान लाल लाल रंगवून दिली. मग उंदीर गेला गोंडेवाल्याकडे व म्हणला, ""गोंडेवाले, गोंडेवाले, माझ्या टोपीला चार गोंडे लावून देता का?"" गोंडेवाला बोलला, ""मी नाही देत.

ज्जा"" तसा उंदीर त्याला पण म्हणाला, काय?, ""राजाकडे जाईल, चार शिपायांना बोलवेल, ते तुला मारतील व मग मी तुझी मजा बघेल"". तसा गोंडेवाला घाबरला. म्हणाला, ""नको रे बाबा, नको नको नको. आण मी टोपीला गोंडे लावून देतो"". मग त्याने गोंडे लावून दिले. उंदीर झाला खूष. त्यानं टोपी घातली डोक्यावर आणि मजेत गाणी म्हणत चालला. तिकडून राजा चालला होता. राजाबरोबर होते शिपाई.

राजाने उंदराला बघितले आणि शिपायांना म्हणाला, ""घ्या रे त्याची टोपी हिसकावून"". तशी शिपायांनी उंदराची टोपी हिस्कावली आणि राजाच्या डोक्यावर ठेवली. उंदीर पळाला आणि पळता पळता म्हणायला लागला, ""राजा भिकारी, राजा भिकारी! माझी टोपी घेतली, घेतली"". आता राजाला आला राग. त्यानं डोक्यावरची टोपी काढली आणि उंदराकडे भिरकावली. तशी ती टोपी उंदराने उचलली, झटकली आणि पुन्हा डोक्यात घातली आणि म्हणायला लागला , ""राजा मला भ्याला, माझी टोपी दिली, राजा मला भ्याला, माझी टोपी दिली, ढुमढुम ढुमाक, ढुमढुम ढुमाक, ढुम!

# बाप...

आधुनिक केसरी

संस्कारधन

सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.40

प्रत्येक वेळी आई वर निबंध, कविता ,गाणी, कथा, चित्रपट, ओव्या, भाषण लिहिल्या जातात. मात्र खरा पडद्यामागचा कलाकार बाप असतो. त्याच्यावर फार थोडं लिहिल्या जातं.मात्र बाप घराचं पावित्र्य असतो. घराचा पाया असतो. घराचा भक्कम आधार असतो. प्रत्येक वेळी काटकसर करून बाप घरासाठी पैसा जमवत असतो. आपला परिवार सुखी आणि समाधानी कसा राहील याचाच विचार बाप करत असतो. बापातील वाघ आपल्याला दिसतो .पण त्यालाही आईचं काळीज असतं हे कोणालाच दिसत नाही. लेकीसाठी मात्र खूपच कष्टत असतो. तिच्या जन्मापासून पैसा जमायला सुरुवात करतो. तिचं शिक्षण, लग्न पार पडेपर्यंत बापाच्या जीवाला चैन पडत नसते. कर्जबाजारी झाला तरी बाप लेकीला काही कमी पडू देत नाही. लेक सुखात असेल तर बापाचं काळीज आभाळा एवढं होतं. तिला माहेरी आल्यावर काही कमी पडू नये असं बापाला वाटतं.

मुलासाठी पण बाप तेवढेच करतो. त्यांचं शिक्षण त्यांच्यासाठी घर त्यांचे लग्न हे करता करता तो खूप थकतो. पण तरीही मुलांना सांगत असतो, तुम्ही फक्त तुमचं बघा, आम्हाला काही नको. तुम्ही सुखी तर आम्ही सुखी .स्वतःच्या सगळ्या गरजा बाजूला ठेवून घरासाठी मात्र काही कमी पडू देत नाही बाप. आजारी पडला तर डॉक्टरकडे न जाता मेडिकल मधून गोळ्या आणून स्वतःला बरं करतो. डॉक्टर कडे गेलो तर डॉक्टर आराम करायला सांगतील. मग सुट्टी घ्यावी लागेल. या भीतीने डॉक्टर कडे जात नाही. कुटुंबाच्या आनंदात आपला आनंद शोधणारा फक्त बापच असतो. बाप कारखानदार असो की, रिक्षावाला असो, की दगड फोडणारा असो बाप.,... बापच असतो... आपल्या मुलांवर तो तेवढेच प्रेम करतो. बापाच्या प्रेमात गरीब श्रीमंत हा भेद नसतो. कधीकधी श्रीमंत बापा पेक्षा गरीब बाप मुलाला जास्त प्रेम व वेळ देत असतो. त्यातून तो मुलांना आत्मविश्वास देत असतो. स्वतःमुलांना पोहायला शिकवतो, लढायला शिकवतो, संघर्ष करायला शिकवतो, परिस्थितीवर सहज मात करायला शिकवतो, पैशापेक्षा माणुसकी महत्त्वाची ही कृतीतून दाखवून देतो. मला मिळालेलं दुःख मुलांना मिळू नये म्हणून खस्ता खात असतो. एक मात्र खरं,...... बाप....बापच असतो...

# सुजान पालकत्व : काळाची गरज

आधुनिक केसरी

**भारताची कुटुंब व्यवस्था हे भारताचे बलस्थान आहे. परंतु काळपरत्वे हे बलस्थान आता दिवसेंदिवस कमकुवत होत चाललंय . संयुक्त कुटुंब पद्धतीपासून आपण आता बरंच दूर आलेलो आहोत. आता नोकरीच्या निमित्ताने दूर कुठेतरी गेलेले मूलबाळ तिथेच स्थायिक होतात आणि आम्ही दोघे आमचा एक अस त्रिकोणी कुटुंब सातत्याने वाढत चाललेल आहे. त्यामुळे आधी घरातल्या बाळाला आजी - आजोबा, काका - काकू, मामा - मामी, मावशी - काका, आत्या - मामा हे सगळे नात नाते दुरावले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात नातेसंबंध राहतात की नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे.**



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

या पार्श्वभूमीवर आज सुजाण पालकत्व ही काळाची गरज असा एक विषय घेऊन तुमच्या समोर येतो आहे . आई-वडील होणं सोपं आहे . परंतु आई-वडील झाल्यानंतर एक सुजाण पालक होणे हे मात्र तितकच जिम्मेदारीचं , जबाबदारीच असं काम आहे . परंतु , कालौघात पती-पत्नी दोघेही नोकरी निमित्त घराबाहेर पडत असल्यामुळे आज पालकत्वाची भूमिका कुठेतरी कमजोर होताना दिसते आहे आणि म्हणून आज या विषयाला आपण हात घालावा असा विचार मनात आला. समुपदेशन करत असताना किंवा , व्यक्तिमत्व विकासाचे व्याख्यान दिल्यानंतर बरेचदा शालेय व तरुण मुला-मुलींशी येणारा संबंध आणि त्यातून त्यांचा व्यक्त होत जाणं यातून अनेक समस्या आजच्या तरुणाईच्या समोर उभ्या ठाकल्या असल्याचं जाणवतं . तसंच शालेय विद्यार्थ्यांच्या सुद्धा आज समस्या मोठ्या प्रमाणात उभ्या ठाकत आहेत . त्यामुळे आज पालकांनी अतिशय जागरूक होऊन या सगळ्या गोष्टींचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असं मला वाटतं.

आपला मुलगा कोणत्या शाळेत जातो ? तो कोणत्या वर्गात आहे ? त्याचे मित्र-मैत्रिणी कोण आहेत ? त्याला शिकवणारे वर्ग शिक्षक किंवा वर्गशिक्षिका कोण आहेत ? तो शाळेत नियमित जातो का ? कॉलेजमध्ये नियमित जातो का ? शाळा कॉलेजमध्ये गेल्यानंतर तो नियमित वर्ग करतो का ? शाळा आणि कॉलेजचा अभ्यासक्रम नीट करतो का ? ट्युशन क्लासेस असतील तर ट्युशनला नियमित जातो का ? त्याचे मित्र-मैत्रिणी ट्युशन मध्ये कोण आहेत ? ट्युशनचे शिक्षकांच्या किंवा शाळेतल्या शिक्षक शिक्षकांच्या भेटी आपण दर महिन्यात घेतो का ? या सगळ्या गोष्टी आज अत्यंत आवश्यक झालेल्या आहेत .आणि यातूनच आज आपला मुलगा किंवा मुलगी कोणत्या दिशेला जात आहे ? आपला मुलगा किंवा मुलगी योग्य वळणार आहे की नाही ? याची जाणीव पालकांना होते . परंतु आज पालक दोघेही नोकरीवर असल्याने मुलगा किंवा मुलगी शाळा झाल्यानंतर दिवसभर घरी एकटं राहण्याचा प्रमाण वाढला आहे . त्यामुळे या वेळात आपला मुलगा किंवा मुलगी काय करतो आहे ? कोणाच्या संपर्कात राहतो ? काय करतो ? मोबाईल त्याच्याकडे असेल तर तो मोबाईलवर काय पाहतो ? टीव्ही चॅनल्स असतील तर तो कोणत्या चैनल वर सगळ्यात जास्त पाहतो ? कोणत्या चैनल ची त्याला आवड आहे ? या सगळ्या गोष्टीवर आज बारीक लक्ष ठेवणं नितांत गरजेचे आहे.

दुसरी महत्त्वाची आणि तितकीच अत्यंत गंभीर गोष्ट म्हणजे शाळेत जाणाऱ्या मुलांच्या हातात मोबाईल देणे .खरंतर बाराव्या वर्गात जाईपर्यंत कोणत्याही पालकांनी आपल्या मुलांना किंवा मुलीला मोबाईल घेऊन देऊ नये . कारण आज मोबाईल आणि त्यातल्या इंटरनेटमुळे जवळपास 75 ते 80% मुलं मुली हे चुकीच्या दिशेला जात आहेत. चुकीच्या गोष्टी पाहत आहेत . चुकीच्या वळणावर त्यांचं मार्गक्रमण वाढलेलं आहे . असं लक्षात येत आहे. याचा वैद्यकीय दृष्ट्या विचार केला तर डोळ्यावर होणारे परिणाम , मनावर होणारे परिणाम मेंदूवर होणारे परिणाम आणि याचा सगळ्यांचा परिणाम म्हणून एकूणच शरीर स्वास्थ्यावर होणारा परिणाम हा निश्चितच गंभीर स्वरूपाचा आहे असं सर्वच वैद्यकीय क्षेत्रातल्या तज्ञ लोकांचा म्हणणं आहे . त्यामुळे शक्यतो आपल्या मुलांच्या हाती बारावी बारावी पास होईपर्यंत मोबाईल न देणे हे सर्वोत्तम . दुसरी गोष्ट आपण आपल्या मुलाबाळांना किती वेळ देतो आहे ? आणि जो वेळ देतो आहे तो " क्वालिटी टाईम " देतो आहोत ? का याचाही विचार करणे आवश्यक आहे. आपल्या मुलाबाळांना बऱ्याच गोष्टी, हा आजच्या मुला मुलींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. त्यामुळे याचे खूप विपरीत परिणाम गेल्या काही वर्षात समोर येताना आपण पाहतो आहोत. त्यामुळे पालकांनी आता खऱ्या अर्थाने एक सुजाण पालक म्हणून आपली भूमिका पार पाडणे अत्यंत आवश्यक आहे. जमेल तितका जास्तीत जास्त वेळ आपल्या मुलाबाळांना देणे, त्यांच्यासोबत बाहेर फिरायला जाणे, त्यांच्यासोबत सिनेमा पाहणं, त्यांच्यासोबत पिकनिक एन्जॉय करणं, त्यांच्या मित्र-मैत्रिणींना घरी बोलवून त्यांच्यासोबत आपण एन्जॉय करणं किंवा त्यांच्या मित्र-मैत्रिणींच्या घरी आपण सहपरिवार जाणं आणि कौटुंबिक संबंध निर्माण करत एकमेकांच्या परिवाराबद्दल आदरयुक्त भावना निर्माण करत मुला-मुलींना विश्वासात घेणं हे अत्यंत आवश्यक आहे. दूध आणायला सोबत जाणं, बाजारात



त्यांच्या आवडीनिवडीच्या, त्यांच्या कॉलेजच्या, त्यांच्या मित्र-मैत्रिणींच्या, त्यांच्या खेळण्याच्या या तुम्हाला सांगायच्या असतात. पण आई वडील घरी नसल्यामुळे मग हे मुलं मुली बाहेर कुठेतरी आपला आसरा शोधायला लागतात आणि त्यांच्याजवळ व्यक्त व्हायला लागतात. यातून मैत्री दृढ होत जाते. या दृढ होत गेलेल्या मैत्रीचा पुढे एका वेगळ्या वळणाचा प्रवास सुरू होत जातो . त्यामुळे आपल्या मुला मुलींना आपण " क्वालिटी टाईम " देन हे अत्यंत आवश्यक आहे . तिसरी गोष्ट म्हणजे आपलं आपल्या मुला मुलींसोबत असलेला नातं . खरं तर हे नातं अत्यंत मैत्रीपूर्ण असण काळाची गरज आहे. कायमच आई-वडिलांच्या भूमिकेत राहून मुलाला मार्गदर्शन करणे किंवा कायमच आई-वडिलांच्या भूमिकेतूनच मुला-मुलींना पाहणे योग्य नाही . तर, आपण त्यांचे चांगले मित्र-मैत्रिणी होऊ शकू का की जेणेकरून कुठल्याही गोष्टी ते आपल्याशी तितक्याच मनमोकळेपणाने शेअर करू शकतील याचा विचार करण्याची आज नितांत गरज आहे. आज आपण शालेय जीवनातील मुला मुली सोबत की महाविद्यालय जीवनातील मुला मुली असो मोठ्या प्रमाणात भरकटताना दिसत आहेत. निगेटिव्हिटी, डिप्रेशन, एकलकोंडेपणा, जिद्दी स्वभाव, शीघ्रकोपी पणा सोबत जाणं, किराणा आणताना सोबत जाणं, आणि काही छोट्या-मोठे काम असतील अशा ठिकाणी सुद्धा आपल्या मुलांना आपण सोबत घेऊन जात राहिलो तर यातून मुलाबाळांचा तुमच्यावरचा विश्वास वाढायला लागतो . ते तुमच्या जास्त जवळ येऊ लागतात . आणि यातून ते तुमच्याजवळ मनमोकळेपणाने त्यांच्या अनेक गोष्टी सहजरीत्या शेअर करू लागतात. शिवाय त्यांच्यामध्ये यातून कॉन्फिडन्स वाढत जातो, लोकं कळायला लागतात, व्यवहार कळायला लागतात आणि पुढे जाऊन हे सगळं त्यांना त्यांच्या आयुष्यात निश्चितच कामी येणार असत. आपल्या मुलाबाळांना आजच्या भौतिक युगातील स्पर्धेचा घोडा न करता त्यांना समाजातला एक आदर्श घटक म्हणून आपण निर्माण करणं हे आपलं कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य पार पाडत असताना आपल्या मुलाबाळांचा हात सोबत घेऊन आपण त्यांना समाजापर्यंत घेऊन जाणे आणि समाजातल्या चांगल्या वाईट गोष्टींचा त्यांना परिचय करून देणे आणि यातून त्यांच्या मनात भविष्यातील एक आदर्श माता-पिता म्हणून आपलं स्थान निर्माण करणे हे आज काळाची गरज आहे. यासाठी निश्चितच एक सुजाण पालक होणं हे आज काळाची गरज आहे आणि म्हणून त्यासाठी हा लेखन प्रपंच.

# लय भारी सुगरण



सौ. सविता खंडगावकर , नांदेड
संपर्क क्र. 7218340512

आधुनिक केसरी




मूग डाळ वडा सोपा आणि झटपट पकोडा रेसिपी मसाले आणि औषधी वनस्पती मिसळून पिवळ्या आणि भिजवलेल्या पिवळ्या मूग डाळ मसूरसह बनवल्या जातात. हा एक कुरकुरीत आणि मऊ तळलेला नाश्ता आहे जो मुलांना आणि सर्व वयोगटांना आवडतो. याला दलवडा असेही म्हणतात आणि ते बनवण्यासाठी फारच कमी घटक लागतात. हे वडे एक आदर्श संध्याकाळच्या स्नॅक रेसिपी आहेत ज्याची चव एका कप चहासोबत छान लागते किंवा लंच किंवा डिनरसाठी साइड डिश म्हणून देखील दिली जाऊ शकते.

**डाळ वडासाठी :** 1 वाटी मूग डाळ, २ हिरव्या मिरच्या, इंच आले, 3 लसूण पाकळ्या,1 टीस्पून धणे दाणे, 1 टीस्पून काळी मिरी, 1 टीस्पून एका जातीची बडीशेप, 1 टीस्पून अजवाईन, चवीनुसार मीठ, कप चिरलेला कांदा, २ हिरव्या मिरच्या चिरलेल्या, कप कोथिंबीर पाने, तळण्यासाठी तेल, चटणीसाठी, 1 कप कोथिंबीर पाने, 3 हिरव्या मिरच्या इंच आले, 4 लसूण पाकळ्या, चवीनुसार मीठ.

**सूचना :** १ कप मूग डाळ धुवून ४-५ तास भिजत ठेवा. नंतर भिजवलेल्या डाळीचे पाणी गाळून घ्या. आता मिक्सरच्या भांड्यात हिरवी मिरची, आले आणि लसूण टाकून डाळ घाला. पिठात पाणी न घालता जाडसर पेस्टमध्ये बारीक करा. दळलेले मिक्सर एका भांड्यात काढा आणि एका दिशेने सतत ढवळत रहा. काही मिनिटांनंतर मिक्सर हलका आणि फ्लफी होतो आणि त्याचा रंग बदलतो. नंतर त्यात ठेचलेली कोथिंबीर, ठेचलेली काळी मिरी, एका जातीची बडीशेप, अजवाइन, मीठ, चिरलेला कांदा, हिरवी मिरची आणि कोथिंबीर घाला. चांगले मिसळा. आता कढईत तेल गरम करून त्यात वडे घाला. वडा मध्यम आचेवर कुरकुरीत आणि सोनेरी रंगाचा होईपर्यंत तळा.

गरमागरम डाळ वडा चटणी, तळलेल्या मिरच्या आणि कांद्याच्या कापांसोबत सर्व्ह करा. चटणीसाठी ग्राइंडिंग जारमध्ये कोथिंबीर, हिरवी मिरची, आले, लसूण पाकळ्या आणि चिरलेला टोमॅटो घाला. जाडसर पेस्टमध्ये बारीक करा. एका भांड्यात काढा आणि त्यात मीठ घाला. मसालेदार चटणी डाळ वडासोबत सर्व्ह करा. नोट्स डाळ एका जाडसर मिश्रणात बारीक करा; गुळगुळीत पेस्टमध्ये बारीक करू नका. पीठ एका दिशेने ढवळावे जेणेकरून हवेचे कण पिठात मिसळतील. डाळ वडा मध्यम आचेवर तळून घ्या.

# डॉ. अभय पाटील यांच्या उमेदवारीकडे सर्वसामान्यांचे लक्ष

आधुनिक केसरी



वसंत खडसे
9373578429

**वाशिम :** अकोला लोकसभा निवडणूक लढविण्याचे अनुषंगाने अकोल्याचे सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉक्टर अभय पाटील यांनी गेल्या काही महिन्यापासून जनसंपर्कदौऱ्यांना सुरुवात केली होती. दौऱ्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या भेटीगाठी घेत धार्मिक, सामाजिक कार्यात त्यांचा पूर्वीपेक्षा जास्त पुढाकार वाढला होता. त्यामुळे आपसुकच डॉ. अभय पाटील लोकसभा निवडणूक लढविणार हे निश्चित झाले आहे. भाजपाकडून अनुप धोत्रे यांची उमेदवारी घोषित झाल्यामुळे आता भाजपाला तोडीसतोड टक्कर देण्यासाठी डॉक्टर अभय पाटील यांची उमेदवारी घोषित होण्याकडे सर्वसामान्य



जनतेचे लक्ष लागले आहे. कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या अकोला मतदारसंघात सद्यस्थितीत काँग्रेसची स्थिती खूप बिकट झालेली आहे. 1951 ते 1984 पर्यंत सलग बारा वेळा विजयश्री प्राप्त करत काँग्रेसने या मतदारसंघावर आपला दबदबा कायम ठेवला होता. मात्र 1989 मधील लोकसभा निवडणुकीत स्व. पांडुरंग उपाख्य भाऊसाहेब फुंडकर यांनी विजयश्री प्राप्त करत काँग्रेसचा हा अभेद्य बालेकिल्ला भाजपाच्या ताब्यात घेतला. आणि त्यानंतर स्व. फुंडकर यांनी सलग तीनदा निवडणूक लढवून विजयाची हटट्रिक साजरी केली होती. परंतु 1998 99 मधील निवडणुकीत काँग्रेस सोबत युती करून ऍड. प्रकाश आंबेडकर विजयी झाले होते.पण त्यानंतर काँग्रेस पक्षांतर्गत असलेली गटबाजी आणि समविचारी मित्र पक्षासोबतची विस्कटलेली युती याचा फायदा उठवत भाजपाने पुन्हा एकदा काँग्रेसचा हा बालेकिल्ला हिरावून घेत आपल्या ताब्यात घेतला. 2004 मधील लोकसभा निवडणुकीत भाजपाचे खासदार संजय धोत्रे इथून विजयी झाले ते आजतागायत कायम आहेत. गेल्या दोन दशकापासून खा. संजय धोत्रे यांनी अकोला मतदारसंघावर निर्विवाद वर्चस्वस्थापित केले आहे. आणि आता पुन्हा 2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने खा. धोत्रे यांचे चिरंजीव अनुप धोत्रे यांना उमेदवारी घोषित केली आहे. भाजपाच्या या घराणेशाहीला तोडीसतोड टक्कर देऊन पूर्वीचा हा बालेकिल्ला परत एकदा काँग्रेसच्या ताब्यात घेण्याची क्षमता असलेला उमेदवार म्हणून डॉक्टर अभय पाटील यांच्याकडे पाहिले जाते. कारण खा. धोत्रे यांनी आतापर्यंतच्या सर्व निवडणुका पक्षाच्या भरोशावर नव्हे; तर केवळ ' मराठा कार्ड ' चा भरवशावर जिंकल्या असल्याचे अनेक राजकीय तज्ञ बोलत आहेत. त्यांना शह द्यायचा असेल तर ' मराठा कार्ड ' चालणारा सक्षम उमेदवार पाहिजे असे सुद्धा राजकीय विश्लेषक बोलत आहेत. आणि काँग्रेसकडे डॉ. अभय पाटील यांच्यासारखा दगडा उमेदवार आहे. कारण डॉ. पाटील हे उच्चविद्याविभूषित, भाषेवर प्रभुत्व आणि दांडगा जनसंपर्क असलेले व्यक्तिमत्व आहे. शिवाय लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी लागणारे आर्थिक बळही त्यांच्याकडे आहे. 2019 च्या निवडणुकीत जर डॉ. पाटील यांचा शासकीय सेवेतील राजीनामा मंजूर झाला असता तर, कदाचित आजचे चित्र खूप वेगळे असते. काँग्रेसचा वनवास तेव्हाच संपला असता. असे अकोला लोकसभा मतदारसंघातील सुज्ञ मतदार बोलत आहेत. परंतु तेव्हाची हुकलेली संधी डॉ. पाटील यांना पुन्हा प्राप्त झाली आहे. काँग्रेस पक्षाने या संधीचा फायदा करून घेतला तरच भाजपाला रोखल्या जाऊ शकते. अन्यथा नाही, त्यामुळे डॉक्टर अभय पाटील यांची उमेदवारी घोषित होण्याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

**वक्तृत्वशैली आणि मधुर वाणीतून तरुणांना भूरळ घालणारे डॉ . अभय पाटील :** डॉक्टर अभय पाटील यांनी वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून अनेक गरजूंना मदत केली आहे . गावागावात वैद्यकीय शिबीर घेऊन गोरगरीब रुग्णांची सेवा केली आहे . त्यामुळे आपसूकच डॉक्टर पाटील यांची सर्वसामान्यांची नाळ जुळलेली आहे . धार्मिक उत्सवात तर त्यांचा नेहमीच सहभाग असतो, परंतु मराठा क्रांती मोर्चा त्यांनी स्वत :ला झोकून देत काम केले आहे . मराठा क्रांती मोर्चा चे ते समन्वयक सुद्धा आहेत . रोखठोक भूमिका मांडणारा व्यक्ती म्हणून ते संपूर्ण मतदारसंघात सुपरीचित आहेत . त्यांची मधुरवाणी आणि वक्तृत्वशैली तरुणांना भुरळ घालणारी असल्याने ते आजही तरुणांईच्या गळ्यातील ताईत आहेत .



# भोकरला पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** उन्हाळ्याच्या दूसऱ्या चरणात ऊन सावलीचा खेळ सुरू झाला असून दिवसा ऊन्हाच्या तीव्र झळा आणि रात्री गारवा असा अनुभव येताना शनिवारी (ता. १६) सायंकाळी पाच वाजताच्या दरम्यान मेघगर्जनेसह अवकाळी पावसाच्या सरी बसल्या आहेत.
#ऊन्हाळा सूरू झाला असला तरी अधुनमधून आकाशात ढगांची गर्दी होत असल्याने वातावरणात बदल झाल्याने आरोग्य धोक्यात आले आहे.अवकाळी पावसाने हजेरी लावली असून हरभरा, गहू, ज्वारी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.आंब्याला लागलेल्या कैरी झडुन गेल्या आहेत. तीव्र उन्हाच्या झळा सोसाव्या लागतात की काय अशी परिस्थिती असताना अचानक जोरदार पाऊस झाल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

# ऑटो, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना

## सुधीर मुनगंटीवार यांचा निर्धार राज्य सरकारने केला पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील लाखो ऑटो रिक्षा, मिटर्ड टॅक्सी चालकांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला असून त्यांच्यासाठी महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला ; विशेष म्हणजे 9 मार्च 2018 च्या अर्थासंकल्पीय भाषणात ना. सुधीर मुनगंटीवार हे अर्थमंत्री असताना त्यांनीच हा विषय प्रामुख्याने मांडलाहोता आणि ऑटो आणि टॅक्सी चालकांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळावा, कौटुंबिक सुरक्षा लाभावी या दृष्टीने पावले उचलण्याची सूचना केली होती. ना सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराला मिळालेले हे मोठे यश असून मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार यांचे मुनगंटीवार यांनी आभार मानले आहेत. महाराष्ट्रातील ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी यांची नोंदणी बॅज वितरण, निरीक्षण तपासणी व कर भरणा परिवहन खात्याबाबत करण्यात येतो; त्यामुळे ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सीचालकांची अद्ययावत संपूर्ण माहिती परिवहन विभागाकडे उपलब्ध असते. त्यामुळे परिवहन विभागाअंतर्गत ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास तसेच सदर मंडळ स्वायत्त व स्वयंपूर्ण व्हावे, यासाठी निधीचा स्त्रोत निर्माण करण्यास व शासनाकडून एक वेळचे अनुदान रुपये 50 कोटी तात्काळ उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळ बैठकीत शासनाच्या मंजुरीसाठी मंडण्यात आला होता व त्याला मंजुरी प्रदान करण्यात आली. ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या कामकाजासाठी महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील वर्ग एक संवर्गातील अधिकारी मुख्याधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय देखील बैठकीत घेण्यात आला. सदर महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे गठन झाल्यानंतर या मंडळामार्फत ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालकांना केंद्र शासनामार्फत व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.
सदर मंडळाच्या कामकाजाबाचे नियम आणि नियमावली परिवहन आयुक्त यांच्याकडून तयार करण्यात येणार असून महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याण मंडळाचे स्वीय प्रपंजी खाते (पिएलए ) उघडण्यास तसेच सदर मंडळ सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत नोंदणी करण्यास मान्यता देण्याचे बैठकीत ठरले. राज्यात नोंदणी झालेल्या ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी या वाहनांकडून तीनशे रुपये प्रति वर्ष कल्याणकारी निधी म्हणून जमा करण्यात येणार असून यासाठी 1958 मध्ये सुधारणा करून नव्याने अधिकार वसूल करण्याबाबतची तरतूद समाविष्ट करत या कमी स्थापन केलेल्या खात्यामध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात आली.



ना सुधीर मुनगंटीवार यांनी सन 2018 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाषण करताना, राज्यामध्ये ऑटो रिक्षा चालकांची संख्या जवळपास वीस लाखांपर्यंत आहे असा उल्लेख करत त्यांच्या विविध अडचणी मांडण्यासाठी पण निराकरणासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळावे असा उल्लेख करून महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा चालक कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा मानस असल्याचे सभागृहात सांगितले होते . यासाठी सन 2018-19 मध्ये पाच कोटी रुपये इतका नियत व राखून ठेवण्यात येत असल्याचेही त्यांनी घोषित केले होते . ऑटो रिक्षा चालक, मीटर टॅक्सी चालक यांच्यासाठी ना सुधीर मुनगंटीवार यांची भावना विद्यमान सरकारने ओळखून मोठा निर्णय आज घोषित केल्यामुळे ना सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत .

# राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत कन्नड पॉलिटेक्निक द्वितीयस्थानी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील सिंहगड इन्स्टिट्यूट लोणावळा, पुणे यांचेद्वारा घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय तंत्रशिक्षण प्रकल्प स्पर्धा अर्थात 'जेनेसिस टेक्नोफेअर 2024' मध्ये इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) कन्नडने द्वितीय पुरस्कार मिळवत यावर्षीही या क्षेत्रातील आपले वर्चस्व व दबदबा सिद्ध केला आहे. सदर प्रकल्प स्पर्धा ही महाराष्ट्रातील सर्व तंत्रशिक्षण महाविद्यालयांसाठी आयोजित करण्यात आलेली होती त्यात महाराष्ट्रातील सुमारे 60 नामांकित तंत्रशिक्षण संस्थांचे विद्यार्थी प्रतिनिधी व त्यांचे शिक्षक प्रशिक्षक यांनी सहभाग नोंदवला. या सर्व उपक्रमांची पाहणी, निरीक्षण व गुणांकन करण्यासाठी विभागातील तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती. कन्नड कॉलेजचे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्यूनिकेशन विभागाच्या सागर जाधव यांचे नेतृत्वात दर्शन पवार, कुणाल केवट व विकास सातपुते यांनी सादर केलेला " जनरेशन ऑफ इलेक्ट्रिसिटी विथ वेस्ट मटेरियल अँड प्लास्टिक विथ फिल्टरींग स्मोक" हा प्रकल्प सर्वांचे लक्ष वेधत मानांकनात राज्यातून दुसरे स्थान पटकावले. यशस्वी गटाला प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. यशस्वी गटाला प्रशिक्षक प्रा, गोपाल दाभाडे, तेजस दापके व विभाग प्रमुख प्रा. सोनाली गोरखा यांनी मार्गदर्शन केले.
मागील वर्षी सुद्धा महाविद्यालयाने राज्यस्तरावर आपला सहभाग नोंदवीत प्रथम क्रमांक पटकाविला होता व या वर्षी सुद्धा द्वितीय क्रमांक पटकावल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष किशोर पाटील, विश्वासराव मोतीगे, प्रसन्ना पाटील, सिद्धार्थ पाटील, महाविद्यालयाचे प्रा. प्राचार्य संतोष मतसागर, विभाग प्रमुख प्रमोद गडपायले, सागर भोजने, श्रीराम काळे, महेंद्र राजपूत यांनी सर्व यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.



# मल्हाररावांच्या नावाने सैनिकी शाळा काढली पाहिजे : माजी मंत्री अण्णासाहेब डांगे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** वैभवशाली होळकरशाहीचे संस्थापक, ५२ युद्धांचे विजेता- वीरपुरुष, मराठीशाहीचे आधारस्तंभ, माळवाधिती, इंदौर नरेश, मुत्सद्दी महानायक श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची जयंती मुरुम, ता. फलटण येथे त्यांच्या जन्मभूमीत साजरी करण्यात आली. राष्ट्रपुरुष श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर जयंती महोत्सव समिती, महाराष्ट्र राज्य, ग्रामपंचायत मुरूम, पंचायत समिती फलटण व जिल्हा परिषद सातारा यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.इथे मल्हाररावांच्या नावाने सैनिकी शाळा काढली पाहिजे.असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी असलेले माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनी केले.माजी मंत्री अण्णा साहेब डांगे यांच्या सह माजी आ. रामहरी रुपनवर,आमदार दिपकराव चव्हाण, सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती अशोकराव खरात, सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष माणिकराव सोनवलकर,अंकुशराव भांड,डी. के. पवार फलटण पंचायत समितीचे माजी सभापती शंकरररराव माडकर आदींसह इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. माजी मंत्री अण्णासाहेब डांगे म्हणाले की,स्मारक उभे करायचे म्हणजे नुसते पुतळे उभे करायचे असे नाही.देशाच्या रक्षणासाठी सैनिक तयार करायला पाहिजे.आज खरच गरज आहे. प्रामाणिक माणसाने राजकारणामध्ये यायला पाहिजे.प्रामाणिक माणसाच्या हातात देशाची धूरा जायला पाहिजे.ही आज गरज आहे. दुर्दैव असे आहे की, असं मिळणं दुरापास्त झालेलं आहे. स्वराज्य मिळून एवढी वर्ष झाली,याच्या मध्ये दोन पिढया निघून गेल्या.पहिल्या पिढी मध्ये याच्या बद्दल अस्मिता होती.ती दुसऱ्या पिढीत राहिलेली नाही. ह्या तालुक्यातील लोकांच्या मध्ये तरी ही भावना निर्माण झाली आहे का? नाही झाली? म्हणून हे करायची गरज आहे.त्याच्या साठी स्मारक पाहिजे.सैनिकी स्कूल पाहिजे.मी देशाचा नागरिक आहे.मी देशभक्त आहे.ही प्रेरणा निर्माण झाली पाहिजे.या देशाची माती माझ्या कपाळाला लावण्याची आहे.प्रत्येक समाज समूहातील मनुष्य हे माझे दैवत आहे.असे म्हणून सर्व समाजाची काळजी करा.हे स्मारक उभे राहावं.असे सुद्धा त्यांनी म्हटले .सरकारने दिलेल्या पैशाचा हिशोब हा आपल्याला उघडपणे लोकांकडे मांडता येईल.अशा पद्धतीचा हिशोब ठेवा.हेच माझं तुम्हाला सांगणं आहे.नुसतं स्मारक केलं.एवढ्या वर भागणार नाही.उद्या माणसं अशी गोळा करा की हे मैदान कमी पडलं पाहिजे. चौंडीला आता कार्यक्रम होतात.लाखांनी माणसं जमतात.तसं इथे सुद्धा लाखांनी माणसं जमली पाहिजेत. श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर म्हणाले की,संपूर्ण उत्तरेचा इतिहास हा श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या अभ्यासाशिवाय होऊ शकत नाही.अनेक वर्षांचा हा इतिहास.असं ही काही नाही त्यांना दीर्घ आयुष्य ही लाभलं.शेवटच्या श्वासा पर्यंत मल्हारराव होळकर हे रणांगणावर आपल्याला त्याठिकाणी कुठल्या ना कुठल्या लढाईच्या निमित्तानं ते इतिहासात पाहायला मिळतात.अशी व्यक्ती आपल्या भागामध्ये जन्माला आली.जन्मगांव हे आपले मुरूम आहे.फलटण तालुक्यातील आहे. साहजिकच आपल्याला याचा अभिमान आहे.यावेळी माजी आमदार हरीहर रूपनवर,गोविंदराव देवकाते, अंकुशराव भांड, माणिकराव सोनवलकर आदींनी सुद्धा मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम प्रसंगी लोणंद कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील शेळके पाटील, माजी उपसभापती रेखा बाबासो खरात,पाडेगावच्या माजी सरपंच स्मिता खरात, माजी नगरसेवक बुरुंगले, जी.बी.गावडे, फलटण पंचायत समितीचे माजी सदस्य सागर कांबळे,लोणंदचे माजी उपनगराध्यक्ष शिवाजीराव शेळके पाटील, राम भांडुरकर, अशोक दहापुरे, मधुकरराव लंबाते, विश्वास दादा गावडे,राजेंद्र बरकडे, हणमंतराव शेळके पाटील,नगरसेवक सागर शेळके पाटील, संदीप शेळके पाटील,निलेश शेळके पाटील,सुखदेव आप्पा बेलदार,संतोष खटके,राजाराम बोंद्रे,एन के आटोळे, अशोकराव सोनवणे,चंद्रकांत वाघमोडे, गणेश केसकर, नितीनराव भोसले, महादेवराव माने, भाऊसाहेब कापसे,संतोष ठोंबरे, आप्पा ठोंबरे, महादेव सुळ,नानासाहेब धायगुडे,ओंकार कर्णवर आदीं सह फलटण तालुक्यातून तसेच इतर भागातून आलेले समाज बांधव उपस्थित होते.

# जनतेप्रती कर्तव्य बजावल्याचा आनंद : हंसराज अहीर

## बहुप्रतिक्षित नंदीग्राम एक्सप्रेसला अहीर यांनी दाखविली हिरवी झेंडी

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** नंदीग्राम एक्सप्रेसचा बल्लारशाहपर्यंत विस्तार व्हावा ही चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्यातील प्रवाशांची, जनतेची सातत्याने मागणी होती. या मागणीला पुर्णत्वास आणण्यात यश मिळाल्याचे मोठे समाधान असून लोकांच्या न्याय हक्कासाठी आपण सदैव तत्पर राहू असे प्रतिपादन राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी नंदीग्राम एक्सप्रेसच्या शुभारंभ प्रसंगी केले.

नंदीग्राम एक्सप्रेसचा बल्लारशाह पर्यंत विस्तार करण्याच्या प्रयत्नास माननिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवजी व राज्यमंत्री रावसाहेब दानवेजी यांचे सहकार्य लाभल्याचे सांगतानाच अहीर म्हणाले की, बल्लारशाह येथून नंदीग्राम एक्स्प्रेस सुरू करून जनतेप्रती असलेले आपले कर्तव्य पार पाडताना अत्यंत आनंद होत आहे. जनतेने मला जनसेवेकरीता प्रतिनिधित्व सोपविले आहे, जनतेप्रती असलेले माझे कर्तव्य पार पाडण्याची माझी जबाबदारी आहे असेही अहीर म्हणाले.

बल्लारशाह ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई या बहुप्रतिक्षित नंदीग्राम एक्सप्रेसला दि. १६ मार्च रोजी सकाळी ०८.३० वाजता हंसराज अहीर यांनी बल्लारशाह रेल्वे स्थानकावर हिरवी झेंडी दाखवून या रेल्वेगाडीचा शुभारंभ केला.

बल्लारशाह ते मुंबईसाठी पुरेशी रेल्वे सुविधा नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याने अहीर यांनी आदिलाबादहून नंदीग्राम एक्स्प्रेस बल्लारशाह येथून सुरू करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. आता ही रेल्वे दररोज धावणार आहे.

या रेल्वेचा लाभ चंद्रपूरचे आराध्य दैवत महाकाली देवीच्या जत्रेसाठी दरवर्षी मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील हजारो भाविकांना होणार आहे. तसेच बल्लारशाह, चंद्रपूर, यवतमाळ येथून नांदेड येथील प्रसिद्ध गुरुद्वाराकडे जाणाऱ्या शीख समाजबांधवांना होणार आहे त्यामुळे नंदीग्राम एक्सप्रेस सुरु झाल्याने प्रवाशांमध्ये प्रचंड उत्साह व आनंद व्यक्त करण्यात येत आहे याबाबत प्रवाशांनी व नागरिकांनी हंसराज अहीर यांचे विशेष आभार मानले.




बल्लारपूर व चंद्रपूर येथे पार पडलेल्या नंदीग्राम एक्सप्रेसच्या शुभारंभ कार्यक्रमास महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, ZRUCC सदस्य दामोदर मंत्री, श्रीनिवास सूंचूवार, अजय दुबे, लखनसिंह चंदेल, खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, रघुवीर अहीर, पुनम तिवारी, प्रशांत विघ्नेश्वर, राजु घरोटे, विनोद शेरकी, डॉ. विलास मुळे, सुशिल मुधडा, एडीआरएम रुपेश चांदेकर, एसीएम हेमंत बेअरा, उमाकांत दास व रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास रेणुका दुधे, राजेंद्र अडपेवार, रवि लोणकर, गणेश गेडाम प्रदिप किरमे, प्रमोद शास्त्रकार, मोहन चौधरी, विकास खटी, राजु कागदेलवार, श्रीकांत भोयर, नामपल्लीवार सर, राजेंद्र तिवारी, बि.पी सिंह, वंदना संतोषवार, राम हरणे, सारीका संदुरकर, मयुर भोकरे, डॉ. मिलींद दाभेरे, मुन्ना इलटम, प्रशांत साळवे यांचेसह रेल्वे सुविधा संघर्ष समितीचे सन्माननिय पदाधिकारी, नागरिक व प्रवासी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.



# नाथ मंदिर परिसरात लोकनेते संदिपान भुमरे व्यापारी संकुलाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत एकनाथ महाराज मंदिर परिसरातील नव्याने 135 व्यापारी संकुलाचे उदघाटन मार्केट कमिटीचे सभापती राजु नाना भुमरे यांच्या हस्ते करण्यात येऊन या व्यापारी संकुलास लोकनेते ना.संदिपान भुमरे व्यापारी संकुल असे नाव देण्यात आले असून शहरातील गरजूवंत छोटे व्यवसायिकांसाठी पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रयत्नातून गाळ्यांची उभारणी करण्यात येत आहे. यावेळी नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, शिवसेना शहराध्यक्ष तुषार पाटील,कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पठाडे,, माजी नगरसेवक अजित पगारे,माजी नगरसेवक भुषण काका कावसनकर,सुनील हिंगे, संजय कस्तुरे, बादशाह परळकर,स्वीय सहाय्यक नामदेव खरादसह व्यापारी व नागरिकांची उपस्थिती होती. या आनुषंगाने शहरात पोलीस स्टेशन समोर नाट्यगृहाचे उद्घाटन शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, नाथवंशज योगेश महाराज पांडव ,स्विय सहाय्यक नामदेव खराद यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. यावेळी नाथ मंदिर परिसरात व्यवसायिक गाळे,तसेच नाट्यगृह,साठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री संदिपान भुमरे ,चेअरमन विलासबापु भुमरे यांचे आभार व्यक्त केले.

# मोफत रिचार्जच्या फेक मेसेजने सोयगावसह परिसरातील तरुणाईची उडवली झोप

## एका क्लिकवर डाटा हॅकची शक्यता : सपोनि साबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरातः मागील आठवडाभरापासून परिसरातील व्हॉट्सॲप ग्रुपवर एका कंपनीचा ५५५ रुपयांचा रिचार्ज मोफत मिळणार असून त्यासाठी दिलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते. हा फेक मेसेज असल्याची बाब पुढे आली आहे. या मेसेजबद्दल काहीही माहिती नसलेली तरुणाई मित्रमंडळींशी संपर्क साधून खात्री करून घेण्याचा उपद्व्याप करीत आहेत. मोफत रिचार्जच्या लालसेपोटी तरुणाईची झोप उडाल्याचे चित्र असल्याची माहिती फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे यांनी सांगितले आहे.

सध्या सर्वत्र तरुण पिढीसह शाळकरी मुलांमध्ये मोबाइलचे आकर्षण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यातच मागील आठ दिवसांपासून एका मेसेजने तरुणाईला वेड लावले आहे. हा मेसेज व्हॉट्सॲप ग्रुपवरही फिरत असून त्यात तीन महिन्यांसाठी ५५५ रुपयांचा रिलायन्स जिओ रिचार्ज मोफत मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यासाठी संबंधित कंपनीच्या अध्यक्षांच्या मुलाच्या लग्नाची पार्श्वभूमी, व अध्यक्षांचा वाढदिवस सांगितला जात आहे. मोफत रिचार्ज मिळणार असल्याने तो पदरात पाडून घेण्यासाठी आपल्याला एक लिंक देण्यात आली आहे. या लिंकवर क्लिक केल्यावर लगेच मोफत रिचार्ज मिळणार असल्याचा हा फेक मॅसेज येत आहे. मात्र, या लिंकवर क्लिक केल्यावर तुमचा सर्व डेटा चोरी होण्याची तसेच मोबाईल हॅक होण्याचीच शक्यता अधिक आहे.




**कशी आणि काय काळजी घेणार?**



जर तुम्हाला कोणताही फेक मेसेज आला असेल तर तो ओळखणे खूप गरजेचे आहे . जर तुम्हाला कोणत्याही मेसेजमध्ये काही मोफत देण्याचे आमिष दाखवले जात असेल तर तो फेक मेसेजच आहे, हे समजून घेतले पाहिजे, अशा मेसेजमध्ये तुम्हाला लिंक दिलेली असते . चुकूनही या लिकवर क्लिक केल्यास तुमच्या खात्यातून पैसे चोरीला जाऊ शकतात, असे मेसेज ओळखण्यासाठी, तुम्हाला मेसेज कसा लिहिला आहे, अर्थात मेसेजच्या भाषेकडे देखील लक्ष द्यावे लागेल . जर मॅसेजच्या भाषेत काही चूक असेल व तुम्हाला त्या मॅसेजकडे अधिक लक्ष देण्याची गरज नाही, कारण हे संदेश फेक असल्याचे कळून येते . याशिवाय सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मॅसेज – मधील कोणत्याही लिंकवर क्लिक करू नये . कुणीही या फसवेगिरी करणाऱ्या मॅसेजवर विश्वास ठेवू नका . हा मॅसेज खोटा असून तुमची आर्थिक माहिती मिळवून फसवणूक करण्याची शक्यता असते . अशा मॅसेजला कुणीही भाळून जावू नये .

**सपोनि प्रफुल्ल साबळे, फर्दापूर पोलिस स्टेशन**

# परभणीत महाविकास आघाडीने केला विजयाचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** आगामी लोकसभा असो, विधानसभा निवडणूक एकमुखाने, एक दिलाने लढण्याचा अन् जिंकण्याचा संकल्प महाविकास आघाडीच्या आजी-माजी लोकप्रतिनिधींनीसह पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि.15) परभणीत आयोजित केलेल्या मेळाव्यातून सोडला. पाथरी रस्त्यावरील राजलक्ष्मी लॉन्सच्या सभागृहात आयोजित केलेल्या या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार श्रीमती फौजिया खान या अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी खासदार संजय जाधव, माजीमंत्री आमदार राजेश टोपे (घनसावंगी), आमदार सुरेश वरपुडकर, माजी खासदार ॲड. तुकाराम रेंगे, आमदार डॉ. राहुल पाटील, आमदार राजेश राठोड, माजी आमदार सुरेशदादा देशमुख, माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, माजी आमदार विजय भांबळे, माजी आमदार व्यंकटदार कदम, माजी आमदार सिताराम घनदाट, माजी आमदार सौ. मिरा रेंगे, माजी आमदार सुरेश जेथलिया, माजी आमदार शिवाजीराव चोथे, माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हाप्रमुख संजय साडेगावकर, जिल्हा प्रमुख विशाल कदम, माजी उपमहापौर भगवान वाघमारे, संतोष बोबडे, जाकेर लाला, इरफानूर रहेमान खान, श्रीमती जयश्री खोबे, विकास लंगोटे यांच्यासह अन्य नेतेमंडळी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आघाडीच्या या मेळाव्यातून लोकसभा व विधानसभा या निवडणूका सोप्या नाहीत, भारतीय जनता पार्टी नितिमूल्य वगैरे वेशीला टांगून साम-दाम-दंड-भेद वगैरेंसह लढतीत उतरला आहे. त्यामुळेच भाजपा



विरुध्दच्या या लढाईत पूर्ण ताकतीनेच उतरावे लागणार आहे, असे स्पष्ट करीत आजी-माजी लोकप्रतिनिधींनी भारतीय जनता पार्टीच्या राज्य व केंद्रातील सरकारच्या कारभारावर टीकेचे झोड उठविले. सर्व स्तरावर हे सरकार पूर्णतः अपयशी ठरले आहे, असे स्पष्ट करतेवेळी संपूर्ण देशभरात विकासाच्या निव्वळ गप्पा मारण्या पलिकडे या सरकारने काहीही केले नाही. विकासाच्या नावाने मत मिळणार नाहीत, हे ओळखल्यानंतर धर्माच्या नावाने मतांचा जोगवा मागण्याचा प्रकार या सरकारने सुरु केला.

परंतु, त्यातूनही यश पदरी पडणार नाही, हे ओळखल्यानंतर आता या दोन्ही सरकारने अब्जावधी रुपये खर्चून जाहीरातींचा भडीमार सुरु केला आहे. बसेस असो, दवाखाने, पेट्रोपंप असो, शाळा, टी.व्ही. असो, वर्तमानपत्रे जळी-स्थळी सरकारने प्रचंड जाहीरातबाजी करीत सर्वसामान्य मतदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. प्रयत्न तो प्रयत्न केवीलवाणा असून सामान्य मतदार मतपेटीतूनच या सरकार विरोधातील रोष निश्चितच व्यक्त करणार आहे, अशी ग्वाहीही या मंडळींनी दिली.

खासदार संजय जाधव यांनी आपल्या भाषणातून 2019 ची निवडणूक वेगळी होती. आता 2024 ची निवडणूक त्यापेक्षा सोपी आहे, या निवडणूकीत आघाडीतील सर्व नेतेमंडळी आपल्या सोबत आहेत, असे स्पष्ट करतेवेळी सर्व नेतेमंडळींनी एक मुखाने, एक दिलाने विरोधकांविरोधात चार हात करीत प्रखरपणे लढण्याची गरज आहे.

भारतीय जनता पार्टीने विकासाच्या खूप गप्पा मारल्या, धर्माचाही आधार घ्यावयाचा प्रयत्न केला. धर्म, जातीजातीत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शेकडो वर्षांची परंपरा असणाऱ्या परभणीतील उर्सात जय श्री राम ची नारेबाजी करीत दंगल घडविण्याचा प्रयत्न केला, असा आरोप करतेवेळी भविष्यातही अनेक प्रसंग येतील, त्यामुळे लढावेच लागेल, भिक घालण्याऐवजी ध्येय समोर ठेवून यश पदरात पाडून घ्यावे लागेल, असा विश्वासही व्यक्त केला. 'ये तो ट्रेलर है, अभि पुरी पिक्चर बाकी है', असा डायलॉगही मारला. भारतीय जनता पार्टी म्हणजे 'अलि बाबा आणि चाळीस चोर' अशी गत झाली आहे. मंत्रिमंडळातील सर्व मंत्री नगदी कमाईत गुंतले आहेत. मालामाल झाले आहेत, अशी परखड टिकाही जाधव यांनी केली.

# पाणी पुरवठा योजनेचे सत्तारांच्या हस्ते भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** नगर परिषद अंतर्गत सिल्लोड शहर बाढीव पाणी पुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते पार पडला असल्याची माहिती सरपंचपती सुरेश चव्हाण सामाजिक कार्यकर्ते घाणेगाव तांडा यांनी बोलताना दिली.

ना. अब्दुल सत्तार बांच्या पुढाकाराने राज्य शासनाने सिल्लोड नगर परिषद अंतर्गत, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत सिल्लोड शहर बाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी जवळपास ६० कोटी ३५ लाख ईतक्या ढोबळ किंम तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत १ जलशुद्धीकरण, शहराच्या विविध ठिकाणी ५ जलकुंभ, ११५ किमी वितरण व्यवस्था, जलशुद्धीकरण केंद्र येथे रस्ता व आबश्यक सुविधा आदी विकास कामांचा समावेश आहे. शहरात जेथे जेथे नवीन वस्त्यांचा विस्तार झाला आहे तिथे पाण्याची वितरण व्यवस्था करण्यात येणार आहे. सिल्लोड शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेतून शहरासह शहरा लगत असलेल्या वाडी वस्त्यांमध्ये देखील मुबलक शुद्ध पाणी पुरवठा नगर परिषदेच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी मंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी दिली.

# धुळ्यात दोनशेहून अधिक तरुणांचा भाजपमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** डॉ. सुभाष भामरे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत तसेच भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर व भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी व यांच्या नेतृत्वाखाली नगाव (ता. धुळे) येथील सुमारे दीडशेहून अधिक तरुणांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पारोळा रोडवरील येथील खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्या संपर्क कार्यालयात आज सकाळी हा पक्ष प्रवेशाचा सोहळा झाला. नगाव येथील दादा कोळी राम कोळी रवी शिंदे समाधान पाटील रवीन पाटील पुष्कर पाटील समाधान बेलदार सागर पाटील राहुल शिंदे याचप्रमाणे दोनशे हुन अधिक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला यावेळी भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर प्रतिभा चौधरी, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा जयश्री अहिरराव, महानगर जिल्हाध्यक्षा वैशाली शिरसाट, भाजपचे ज्येष्ठ नेते विजय पाच्छापूरकर, ओम खंडेलवाल, यशवंत येवलेकर, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी, पंकज धात्रक, नगरसेवक अमोल मासुळे, नगरसेविका योगिता बागूल, प्रशांत बागूल, संजय बोरसे, डॉक्टर योगेश पाटील, मंडळ अध्यक्ष ईश्वर पाटील ,योगेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत वानखेडकर, दिलीप आप्पा शितोळे, जिल्हा प्रवक्ते श्याम पाटील, भाजपा कार्यालय प्रमुख प्रकाश उबाळे,सुरज चौधरी,सुहास अंपळकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी . अंपळकर यांनी प्रवेशकर्त्या सर्व तरुणांचे गळ्यात पक्षाचा गमछा घालत स्वागत केले. तसेच त्यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवून भाजपचे नेते नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी व डॉ. सुभाष भामरे यांची खासदारकीची हॅट्रिक करण्यासाठी आगामी निवडणुकीत प्रत्येकाने झोकून देत काम करण्याचे आवाहन केले. जयश्री अहिरराव, यशवंत येवलेकर, वैशाली शिरसाट आदींनीही मार्गदर्शन करत तरुणांचे भाजपमध्ये स्वागत केले.

# काँग्रेसच्या आंदोलनाची दखल घेत महानगरपालिका प्रशासनाला जाग

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** १५ मार्च रोजी उल्हासनगर काँगेस पक्षाच्या वतीने महानगरपालिका प्रशासनाच्या ढसाळ कारभार विरोधात व प्रलंबित मागण्या संदर्भात आंदोलन घेण्यात येणार होते, ज्या मध्ये प्रामुख्याने भाजप अध्यक्ष व नगरसेवकांनी १०० कोटीच्या भ्रष्टाचार झा पी अँड कंपनी वरील आरोपांचा चौकशी व खुलासा , CAG या संस्थाने महानगरपालिका प्रशासनावर घेतलेल्या आक्षेपांचा खुलासा ,गोल मैदान येथील अनधिकृत कब्जा हटवणे व पर्यावरण संबंधित विषय चा समावेश होता. परंतु प्रशासनाने याची दखल घेत , संबंधित मागण्या संदर्भात चर्चा करण्यासाठी १५ मार्च ,दुपारी १ वाजता अतिरिक्त आयुक्त ज़मीर लेंग्रेकर यांच्या दालनात सर्व संबंधित विभागाच्या अधिकारी सोबत काँग्रेसच्या शिष्ट मंडळ यांची संयुक्त बैठक घेतली. सादर बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्रा द्वारे एक प्रकारे हा खुलासा केला कि भाजप अध्यक्ष,आमदार व नगरसेवक यांनी झा पी अँड कंपनीवर केलेले सर्व आरोप माघे घेतले आहेत. उल्हासनगर काँग्रेस पक्षाने जो आरोप पहिले केला होता कि हे सर्व विशिष्ट जवळीक लोकांना ठेका भेटावं म्हणून हि सर्व नौटंकी आहे आणि उल्हासनगर भाजप पक्ष हा जन हिता साठी नव्हे तर फक्त विशिष्ट ठेकेदारांच्या हिता साठी काम करत आहे, हे सिद्ध झाले आहे. तसेच CAG ह्या संस्थेने जे कोणार्क व रिजेंसि निर्माण या गृह संकुल मधील काही गोष्टींवर जो आक्षेप घेतला त्या संदर्भातील लेखी अहवालाची प्रत हि देखील या बैठकीत आम्हाला पुरवण्यात आली आहे, सर्वच मांगण्यानं संदर्भात उत्तर प्राप्त झाले असल्याने व कारवाही चे आदेश काढण्यात आले असल्याने आंदोलन हे अद्याप माघे घेण्यात आले आहे. पुढील कायदेशीर सल्ला घेऊन पुढची दिशा हि ठरवण्यात येईल , परंतु एकंदरीत ह्या सरकारमधील प्रशासकीय राजवटीत चालेला ढसाळ व भ्रष्ट कारभार याचा सत्य हे विरोधी पक्ष म्हणून उल्हासनगर काँग्रेस पक्ष जनते पर्येंत नेईल व येणाऱ्या निवडणुकीत जनताच ह्या लोकांना धडा शिकवेल अशी आम्हाला खात्री आहे. सदर बैठकीत उल्हासनगर काँग्रेसच्या माजी नगरसेविका अंजली साळवे ,ब्लॉक अध्यक्ष नाणीक अहुजा , महिला अध्यक्ष मनीषा महाकाळे, प्रवक्त अशेराम टाक, उपाध्यक्ष फामिदा शेख, सचिव उषा गिरी,पर्यावरण सेल अध्यक्ष विशाल सोनावणे,परिवहन सेल अध्यक्ष आबा साठे, दीपक सोनावणे उपस्तिथ होते.

# होमगार्ड्सच्या मानधनामध्ये वाढ करावी

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आपत्कालीन परिस्थितीमध्ये सर्व सरकारी यंत्रणांच्या सोबत उभे राहणारे होमगार्ड गेल्या दहा वर्षांपासून विविध प्रकारच्या मानधनामध्ये वाढ होण्याची प्रतीक्षा करीत आहेत. अलीकडेच पोलीस पाटील व आशा स्वयंसेवकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. त्याच धरतीवर होमगार्डच्या विविध भत्त्यांमध्येही वाढ करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्त्य व्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे.



पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी होमगार्ड्सच्या मानधनात वाढ करण्याची मागणी करणारे पत्र मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना लिहिले आहे. प्रशिक्षण घेण्याकरिता तसेच सरकारी यंत्रणांना मदतीकरिता होमगार्डमधील उपस्थित सदस्यांना शासनाच्या वतीने कर्तव्यभत्ता, उपहार भत्ता, कवायत भत्ता, प्रशिक्षण भत्ता व धुलाई भत्ता दिला जातो. होमगार्ड्सना देय असणारा उपहार भत्ता, कवायत भत्ता, प्रशिक्षण भत्ता व धुलाई भत्त्याचा निर्णय १४ फेब्रुवारी २०१४मध्ये करण्यात आला होता. त्यानंतर गेल्या दहा वर्षांमध्ये या भत्त्यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. तसेच कर्तव्यभत्त्यामध्येही गेल्या पाच वर्षांमध्ये कुठलीही वाढ झालेली नाही, ही बाब पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे लक्षात आणून दिली आहे.

या भत्त्यांमध्ये वाढ करण्यासंदर्भात होमगार्ड महासमादेशक यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे, याचाही त्यांनी पत्रात उल्लेख केला आहे. स्वेच्छेने काम करणारी व स्नेहकार्यावर अवलंबून असणारी संघटना म्हणून महाराष्ट्र होमगार्ड संघटनेची ओळख आहे. होमगार्ड संघटनेमध्ये सर्व जिल्हा तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था येथे सातत्याने वर्षभर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपातकालीन परिस्थितीमध्ये सर्व सरकारी यंत्रणांना मदतीकरिता होमगार्ड्स सदैव तत्पर असणारी यंत्रणा आहे. त्याचदृष्टीने १९४६ मध्ये या संघटनेची स्थापना करण्यात आली होती. अशा यंत्रणेतील तरुणांना भत्त्यामध्ये वाढ मिळाली, तर त्यांना प्रोत्साहन मिळेल, असेही सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरकुलासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार सरसावले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री मुनगंटीवार यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या घरकुलाचे बांधकाम रखडल्याची व्यथा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे व्यक्त केली आहे. यासंदर्भात शिथिलता आणण्यासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. ही अडचण सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करावा, असे आवाहन पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना पत्राद्वारे केले आहे. मुनगंटीवार यांनी आवास योजनेंतर्गत घरकुलाच्या लाभार्थ्यांना घराच्या बांधकामासाठी रेती उपलब्ध होत नसल्याचा मुद्दा पत्रात मांडला आहे. या लाभार्थ्यांना तातडीने रेती उपलब्ध करून देण्यासंदर्भात संबंधितांना निर्देश देण्याची विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे. शासनामार्फत रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतचे सर्वंकष धोरण महसूल व वन विभागाने १६ फेब्रुवारी २०२४च्या शासन निर्णयात निश्चित केले आहेत. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिलेल्या निर्देशांनुसार जिल्हाधिकारी खाणकाम आराखडा तयार करून पर्यावरणीय अनुमतीसाठी पर्यावरण समितीकडे आराखडा सादर करण्यात येतो. शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील घरकुलांसाठी जास्तीत जास्त ५ ब्रासपर्यंत विनामूल्य रेती उपलब्ध करून देता येते. तसेच जिल्ह्यातील केंद्र व राज्य शासनाच्या प्रकल्पाकरिता स्वामीत्वधन व जिल्हा खनिज निधी रक्कम भरून वाळू घाट राखीव ठेवता येतो. या सर्व बाबींच्या अधीन राहून चंद्रपूर जिल्ह्यातील ६५ रेतीघाटांचा खाणकाम आराखडा तयार करून पर्यावरण मंजुरीकरिता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे २० जानेवारी २०२४ ला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सध्या काही कारणांमुळे या घरकुलांच्या बांधकामाला रेती उपलब्ध करून देण्यात अडचण निर्माण झाली आहे, असे मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले.

# पाझर तलावाची दुरवस्था; गौण खनिजाचेही अवैध उत्खनन, पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** बरंजळा साबळे येथील पाझर तलावाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.झाडाझुडपांनी वेढलेल्या भिंतींना जंगलाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.ठिकठिकाणी भिंतीला तडे गेले आहेत.धरणाची पाळू फुटल्याने दरवर्षी लाखो लिटर पाणी वाहून जात आहे.त्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांना पाणी समस्यांना तोंड द्यावे लागते.सिंचनक्षेत्र कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम उत्पन्नावर होत आहे. धरणामधून अवैधरित्या गौण खनिज संपत्तीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असून वेळोवेळी पाठपुरावा करूनही पाटबंधारे विभाग याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाझर तलावाची दुरावस्था झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.धरण सुरक्षा यंत्रणा नुसती नावालाच आहे का, धरणाची नियमितपणे निगराणी का राखली जात नाही, कर्मचारी नियमित उपस्थित का रहात नाहीत.यासारख्या प्रश्नांची विचारणा केली जात आहे.शासनाकडून धरण दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो त्यातून पाझर तलावाची दुरुस्ती करावी अशी मागणी वारंवार करूनही पाटबंधारे विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.यावर्षी धरणाची दुरुस्ती न झाल्यास आंदोलनचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.





बरंजळा साबळे पाझर तलाव शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला आहे . बागायती क्षेत्र वाढल्याने उत्पन्नातही भर पडली आहे . परिसरातील शेतकऱ्यांनाही याचा फायदा होत आहे .याच धरणामुळे गावची तहान भागते आहे .परंतु दिवसेंदिवस धरणाची दुरावस्था वाढतच आहे .भिंतीस तडे गेलेआहेत पाळू फुटली आहे . लाखो लिटर पाणी वाहून जात आहे . निवेदने देऊनही दुर्लक्ष केले जाते .संबंधित विभागाने वेळीच लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन करण्यात येईल .

**संतोष साबळे, शेतकरी ,बरंजळा साबळे**

मान्सूनपूर्व दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी येत असतो . मागील काही वर्षापासून अद्यापही निधी प्राप्त झाला नाही . धरण सुरक्षा संघटनेकडे तशी मागणी केली आहे .या विभागात धरण संख्येच्या प्रमाणात मनुष्यबळ कमी आहे . अवैधरित्या गौण खनिज उत्खनन हा विषय महसूल विभागाशी संबंधित आहे . या अगोदरही मंडळाधिकारी, तहसीलदारांना कळविले आहे . पुन्हा स्मरण करून दिले जाईल .धरण सुरक्षा व देखभाल याकडे गांभीर्याने लक्ष दिले जाईल .


**एस .जी .राठोड, शाखाधिकारी,पाटबंधारे विभाग,भोकरदन**

# खा. लोखंडे यांच्यावर टिकास्त्र सोडणाऱ्यांनी लायकी ओळखावी

## शिवसेनेचे संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार, शहरप्रमुख बाबा कांगुणे यांचे विरोधकांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** शिर्डी लोकसभा मतदार संघाचे खा. सदाशिव लोखंडे यांच्यावर टिकास्त्र सोडणाऱ्यांनी आपली लायकी ओळखावी असे आवाहन शिंदे गटाचे शिवसेनेचे संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार व शहरप्रमुख बाबा कांगुणे यांचे विरोधकांना केले आहे.



शिर्डी लोकसभा मतदार संघाचे शिवसेना खासदार सदाशिव लोखंडे यांनी गेल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात पक्ष भेदभाव न करता समस्या महत्वाची समजून विकास कामासाठी मागेल त्याला निधी देत मतदार संघात मोठे विकासाभिमुख कार्य केल्यामुळे पुन्हा ते तिसऱ्यांदा लोकसभेत हॅट्रिक करणार असल्यामुळे बाह्य शक्तीच्या राजकिय गोटात मोठा पोटसुळ उभा राहिल्यामुळे ज्यांचा सेनेशी कुवडीचाही काही संबंध नाही अशा चुलबुल पांडे लोकांना पोटसुळ भरणाऱ्या कथाकथित लोक सेनेचा खोटा बुरखा पांघरुन पडद्या आडून खासदार लोखंडे यांच्यावर टिकास्त्र सोडण्याचा प्रताप आखला करत असून त्यांचा बोलवता धनी कोण आहे? हे समजण्या इतपत शिर्डी लोकसभा मतदार संघातील जनता दुधखुळी हमखासच नाही असा स्पष्ट इशारा शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार आणि नेवासा शहरप्रमुख बाबा कांगुणे,युवा सेनेचे नेते यांनी विरोधकांचा समाचार घेतांना नेवासा येथे माध्यमांशी बोलतांना दिला. यावेळी बोलतांना पवार व कांगुणे म्हणाले की, खासदार लोखंडे हे कामाचा माणूस असल्याची जनभावना जिल्ह्यात सर्वश्रूत असतांना काही लोक सेनेत असल्याचे ढोंग करुन आपली कुटनिती आखून पक्ष शिस्तीचा भंग करु पाहत आहेत त्यामुळे त्यांची समाजात किती काय कुवत आणि जनाधार आहे याचे आत्मपरिक्षण करुनच बोलावे असा सल्ला देत 'कंहॉ राजाभोज और कंहा गंगू तेली' अशी खरमरित टिका यावेळी त्यांनी विरोधकांचे नांव न घेता केली.खासदार लोखंडे यांची सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडली गेलेली असून कधीही त्यांनी पदाचा गर्व न करता सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मार्गी लावणारे खासदार म्हणून त्यांची मतदार संघात ओळख निर्माण झालेली असतांना त्यांना पुन्हा मोठा जनाधार मिळत असल्यामुळे चुलबुलपांडे लोक दुसऱ्यांचे ऐकूण पोटात पोटसुळ उठणारे लोक दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून खासदार लोखंडे यांच्यावर टिकास्त्र सोडत असून हा उद्योग त्यांनी आता बंद करावा असे आव्हान शिवसेनेचे संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार व नेवासा शहर शिवसेनेचे शहरप्रमुख बाबा कांगुणे व युवा सेनेचे नेते शुभम उगले यांनी यावेळी दैनिक प्रभात'शी बोलताना केले.शिर्डी लोकसभा मतदार संघाचे शिवसेना खासदार सदाशिव लोखंडे हे जनसामान्यांची खरी ताकद असून विकास कामाला प्राधान्य देणारा सर्वसामान्य जनतेचे ते प्रतिनिधी असून खासदार लोखंडे हे तिसऱ्यांदा निवडणूकीच्या मैदानात हॅट्रिक करणार असल्यामुळे बाह्यशक्तींच्या पोटात मोठा पोटसूळ उठत असल्यामुळे बिनबुडाचे आरोप सेनेचा बुराखा पांघरुन कथाकथित लोकांकडून केले जात आहेत त्यामुळे आरोप करणाऱ्यांनी आपली राजकिय कुवत किती? हे ओळखूनच टिका करावी कोणाचा बाहुला आणून बिनबुडाचे आरोप केल्यास याद राखा असा सज्जड इशाराही यावेळी बोलतांना शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.

# साहिल रामटेकेचा राष्ट्रीयस्तरावर झेंडा

आधुनिक केसरी न्यूज

**तुळशी :** युवक बिरादरी भारत या नामवंत संस्थेच्या वतीने युवकांच्या कौशल्याला वाव मिळावा आणि खऱ्या अर्थाने युवक हा समृद्ध व्हावा अशा अनेक युवकांच्या हिताचे हेतू डोळ्यापुढे ठेवत गेली पन्नास वर्षे ही युवक बिरादरी नावाची संस्था केवळ राज्यपातळीवर नाही तर देशपातळीवर नवनवीन उपक्रम राबवत असते. ज्यामध्ये महत्त्वाची मानले जाणारे युवा संसद आणि युवा भुषण या दोन स्पर्धा असतात ज्यामध्ये राज्यपातळीवरील, देशपातळीवरील विद्यार्थी यामध्ये सहभाग घेत असतात. मार्च 2023 मध्ये मुंबई येथे झालेल्या युवा संसद या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये साहिल साक्षकार रामटेके याची विरोधी पक्ष उपनेते पदी निवड झाली होती तिथेही त्याने यश संपादन करून राज्यस्तरीय युवा संसद स्पर्धेवर आपले नाव कोरले होते.



साहिल हा मूळचा मागासवर्गीय समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यातील तुळशी या गावचा रहिवासी आहे. साहिल ने यंदाही युवक बिरादरी भारत यांच्या वतीने डिसेंबर 2023 मध्ये भावी मंत्री म्हणून माझा जाहीरनामा ही स्पर्धा घेण्यात आली होती ज्यामध्ये साहिल रामटेके याने गडचिरोली जिल्ह्याचे नेतृत्व पार पाडत माझा शिक्षण मंत्री म्हणून जाहीरनामा प्रस्तुत करत तिथेही प्रथम क्रमांक पटकावला. आणि आणि नंतर साहिल ची थेट निवड ही राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या युवा भूषण या स्पर्धेसाठी झाली. आणि ही राष्ट्रीय स्तरावरील युवा भूषण स्पर्धा 12 मार्च 2024 ला मुकेश पटेल सभागृह मुंबई इथे आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये विविध राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होता. मात्र या स्पर्धेत साहिलच्या खांद्यावरती केवळ गडचिरोली,चंद्रपूर आणि विदर्भाचेच प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी नाही तर अख्या महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी मिळाली होती आणि ती अतिशय योग्य आणि तार्किक बुद्धीचा वापर करून साहिलने ही जबाबदारी पार पडली आणि या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरती साहिलने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आणि राष्ट्रीय युवा भूषण ठरत महाराष्ट्र राज्याला देश पातळीवर अग्रगण्य स्थान प्राप्त करून दिले.

या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ मा.डॉ.राम चड्डा, युवक बिरादरी भारत चे सर्वेसर्वा पद्मश्री मा.क्रांती शाह, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आई मा.नार्वेकर मॅडम, मा.स्वर शाह मॅडम आदी दिग्गज मान्यवर उपस्थित होते. या विजयाबद्दल साहिल चे महाविद्यालयाकडून, मित्रपरिवाराकडून, तुळशी गावाकडून अशा सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून आनंद साजरा होतो आहे. हा विजय केवळ माझ्या एकट्याचा नसून माझ्या मराठमोळ्या तमाम माणसांचा आणि महाराष्ट्राचा आहे अशी विजयानंतरची प्रतिक्रिया साहिल ने प्रसार माध्यमांना दिलेली आहे.

# आमदार सुभाष धोटेंचे वक्तव्य म्हणजे मुंगेरीलाल के सपने : देवराव भोंगळे

## मुनगंटीवार विकासाचं राजकारण करणारे लोकनेते

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदारसंघासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना उमेदवारी जाहीर झाल्याने जिल्ह्यात सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विकासकामांचा झंझावात आणि त्यांच्या अभ्यासपूर्ण, रोखठोक भुमिकेमुळे महाराष्ट्रभर त्यांना मानणारा वर्ग आहे. अशा लोकनेत्याला चंद्रपूर लोकसभेची उमेदवारी मिळाल्याने भाजपचा विजय सोपा झाला आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या उदासीनतेतून जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार सुभाष धोटे उलटसुलट वक्तव्य करीत 'मुंगेरीलाल के हसीन सपने' पाहात आहेत, असा पलटवार राजुरा विधानसभा निवडणूक प्रमुख तथा भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केला. भोंगळे यांनी आमदार सुभाष धोटेंना यातून प्रत्युत्तर दिले आहे.



आमदार धोटेंनी चंद्रपुरातील महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत बोलताना या लोकसभा निवडणुकीत ना. सुधीर मुनगंटीवार यांचे डिपॉझिट जप्त होईल, असे वक्तव्य केले. त्यावर देवराव भोंगळेंनी धोटेंचा खरपूस समाचार घेतला. २०१४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याला मागास जिल्हा म्हणून ओळख होती. परंतु राजकारणाला समाजकारणाचा राजमार्ग मानणाऱ्या ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी अर्थ व वनमंत्री पदाची सुत्रे हातात घेतली आणि जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी चंग बांधला. आता चंद्रपूर जिल्ह्याचा चौफेर विकास झाला आहे. जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलविण्यासाठी गेल्या दहा वर्षात "न भुतो न भविष्यती" असा विकासनिधी खेचून आणला. सुधीरभाऊंच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॉटनिकल गार्डन, सैनिकी शाळा, बांबू संशोधन केंद्र, वन अकादमी, वैद्यकीय महाविद्यालय, कॅन्सर हॉस्पिटल, गावोगावी डिजिटल अंगणवाडी शाळा, सुसज्ज वाचनालये, महिलांच्या रोजगार निर्मितीसाठी अगरबत्ती केंद्रे, युवकांसाठी रोजगार मेळावे, अद्ययावत क्रीडा संकुल, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने यशस्वी पाठपुरावा करण्याचे काम ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी केले आहे. "सत्ता असो अथवा नसो" सुधीरभाऊ मुनगंटीवार विकासासाठी मागे हटत नाहीत. महाविकास आघाडी सरकारच्या काळातही त्यांनी कोरोना सारख्या महासाथीत जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था सुधारण्यासह गोरगरीब जनतेच्या मदतीसाठी पुढाकार घेतला, हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे, असे भोंगळे म्हणाले.

शिंदे सरकारच्या काळात सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून छत्रपती शिवरायांच्या ३५० व्या राज्यभिषेकाचे वर्ष जगभर साजरे व्हावे या उदात्त हेतूने छत्रपतींच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देणारी वाघनखं त्यांनी लंडनहून परत आणण्यासाठी यशस्वी करार केला. जिल्ह्याचे वैभव असणारे काष्ठ अयोध्येतील प्रभू श्रीरामलल्लांच्या मंदिराकरीता तसेच नव्या संसद भवनाकरीता पाठविले, ते सुधीरभाऊंनीच. चंद्रपूरची ओळख असलेल्या ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे वैभव जगाला माहित व्हावे या उद्देशाने अलीकडेच ताडोबा महोत्सवाचे यशस्वी आयोजन ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी केले, असे भोंगळे यांनी नमूद केले. पिढ्यानपिढ्या घरात आमदारकी असुनही आपल्या राजुरा विधानसभा क्षेत्रात विकासाचे दिवे लाऊ न शकणाऱ्या सुभाष धोटेंना हे सर्व दिसेनासे झाले आहे, याचे नवल वाटते. त्यामुळे त्यांनी नुसतेच 'मुंगेरीलाल के हसीन सपने' पाहाणे बंद करावे. खरंतर त्यांच्या काँग्रेसची देशात झालेली अवस्था बघून ते स्वतःच वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यातूनच ते असे वक्तव्य करीत आहेत, असा सणसणीत टोला देवराव भोंगळे यांनी लगावला आहे.

# तिल्लोळी येथील जगदीशबनला तलाठी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** तिल्लोळी येथील एसएनएफ वाचनालयातील जगदिश खिलार याची तलाठी पदावर निवड झाली ही संपूर्ण एसएनएफ परिवारासाठी अत्यांनंदाची बातमी आहे. एसएनएफ वाचनालय संकल्पना सुरू झाल्यापासून गेल्या तिन चार वर्षात आमच्या 20 वाचनालयांमधील 40 पेक्षाही अधिक मुलांची विवीध शासकिय पदांवर निवड होणं ही आदिवासी भागात शैक्षणिक सुविधांची किती गरज आहे. त्यामुळे आम्ही आता ही वाचनालय / अभ्यासिका चळवळ अधिकाधिक गावांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करत राहू. जगदिशच्या या यशात त्याचा नियमीत अभ्यास, कष्ट, कुटूंबाचे सहकार्य यासोबतच एसएनएफ वाचनालयाचाही खारीचा वाटा आहे ही समाधानाची भावना हेच आमच्या परिश्रमाचे फळ आहे. नव्या करिअरसोबत कुटूंबासह स्वतःच्या गाव परिसरासाच्या विकासाकडेही लक्ष देशील अशी अपेक्षा प्रमोद गायकवाड यांनी व्यक्त केली व ऊज्वल भविष्या साठी शुभेच्छा दिल्या.



# प्रा. नरेंद्रभाऊ खेडकर यांचा लोकसभा प्रतिस्पर्धी उमेदवारांनी घेतला धसका!

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** बुलढाणा जिल्ह्यात पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दौरा करुन जनतेशी संवाद साधला. मुख्यमंत्री असतांना कोरोना काळात कुटुंब प्रमुखा प्रमाण महाराष्ट्रातील जनते करिता केलेले कार्य, तर शेतकरी कर्जमाफी संबंधित घेतलेला शेतकरी हिताचा निर्णय त्यामुळे शेतकरी कामगार, शेतमजुर यांच्या ह्रदयात उद्धव ठाकरे साहेब बसले! तर दुसरीकडे ज्या लोकांना "मातोश्री " नी मोठ केले त्या लोकांनीच शिवसेने सोबत गद्दारी केली त्याचा परिणाम म्हणून "ठाकरे परिवार शिवसेने "संबंधी प्रचंड सहानुभुती ची लाट उसळली त्याची प्रचीती जळगाव जामोद येथील २२ फेब्रुवारी च्या जाहीर सभेत आली जळगाव जामोद सारख्या छोट्या शहरात उत्स्फूर्तपणे हजारो लोक उद्धव ठाकरे साहेब यांना फक्त ऐकायलाच नाही प्रचंड उत्साह लोकांन मध्ये होता तर सत्ताधार्यांनविषयी लोकांन मधे प्रचंड चिड अनुभवयास मिळाली त्यामुळे फायर ब्रँड खासदार संजय राऊत यांची सभेतील लोकांनीची वाहवा केली. संकट काळात संपर्क प्रमुख म्हणून प्रा. नरेंद्र खेडेकरांनी जिल्ह्यातील शिव सैनिकांना हिम्मत देत गद्दारांना न घाबरता दमदार निडर नेत्रुत्व करित पळझळ थांबवली, त्यामुळे कट्टर शिवसेना पदाधिकारी यांचे भरोशा वर अन उद्धव ठाकरे साहेब- संजय राऊत यांच्या आकर्षणामुळे जळगाव जामोद येथील सभा प्रचंड झाली त्याचा धसका लोकसभा निवडणुकीत नरेंद्रभाऊ खेडकर यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार यांचे पैसावर जुटलेले मतलबी चमचे कार्यकर्ते वजा कर्मचारी यांनी धसका घेऊन नरेंद्रभाऊ खेडकर व त्यांच्या समर्थाकांच्या उलट सुलट बातम्या लाऊन लोकसभा निवडणुकीमध्ये अधिक "मलई" खान्याची संधी हातातुन जाऊ नये करिता मालका ला खुष ठेवत निवडनुक रिंगणात कायम राहावेत या करीता धडपडत आहे!



# बाजारात युवकांत हाणामारी, पोलिसांच्या प्रसादानंतर काढला पळ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील आठवडी बाजारात शुक्रवारी दि.१५ दुपारी सव्वापाच वाजता मुख्य रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी तरुण युवक टोळक्यात हाणामारी झाल्यानें बाजार करु सैरभैर झाले. मात्र पोलिस घटनास्थळी पोहोचून टोळक्याला चांगला प्रसाद दिल्याने युवक पांगले व घटनास्थळावरुन पळ काढला. याबाबत मिळालेल्या माहिती असी की आठवडी बाजारात पाडळी व सावंगी येथील काही तरुण युवकात अंगावर शेवचिवड्याची पेपरपन्नी आल्यावरुन वाद झाल्याची माहिती आहे. या वरून दुपारी पुलावरही कुरबुर वाद झाल्याची चर्चा आहे व वाद वाढतच गेला. यात दहा पंधरा तरुण युवक एकत्रीत येवून वाद घालत एकदम मारहाणीवर आले म्हणता म्हणता आठवडी बाजारात तुडुंब गर्दी व अशातच मुख्य रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी मारहाण सुरु झाली. यात रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली व प्रचंड गर्दी झाली. कोणकोणाला मारतो हेच कळेना अनेकांनी यात सहभाग घेत एकमेका पासून वादातून दुर केले. परंतु कुणीच कुणाचे ऐकाना ऐवढ्यात कुणीतरी पोलिस चौकीला मोबाईल केल्यावर मुख्य जमादार विनोद बिघोत यांनी तातडीने दोन पोलिसांना घटनास्थळी पाठवले तेव्हां पोलिसांनी ताबडतोब मारहाण धुडगुस गोंधळ घालणाऱ्या तरुणयुवकांना प्रसाद दिला तेव्हां तेथुन तरुणांनी जागा मिळेल तिकडे पळ काढला. सैरभैर झालेल्या नागरिकांनी कारवाईची मागणी केली आहे. तदनंतर वाहतुक सुरु झाली.व नागरिकांनी निःश्वास सोडला. यावेळी पोलीस बनसोड सपकाळ संतोष पुंड यांनी वाहतूक सुरळीत करुन नागरिकांना शांत केले.



# सोलनापूर येथील मातोश्री पाणंद रस्ते बोगस कामाची मजुरांनीच केली चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुक्यातील सोलनापूर येथील मातोश्री पाणंद रस्ते काम न करता मस्टरवर बनावट मजुर दाखवुन काम चालु असल्याचे दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात कुठलेही काम चालु नाही . तरी सुध्दा मजुरांचे नावाने पैसे काढण्यात येत असल्याने सोलनापुर येथील सदाशिव गोर्डे ते कॅनॉल पर्यंत 20 लाखाच्या मातोश्री पानंद रस्ता चे काम न करताच गावातील मंजूर दाखवुन मजूर संतोष श्रीरंग खराद यांच्या नावे खात्यावर चार मस्टरचे बिल काढण्यात आल्याने त्यांनीच विभागीय आयुक्तांना तक्रार केली असून ग्रामसेवक रोजगार सेवक, पंचायत समितीतील या कामासंबधीत आधिकारी यांच्या संगणमताने शासनाच्या पैश्याचा गैरव्यवहार चालु आहे असल्याचे संतोष श्रीरंग खराद यांनी लेखी तक्रारीत म्हटले आहे. याशिवायही गावातील रोहयोचे ईतर कामे थातुर मातुर करुन त्याचे बिल काढले असून अंदाजपत्रकानुसार रस्ता झाला नाही. या संपूर्ण कामाची चौकशी करुन संबंधिता विरुध्द कार्यवाही करावी नसता आपल्या कार्यालया समोर 10 दिवसानंतर लाक्षणिक उपोषण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

## छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** वडिलांच्या संपत्तीमध्ये हिस्सा मागण्यासाठी पत्नीचा वारंवार छळ केल्याने विवाहितेचे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना वडमुखवाडीत नुकताच घडला आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की, पती प्रसाद बाळासाहेब वीर वय 19 रा, वडमुखवाडी व दोन महिला आरोपी, सासरे प्रा.बाळासाहेब वीर रा. आष्टी बीड, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने या प्रकरणी दिघी पोलिस ठाण्यात गुरूवारी दि 7, फिर्याद दिली पीडीतेचा 24, फेब्रुवारी 2022,साली प्रसाद वीर यांच्याशी विवाह झाला मात्र मागील पाच ते सहा महिन्यांपासून संशयित आरोपी हे पिडीतेला तू मुलगी आहेस तुझा वडिलांच्या संपत्तीवर हक्क आहे तू जमिनील वाटा माग म्हणत वेळोवेळी भांडणे करत त्यानंतर किरकोळ कारणावरून पीडीतेचा मानसिक छळ केला गेला याबाबत पोलिसांत तक्रार करु नये यासाठी धमकी दिली पति व सासरच्याना कंटाळून पीडीतेने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली.

# खा. राहुल गांधी यांना अंनिसतर्फे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** जादूटोणाविरोधी कायदा व तसेच सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा असे दोन्ही कायदे केंद्र सरकारने तातडीने मंजूर करून, लागू करावेत, यासाठी खासदार राहुल गांधी यांनी, त्यांच्या मित्र पक्ष्यांसह पुढाकार घेऊन संसदेत दोन्ही कायद्यांचा कायदेशीर मसुदा संसदेत सादर करावा आणि दोन्ही कायदे संसदेत मंजूर होतील यासाठी प्रयत्न करावेत, म्हणून महाराष्ट्र अंनिसच्या वतीने आज नाशिक येथे त्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले.

भारत जोडो न्याय यात्रेच्या निमित्ताने नाशिकला आलेले खासदार राहुल गांधी यांना दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्र अंनिस ही लोकचळवळ मागील ३५ वर्षांपासून महाराष्ट्रात कार्यरत आहे. समाजातील अंधश्रद्धांचे निर्मूलन करणे आणि समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची रुजवणूक करणे ,असे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख काम संघटितपणे करीत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक अनिष्ट, अघोरी,अमानुष चालीरीती, रुढीं, परंपरांना मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे. अनेक अनिष्ट, अघोरी, रूढीं, परंपरा कायमच्या बंद झालेल्या आहेत. तर काहीं बद्दल समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृती निर्माण झालेली आहे. भारतात कर्नाटक, केरळ,आसाम राज्यांनीही जादूटोणा विरोधी कायदा करण्यासाठी महाराष्ट्र अंनिसचे सहकार्य मागितले होते . त्यामुळे अनेक राज्यांनी असा कायदा करण्यासाठी इच्छा व्यक्त केलेली आहे.युगांडा सारख्या मागास देशानेही, तेथे नरबळी विरोधी कायदा करण्यासाठी महाराष्ट्र अंनिसची मदत घेतलेली आहे.
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अठरा वर्षांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाने दहा वर्षांपूर्वी जादूटोणा विरोधी कायदा मंजूर केला. आतापर्यंत या कायद्यांतर्गत दीड हजारांहून अधिक भोंदूबुवांविरुद्ध गुन्हे दाखल झालेले असून काही प्रकरणाच्या निकालात कोर्टाने अनेक भोंदू बुवांना सश्रम कारावासाची आणि आर्थिक दंडाची शिक्षा सुनावलेली आहे. म्हणून राहुल गांधी यांनी, त्यांच्या इतर मित्र पक्षांच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलनाचा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्यांचा मसुदा तयार करून तो संसदेत सादर करावा. सरकार भलेही कोणत्याही राजकीय पक्षाचे असो हे दोन्ही कायदे केंद्र सरकारकडून मंजूर करून घेण्यासाठी कळकळीचा आग्रह धरावा. त्यामुळे भारतातील सर्वच राज्यांतील सर्व समाजाला त्याचा मोठा फायदा होईल. असा अंनिसला विश्वास असून ,त्यासाठी महाराष्ट्र अंनिस मदत करायला तयार आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.

या निवेदनावर राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे, जिल्हा महिला सहभाग विभागाच्या प्रमुख कोमल वर्दे, जिल्हा युवा कार्यवाह प्रथमेश वर्दे ,तुळशीदास शिंदे, यशदा चांदगुडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ॲड. वाखुरे यांची नोटरी पब्लिकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** नेवासा न्यायालयात वकिली करणारे प्रथितयश वकील जेष्ठ विधी तज्ञ ॲड. के. एच. वाखुरे यांची भारत सरकारच्या पब्लिक नोटरी पदी निवड झाली आहे. भारत सरकारच्या न्याय व विधी विभागाने नोटरी पब्लिक म्हणून निवड झालेल्या वकिलांची यादी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. मागील वर्षी ऑन लाईन पद्धतीने मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्याचा निर्णय ऑनलाइन यादी प्रसिद्ध करून झाली आहे. नेवासा शहरातून निवड झालेल्या मध्ये ॲड. वसंत नवले, ॲड.संजीव शिंदे, ॲड. बापूसाहेब गायके, ॲड. संदीप लोखंडे, ॲड. अनिता मोटे यांची नावे समाविष्ट आहेत. निवड झालेल्या वकिलांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## ज्येष्ठांना मोफत प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** शासन निर्णयानुसार कल्याण – डोंबिवली पालिका परिवहन उपक्रमाच्या बसमधून पालिका हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांना (६० वर्षांहून अधिक वय) केडीएमटीच्या बसमधून शनिवारपासून (ता.१६) मोफत प्रवास आणि महिलांना ५० टक्के प्रवास सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय कल्याण-डोंबिवली पालिका प्रशासनाने शक्रवारी घेतला.

## पोलीस ठाण्यातच चालकावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृह शहर असलेल्या नागपुरातील कपिलनगर पोलीस ठाण्यात चक्क सहायक पोलीस आयुक्तांच्या वाहनचालकावरच कुऱ्हाडीने वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेने पोलीस अधिकारी- कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली होती. पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला ताब्यात घेतल्याने अनर्थ टळला. प्रफुल्ल जगदेवराव धर्माळे (४२) रा. नेमसेडा, चांदुरबाजार, अमरावती असे जखमी कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते अगोदर मोटार परिवहन विभागात कार्यरत होते. सद्यस्थितीत ते सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या वाहनावर चालक म्हणून नेमणूकीस आहे. शुक्रवारी त्यांनी सकाळी एसीपींना कपिलनगर पोलीस टाण्यात सोडले. त्यानंतर ते पोलीस ठाण्याच्या परिसरात गाडी साफ करत होते. त्यावेळी दिलीप रामराव चिनकुरे (५३) रा. एन.आय. टी क्वॉर्टर, कपिलनगर हा तेथे पोहोचला. त्याने थेट धर्माळे यांच्यावर लोखंडी कुऱ्हाडीने डोक्यावर वार केले. त्यात धर्माळे जखमी झाले. त्याने तिसरादेखील वार केला. मात्र धर्माळे यांनी तो चुकवला व आरोपीला जोरात धक्का दिला. जखमी धर्माळे यांची आरडाओरड ऐकून पोलीस ठाण्याचे इतर कर्मचारी धावत आले व त्यांनी आरोपीला पकडले.



# आज जालनेकरांसाठी 'बिग बॉस' नाटकाचा खास प्रयोग

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** अनेक स्पर्धा गाजवलेल्या 'बिग बॉस' या दोन अंकी धमाल नाटकाचा खास जालनेकरांसाठी मोफत प्रयोग रविवार दि. 17 मार्च रोजी जेईएस महाविद्यालयात सायंकाळी 6.30 वाजता होणार आहे. उत्कर्ष थिएटर, नाट्यांकुर व जेईएस महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा प्रयोग होणार असून सतीश लिंगडे लिखित व सुमीत शर्मा दिग्दर्शित हे नाटक आजच्या प्रत्येक कुटुंबाला हसवतानाच अंतर्मुखही करते. या नाटकाने राज्य नाट्य स्पर्धा व कामगार कल्याण स्पर्धेत अनेक बक्षिसे पटकावून जालना शहराचा नावलौकिक वाढवला आहे. या प्रयोगास उद्योजक सुनीलभाई रायठठ्ठा, आस्था फाऊंडेशनचे डॉ. आदिनाथ पाटील, आरपी ग्रुप ऑफ स्कूलचे भरत भांदरगे, कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रकाश आंबेकर, समाजसेविका श्रीमती अनयाजी अग्रवाल, डॉ. अनुराधा राख यांची प्रमुख उपस्थिती असेल. यात सतीश लिंगडे, रेखा चव्हाण, विनोद जैतमहाल, तेजस्विनी वाघमारे, चंचल पंचवटकर, पूनम साळवे आणि सुमीत शर्मा यांच्यासह पवनकुमार खांदे, गणेश लोखंडे, राहुल काळे, सुनील गव्हाणे, प्रेरणा सराफ, सुंदर कुँवरपुरिया, ओंकार बिनीवाले, सोहन भुरेवाल यांच्या भूमिका आहेत. या वेळी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.





# भगतसिंग शाळेत स्वयंशासन दिन, माता पालक मेळावा कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** माता पालकांनी आपल्या पाल्यावर आवूर्जून प्रेम करा परंतु फाजील लाड करू नका, योग्य तेच संस्कार वेळेवर घाला त्यांच्या कलेगुनानुसर वाव द्या, असे प्रतिपादन प्रतिभा गांगुर्डे यांनी स्वयंशासन दिनी केले.

शहीद भगतसिंग प्राथमिक शाळेत गुरूवार (ता.१४) रोजी स्वयंशासन दिन, महिला दीन व माता पालक मेळावा या तिन्ही कार्यक्रमाचे एकत्रित आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रण सम्राट क्रीडा मंडळ संस्थेचे अध्यक्षा मनोरमा शेळके ह्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रतिभा गांगुर्डे, याच शाळेची माजी विद्यार्थिनी डॉ वैष्णवी गिरी तसेच माता पालक संघाच्या अध्यक्षा रविना गायकवाड ह्या होत्या. मनोरमा शेळके म्हणाल्या की, महिला दिनाची सुरुवात कोणी व कधी सुरू झाला याचा इतिहास सांगून समाजातील महिलांना तसेच स्त्री म्हणून समाजात प्रतिष्ठा वाढणे गरजेचे आहे. स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक पद शाळेची विद्यार्थिनी अनुष्का करंजकर हिने भूषाविले. दिवसभर शाळेतील शिक्षकांचे अनुकरण करून अध्यापन कार्य सुरळीत पार पाडले. तदनंतर आयोजित माता पालक व महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेच्या वतीने शिक्षिका वर्षा बन यांचा पालक व विद्यार्थी यांच्याशी केलेला सुसंवाद याचा विचार करता सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यपक हरिश्चंद्र शेळके यांनी उपस्थित सर्वांचा पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सूत्र संचालन सतीच बच्छाव तर आभार संगीता करपे यांनी केले. शिक्षिका अनिता याटे, संगीता धुमाळ, मायादेवी सांजेकर यांच्यासह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, माता पालक उपस्थित होते.



# डॉ. गंगाधर पाथ्रीकर कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कृषी विभागाला दिली प्रसिद्धीची साथ

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाथरी येथील गुरुवार रोजी कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून कृषी विभागाच्या विविध योजना, उपक्रम, मोहिमांची भारत कासार (तालुका कृषी अधिकारी), निवृत्ती जोरी (मंडळ कृषी अधिकारी), बाळू गायकवाड (कृषी पर्यवेक्षक) यांच्या अध्यक्षतेखाली प्रितेश अजमेरा (कृषी सहाय्यक बाबरा), कैलास चौधरी (कृषी सहाय्यक आळंद), अंकुश कांबळे (कृषी सहाय्यक टाकळी कोलते) यांच्या सहयोगाने डॉ. गंगाधर पाथ्रीकर कृषी महाविद्यालयातील पहिल्या वर्षाचे विद्यार्थी बबलू अर्जुन पवार, आशिष विनोद दौगे, स्नेहा बालाजीराव पवार यांनी गावा गावातील शेतकऱ्यांशी संपर्क साधून महाडीबीटी पोर्टल वरील ठिबक व तुषार सिंचन योजना, यांत्रिकीकरण योजना , वैयक्तिक शेततळे, शेडनेट, कांदाचाळ, अस्तरीकरण, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना अशा प्रकारच्या इतर विविध योजनांची महाडीबीटी पोर्टल वर ज्या लाभार्थ्यांची निवड झाली त्यांच्या कागदपत्राच्या पूर्ततेपासून ते अनुदानापर्यंत ची सर्व प्रक्रिया समजून सांगितली. तसेच सेंद्रिय शेती बाबत मार्गदर्शन केले गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजने संदर्भात कागदपत्रांची शर्ती व अटींची माहिती सांगितली.

या प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमात कृषी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक-निलेश गोरे, भगवान गाडेकर विद्यार्थी - बबलू अर्जुन पवार, आशिष विनोद दौगे, स्नेहा बालाजीराव पवार कृषी विभागाकडून - बाळू गायकवाड (कृषी पर्यवेक्षक), प्रितेश अजमेरा (कृषी सहाय्यक बाबरा), कैलास चौधरी (कृषी सहाय्यक आळंद), अंकुश कांबळे (कृषी सहाय्यक टाकळी कोलते) आणि गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# अभिनेता विजय मानवतकर यांच्या संस्थेला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जय साई नटराज नाटय चित्रपट कला व सांस्कृतीक संस्था अध्यक्ष सिने अभिनेता विजय मानवतकर संस्थेला महाराष्ट शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे पुसस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत महाराष्ट राज्याचे सचिव सुमंतजी भांगे आयुक्त ओम प्रकाश बकोरिया बार्टीचे महासंचालक सुनिलजी वरे जय विजय मानवतकर तसेच अनेक सन्मानिय मान्यवर यांच्या शुभ हस्ते संस्थे ने राष्ट्र हिताचे कार्य केले याची दखल घेऊन हा महाराष्ट शासना चा पुरस्कार सन्मानाने संस्थेला प्रदान केला या बद्दल संस्था अध्यक्ष तथा सिने अभिनेता विजय मानवतकर यांनी संस्थेचा पुरस्कार स्विकार करत असतानी महाराष्ट्र शासन समाजिक न्याय व विषेश सहाय्य विभागाचे आभार वक्त केले व आपल्या वर खुप मोठी राष्ट्रहिताच्या कार्याची जबाबदारी या पुरस्कारने आली तरी या पुढे हि जनहिताचे कार्य संस्थेच्या व जनतेच्या शासन च्या मदतीने स्वश्रमातून सर्घषांतून करत राहु असे मनोगत संस्था अध्यक्ष सिने अभिनेता विजयजी मानवतकर यांनी व्यक्त केले हा पुरस्कार कार्यक्रम भव्य व दिव्य अशा व्यवस्थेने व्यवस्थितरीत्या मोठ्या संख्यने नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस ( N C PA ) /माया नगरी मुंबई येथे पार पडला.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# निरेतून ईव्हीएमच्या विरोधात व्यक्त झाल्या भावना

## सचिन मोरे, अमोल साबळे, महेश जेधे यांनी मांडली मते

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देशभरात ईव्हीएमच्या विरोधात बोलले जात आहे. विविध स्वरुपाची आंदोलने केली जात आहेत. ईव्हीएम हटावचा नारा दिला जात.बॅलेट पेपर वर निवडणुका घेण्यात यावी.म्हणून या मागणीचा जोर सुद्धा वाढू लागलेला आहे.गल्ली ते दिल्ली पर्यंत ईव्हीएमच्या विरोधात आवाज उठविला जात आहे. अनेक जण सोशल मीडियासमोर येत आपल्या भावना व्यक्त करत आहेत. पुणे जिल्ह्यातील निरा शिवतक्रार (ता.पुरंदर) येथे सुद्धा ईव्हीएमच्या विरोधात मते व्यक्त केली जात आहे. सर्वसामान्य जनता निर्भीडपणे संवाद साधत आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे आणि आम आदमी पार्टीचे पुरंदर तालुका युवक अध्यक्ष महेश जेधे आदींनी ईव्हीएमच्या विरोधात भूमिका घेतली आहे.शिवाय बॅलेट पेपर सर्वच निवडणुका घेण्यात याव्यात.अशी मागणी केलेली आहे. सरकार या कडे गांभीर्याने लक्ष देत नाही. खऱ्या अर्थाने ही लोकशाहीची खरी व्याख्या आहे का? की हुकूमशाहीची व्याख्या आहे? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांनी उपस्थित केलेला आहे. संविधान बदलून तुम्हाला मनुवादी,हुकूमशाहीचे सरकार आणायचे आहे का? असा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी बीजेपी वर केलेला आहे. लोकशाही आणि संविधान टिकवायचे असेल तर "करो या मरो"अशी परिस्थिती असल्याचे आम आदमी पार्टीचे पुरंदर तालुका युवक अध्यक्ष महेश जेधे यांनी म्हटले आहे.सचिन मोरे,अमोल साबळे, महेश जेधे यांनी ईव्हीएम मशीन वरून विविध मुद्यांना हात घालत निर्भीडपणे मांडणी करणारी मते व्यक्त केली आहेत.



सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे म्हणाले की,प्रत्येक राज्यात इलेक्ट्रॉनिक वोट मशिनच्या विरोधात आंदोलने सुरू आहेत .परंतू सरकार या कडे गांभीर्याने लक्ष देत नाही .खऱ्या अर्थाने ही लोकशाहीची खरी व्याख्या आहे का ? की हुकूमशाहीची व्याख्या आहे ? लोकांचं जर म्हणणं असेल आम्हाला बॅलेट पेपरवर मतदान करायचा आहे . तर लोकांचं म्हणणं ऐकलं पाहिजे .जेवढे जेवढे प्रगत देश आहेत .त्यांनी सुद्धा मतदान बॅलेट पेपरवर घेतले .परंतु त्यांच्या देशातून आपल्याला चिप्स आणि मशीन येतात ही फार मोठी शोकांतिका आहे .या विज्ञानवादी युगामध्ये खऱ्या अर्थाने हॅकरर्स असू शकतात .या मशीन हॅक होऊ शकतात .तमिळनाडूमध्ये इलेक्शन झालं,जी मशीनची कॅपॅसिटी एम पी टू होती .तिथे उमेदवार उभे राहण्यासाठी जास्तीत जास्त सभासद उभे केले .त्यांनी त्यावेळेस इलेक्शन बोर्ड कमिशन ला बॅलेट पेपर वर मतदान घेण्यास भाग पाडले आणि त्यावेळेस केसीआरचं सरकार आलं .म्हणून आम्हाला असं वाटतं की बॅलेट पेपरवर हे मतदान होणे गरजेचे आहे .जेणेकरून खरंच सत्ताधारी आणि विरोधक असेल दोघांनी खरंच काम केलं असेल तर जनता त्यांना निवडून देतील .आज भांडवलदार आणि राज्यकर्ते मिळून ९०% लोकांची पिळवणूक करताना आपल्याला दिसत आहेत .पंजाबातील शेतकऱ्यांचे आंदोलन पाहता, दिल्लीत वकिलांनी ईव्हीएम च्या विरोधात केलेले आंदोलन, रिपब्लिकन पार्टीने केलेले आंदोलन, तसेच मराठा आरक्षण विषयी आंदोलन सुरू आहेत, जाट समाजाचे आंदोलन चालू आहे, शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे .जर जनशक्तीचे एवढे मोठे उठाव होत आहेत आणि तुम्ही भांडवलदाराच्या बाजूने सरकार न्याय देणार असेल तर लोकशाही पुढे अर्थ उरतो आहे की नाही ? हा ही विचार आपण केला पाहिजे .असे सुद्धा सचिन मोरे यांनी सांगितले .मतदारांना माझं एकच सांगणं आहे की मतदान हे तुम्हाला संविधानाने दिलेला अधिकार आहे .संविधान नसतं तर हे शब्द आम्ही इथे बोलू शकलो नसतो .हिटलरने जी हुकूमशाही केली त्याची पुनरावृत्ती होत आहे की काय ? हे इथे आपल्याला भारतात दिसायला लागले आहे . येणाऱ्या काळात बॅलेट पेपरवर मतदान व्हावं .तुम्ही विकास केला असेल तर तुम्हाला जनता निवडून देईल .संविधानिक मार्गाने आपल्याला ईव्हीएम मशीन बंद पडता येऊ शकतात .असे सुद्धा सचिन मोरे यांनी मोठ्या पोटतिडकीने सांगितले .



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे म्हणाले की,आज महाराष्ट्रात नाहीतर ३१ राज्यांमध्ये रिपब्लिकन पार्टी काम करत आहे .राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे व महासचिव डॉ .मोहनलाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली ईव्हीएमच्या विरोधात "ईव्हीएम फोडो"हे आंदोलन सुरू आहे .अब की बार चारशे पार हे आधीच बीजेपी सांगत आहे .हे कशाच्या आधारावर सांगत आहेत .तुम्ही बिहारचं, महाराष्ट्राचं सरकार पाडताय .बीजेपी सरकारची जी ध्येय धोरण चाललेली आहेत .हे सर्व चुकीचे आहे . संविधान बदलून तुम्हाला मनुवादी, हुकूमशाहीचे सरकार आणायचं आहे का ? हा प्रश्न बीजेपी सरकारला आहे .आमचं एकच मत आहे की, तुम्ही जे ईव्हीएम मशीन वर मतदान घेताय तर आम्ही भारतीय नागरिक हे आम्हाला नकोय, आमचं बॅलेट पेपरवर मतदान घ्याव .अशी विनंती करतो आहे . रिपब्लिकन पार्टीकडून इव्हीएम मशीनचे बॉक्स बनवून त्यास लाथा बुक्क्या मारून फोडल्या जात आहेत . ईव्हीएम मशीन हटविले नाहीतर मतदानाच्या आदल्या दोन दिवस किंवा मतदान झाल्यावर पेट्या पळवण्यात येईल .असे आरपीआयच्या वतीने सांगितलं आहे . असे सुद्धा अमोल साबळे म्हणाले .अजून वेळ गेलेली नाही .जर तुम्ही रेल्वे स्टेशनचे, एखाद्या जिल्ह्याचे नाव बदलत आहात तर तुमचं अभिनंदन करतो .परंतु हे ईव्हीएम आम्हाला नको .याबाबत पी एम, तुमचे अध्यक्ष आणि सर्वपक्षीय बैठक घ्या .जर हे चारशेच्या पार होत असेल तर तुमचं अगोदरच सेटिंग झालेलं आहे .अस आमचं मत आहे .त्यामुळे ईव्हीएम मशिन वर मतदान न घेता बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावी .अशी मागणी सुद्धा अमोल साबळे यांनी केली आहे .



आम आदमी पार्टी पुरंदर तालुका युवा अध्यक्ष महेश जेधे म्हणाले की, २१ व्या शतकामध्ये अनेक ठिकाणी संगणीकृत झालेलं आहे .इंटरनेट सुविधा पोहोचलेल्या आहेत .सॉफ्टवेअर आलेले आहेत . ईव्हीएम मशीन जपान, फ्रान्स या देशात वापरली जात नाहीत .लोकशाही आणि संविधान टिकवायचे असेल तर "करो या मरो" अशी परिस्थिती या भारत देशामध्ये लोकसभा निवडणूक साठी येऊन ठेपलेल्या आहे .भारतीय जनता पार्टी ला त्यांच्या कामाच्या बाबतीत विकास केला असेल तर त्यांच्यावर विश्वास असेल तर त्यांनी बॅलेट पेपरवर निवडणुका घेतल्याच पाहिजेत . जपान, फ्रान्स, अमेरिका यांसारख्या विकसित देशांमध्ये ईव्हीएम मशीन वापरात नसून बॅलेट पेपरवर निवडणुका घेतल्या जातात .तसेच भारतीय जनता पार्टीने निवडणूक आयोगाला आदेश देऊन लोकसभेच्या, विधानसभेच्या अगदी ग्रामपंचायती पर्यंतच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेतल्या पाहिजेत .त्यातून खरं चित्र बाहेर पडेल .कारण ईव्हीएम मशीन हॅक करण्याच्या खूप दाट शक्यता आहे .बँकेतील आपले पैसे ट्रान्सफर होतात . चोरीला जातात .सॉफ्टवेअर हॅक होऊन करोडो रुपयांचे घोटाळे होतात .तर ईव्हीएम मशीन का हॅक होऊ शकत नाहीत ? म्हणून भारतीय जनता पार्टी, केंद्र सरकार आणि राज्य सरकारला विनंती आहे की, ईव्हीएम मशीनवर निवडणुक न होता ती बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यात यावी .अशी मागणी सुद्धा महेश जेधे यांनी केलेली आहे .



# आ. फारूक शाह यांच्या हस्ते प्लेग्राउंड व मिनी अम्युझमेंट पार्कचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मनपा क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत सर्वे नंबर 436 येथे प्लेग्राउंड व मिनी अम्युझमेंट पार्क या चार कोटी रुपये कामाच्या लोकार्पण आ.फारुख शाह यांच्या हस्ते आज करण्यात आले. आ.फारुख शाह यांचे हस्ते प्रथमच धुळे शहरातील अम्युझमेंट पार्क साठी निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे. धुळे शहरात विरंगुळ्या साठी एक सुद्धा गार्डन नसल्यामुळे महिला आणि मुलांना कुठेच फिरण्याची अशी सोय नाही तसेच वयोवृद्धांना सुद्धा कुठेच मॉर्निंग वॉक व फिरण्याची सोय नसल्यामुळे हे बघून आ.फारुख शाह यांनी धुळे शहराच्या महिला ना सोयीचे होईल असे अम्युझमेंट पार्कसाठीव प्ले ग्राउंड साठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला व आज त्याचे लोकार्पण करण्यात आले अल्पसंख्याक भागात एक सुद्धा गार्डन नसल्यामुळे या भागातील महिलांना मुलांना कुठेच विरंगुळ्या साठी गार्डन नव्हते या पार्कमध्ये मुलांसाठी खेळणी व वाटर पार्क सारखे साधन आहे तसेच सुंदर असे गार्डन आहे व यामध्ये संध्याकाळी व सकाळी मॉर्निंग वॉक साठी वृद्धांना जागा सोडण्यात आलेली आहे यामुळे पार्कमुळे या भागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. आ. फारुक यांच्या कामाचा झपाटा बघता या भागातील नागरिकांनी आमदार साहेबांचे आभार मानले आहे या कार्यक्रमाला आ. फारुख शाह यांचे सोबत छोटू शाह,गणी डॉलर,आमिर पठाण,साजिद साई,डॉ.दीपश्री नाईक, फातेमा अन्सारी, प्यारेलाल पिंजारी,निजाम सैय्यद,आसिफ शाह, डॉ.बापुराव पवार,डॉ. शराफत अली, आसिफ मुल्ला,परवेज शाह,सउद सरदार,रफिक शाह पठाण, हालीम शमसुद्दिन,कैसर अहमद,शहजाद मन्सुरी, गफ्फार शेख,शाहिद शाह,नजर पठाण,सलमान खान,शादाब खाटीक,फकिरा बागवान, आबिद मन्सुरी, नईम शेख, कौसर शाह,अबरार शाह, सउद आलम,शाहेदा अन्सारी,अकिला सैय्यद,रिझवाना शेख,परवीन शेख यांच्यासह मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# कोपरगावात इसमाचा मृत्यू; पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहरानजीक असलेल्या जेऊर फाट्याजवळ असलेल्या ठिकाणी दि.१४ मार्च रोजी सकाळी ०६ वाजेच्या सुमारास सोपान भागाजी चव्हाण हे बेशुद्धावस्थेत आढळून आले असल्याने त्यांना उपचारार्थ कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात भरती केले असता त्यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले आहे.या प्रकरणी मयत इसम सोपान चव्हाण यांचे पुत्र संतोष सोपान चव्हाण (वय-२७) रा.जेऊर कुंभारी यांनी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात नोंद दाखल केली आहे. पोलिसांनी अकस्मात मृत्यू नोंदणी पुस्तिकेत या प्रकरणी नोंद क्रं.२०/२०२४ सी.आर.पी.सी.१७४ प्रमाणे नोंद दाखल केली आहे. दरम्यान घटनास्थळी कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख,सहाय्यक पोलीस निरीक्षक मयूर भामरे,पोलीस उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे,पो.हे.कॉ.के.एस.जाधव आदींनी भेट दिली आहे.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर


# बहिणीने केली भावाच्या घरी आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** संपत्तीचा लोभ भल्याभल्यांना सुटत नाही. त्यात आता वडिलांच्या संपत्तीत लग्न झालेल्या मुलींना पण हिस्सा मिळण्याची झालेली तरतूद सासर माहेर यात दुरावा निर्माण करणारी ठरत असल्याची अनेक उदाहरणे पुढे येत आहे. समुद्रपूर येथील रमेश डगवार यांचे सहा महिन्यापूर्वी निधन झाले. त्यांच्या मागे चार मुलीला व एक मुलगा. वडिलांच्या मृत्यूनंतर बहीण भावात वाद सूरू झाले.गावातच डगवार परिवाराचे वडिलोपार्जित भव्य कॉम्प्लेक्स आहे. त्यावरू भाऊ राजू डगवार याचा चारही बहिणीसोबत वाद सूरू झाला होता. घटनेच्या दिवशी शुक्रवारी नागपूर येथील जोशीनगरात राहणाऱ्या ज्येष्ठ भगिनी वैशाली सुभाष कुरवाळे या घरून मॉर्निंग वॉक साठी जात असल्याचे सांगून घराबाहेर पडल्या. मात्र त्या थेट माहेरी समुद्रपूर येथे भावाच्या घरी पोहचल्या. वाद झाला. संतप्त वैशाली यांनी घराच्या अंगणात असलेल्या विहिरीत उडी घेतली. त्यात त्यांचा मृत्यू झाला. मृत महिलेचे पती सुभाष कुरवाळे तसेच मुलाने वैशाली हिच्या मृत्यूस भाऊ राजू डगवार, त्याची पत्नी तसेच राजूचे सासरे जबाबदार असल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल केली. त्या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. माहिती घेऊन ठाणेदार संतोष शेगावकर घटनास्थळी पोहचले. मृतदेह तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. परिस्थिती चिघळू नये म्हणून विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित हे घटनास्थळी दाखल झाले.भाऊ व भावूजयीस अटक करण्यात आली.